अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १४ / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १९-०७ -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

सभा सुचना क्रमांक १४ , दिनांक २८- ०७ - २००८.

प्रति,

सन्मा.श्री. / श्रीमती......................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक ...............

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २८-०७-२००८ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.
३. प्रारूप विकास योजना अहवाल.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक १४ दिनांक २८ - ०७- २००८ रोजी दु.१.०० वां होणा-या सभेची विषय पत्रिका.

-- *--

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| २ | नवरंग व्यायाम शाळा ते सर्जेपुरा रस्त्याचे दरम्यान असलेल्या चौकास " शितळा देवी चौक " असे नामकरण करणे बाबतऑफिस रिपोर्ट. |
| ३ | प्रभाग क्रमांक २१ मधील कापडबाजार भिंगारवाला चौकास " श्री भगवान संभवनाथ चौक " असे नांव देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | श्री.शित्रे धनंजय दत्तात्रय, लिपिक यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करणे बाबत मा.श्री.किशोर डागवाले, सभागृह नेता व इतर मा.नगरसेवक यांच्या याद्या व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अहमदनगर इंदिरा प्रणित मागासवर्गीय विडी कामगारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस सि.स.नं.७३६६ /१ अ १ पैकी या जागे ऐवजी नालेगांव सर्व्हे नं.२२०,२२१ ही जागा संस्थेस देणे बाबत मा.श्री.भानुदास कोतकर यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव. |
| ६ | २ री सुधारित मंजुर विकास योजना , अहमदनगर जी.एल.आर.नं.११७ व ११८ वरील आरक्षण क्र.१६९ ( माध्यमिक शाळा व क्रिडांगण ) वगळुन जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव ऑफिस रिपोर्टसह अंतिम मंजुरीसाठी. |
| ७ | नागापुर / बोल्हेगांव या उपनगरांसाठी स्मशानभुमि / दफनभुमि इत्यादी कामासाठी नागापूर स.नं.१३० / १ ही जागा संपादन करणे बाबत मा.श्री.भानुदास कोतकर,नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ८ | अहमदनगर शहर बससेवा परिवहन उपक्रमाबाबत अहमदनगर प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादीत यांचे दि.०४-०७-२००८ रोजीचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर. |
| ९ | अहमदनगर प्रारूप विकास योजना ( वाढीव हद्द ) - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रारूप विकास योजना (वा.ह.) प्रसिध्द करणे व कलम ३० अन्वये मा.शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे तसेच कलम २१, २८ व ३० अन्वये आवश्यक असलेल्या मुदतवाढी मंजुर करणेबाबत. |
| १० | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १९-०७-२००८.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : नवरंग व्यायाम शाळा ते सर्जेपुरा रस्त्याचे दरम्यान असलेल्या चौकास " शितळा देवी चौक " असे नामकरण करणे बाबतऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मा.उपमहापौर श्री.सुळ दिपक वसंतराव यांनी संदर्भिय पत्रान्वये प्र.क्र.२० मधील तोफखाना भागातील नवरंग व्यायामशाळा ते सर्जेपुरा पर्यंतच्या रस्त्याच्या चौकातील शितळा देवी मंदिर असुन या ठिकाणी भाविक भक्तांची मोठी गर्दी असते. नवरात्र उत्सव या भागात मोठया प्रमाणावर साजरा केला जातो. आषाढ महिन्यात या भागात मोठया प्रमाणावर यात्रा भरते. शहराच्या विविध भागातुन नागरिक मंदिरामध्ये दर्शनास येतात. भाविक भक्तांचे श्रध्दास्थान असल्याने या चौकास " शितळा देवी चौक " असे नामकरण करणे बाबत सुचविलेले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर महानगरपालिका कडील रजिष्टर पाहता सदर चौकास कोणाचे नांव दिल्याचे आढळुन येत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड प्रकरण ११ (२) नुसार महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिके मध्ये विहीत असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देणेचे अधिकार मा.आयुक्तांना असलेने सदरचे प्रकरण मा.महासभेपुढे ठेवणेकरीता आदेशार्थ सविनय सादर.

यावर कार्यकारी अभियंता यांचा अभिप्राय की, अहवाला प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित मा.महासभेकडे पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट कार्यकारी अभियंता,शहर अभियंता,मा.उपायुक्त (सा),मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार व सदर भागातील नागरिकांच्या भावनांचा विचार करता नवरंग व्यायाम शाळा ते सर्जेपुरा रस्त्याचे दरम्यान असलेल्या चौकास " शितळा देवी चौक " असे नामकरण करणे बाबतच्या ऑफिस प्रस्तावात बदल करुन त्या ऐवजी रस्त्यास " शितळा देवी रस्ता " असे नामकरण करणे बाबतच्या ठरावास मान्यता देण्यांत येत आहे. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. दिपक वसंतराव सुळ

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :३ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : प्रभाग क्रमांक २१ मधील कापडबाजार भिंगारवाला चौकास " श्री भगवान संभवनाथ चौक " असे नांव देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मा.नगरसेवक श्री.बोरा किशोरकुमार हिम्मतलाल व मा.नगरसेवक श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण यांनी संदर्भिय पत्रान्वये प्र.क्र.२१ , कापडबाजार येथे " श्री भगवान संभवनाथ " यांचे मंदिर असुन शहरातील विविध समाजातील , स्तरातील हजारो भाविक दररोज मंदिरामध्ये दर्शनासाठी येत असतात त्यामुळे शहरातील नागरिकांचे श्री.भगवान संभवनाथ मंदिर श्रध्दास्थान असल्याने कापड बाजार चौकास " श्री भगवान संभवनाथ चौक " असे नांव देणे बाबत सुचविलेले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर महानगरपालिका कडील रजिष्टर पाहता सदर चौकास कोणाचे नांव दिल्याचे आढळुन येत नाही. मात्र सदर चौकास भिंगारवाला चौक असे संम्बोधले जाते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड प्रकरण ११ (२) नुसार महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिके मध्ये विहीत असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देणेचे अधिकार मा.आयुक्तांना असलेने सदरचे प्रकरण मा.महासभेपुढे ठेवणेकरीता आदेशार्थ सविनय सादर.

यावर कार्यकारी अभियंता यांचा अभिप्राय की, अहवाला प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित मा.महासभेकडे पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट कार्यकारी अभियंता,शहर अभियंता,मा.उपायुक्त (सा),मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.
सुचक : मा.श्री.बोरा किशोरकुमार हिम्मतलाल
अनुमोदक : मा.श्री. त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :४ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : श्री.शित्रे धनंजय दत्तात्रय, लिपिक यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करणे बाबत मा.श्री.किशोर डागवाले, सभागृह नेता व इतर मा.नगरसेवक यांच्या याद्या व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : विनंती रिपोर्ट सादर की, मा.श्री. किशोर डागवाले सभागृह नेता,मा.श्री.अविनाश घुले, स्थायी समिती सभापती, मा.श्री. कैलास गिरवले,नगरसेवक, मा.श्री.दिपक खैरे, नगरसेवक यांनी दिनांक २१-४-२००८ व दिनांक २२-४-२००८ रोजी याद्या देवुन अहमदनगर महानगरपालिके मधील कायम कर्मचारी श्री.धनंजय दत्तात्रय शित्रे, लिपीक कामगार विभाग हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एल.जी.एस.परिक्षेत महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले असल्याने त्यांचा सर्व साधारण सभेमध्ये विषय घेवुन अभिनंदनाचा ठराव पारीत करणे बाबत सुचविले आहे.

श्री. शित्रे यांना एल.जी एस मध्ये ४६० गुण मिळालेले असुन ते महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले असल्याने मा. नगरसेवाकांच्या याद्या नुसार येत्या सर्व साधारण सभेमध्ये श्री. शित्रे धनंजय दत्तात्रय, लिपीक यांचा अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यासाठी सर्व साधारण सभेपुढे ठेवण्यास मान्यता मिळावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित अंतिम मंजुरीसाठी महासभेकडे पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " नगरसचिव महासभेपुढे घेणेत यावा "

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा) , मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. ही सभा श्री.शित्रे धनंजय दत्तात्रय,लिपीक यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करीत आहे. तसेच महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी दाखविलेल्या नैपुण्याबद्यल वेळोवेळी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात यावे. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.अविनाश घुले,

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :५ दिनांक : २८-०७-२००८.

---

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर इंदिरा प्रणित मागासवर्गीय विडी कामगारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस सि.स.नं.७३६६ /१ अ १ पैकी या जागे ऐवजी नालेगांव सर्व्हे नं.२२०,२२१ ही जागा संस्थेस देणे बाबत मा.श्री.भानुदास कोतकर यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : विषयांकित जागा इंदिरा प्रणित विडी कामगारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्याबाबतचा ठराव अहमदनगर महानगरपालिकेने ठराव क्र.९ दिनांक २०/०४/२००४ अन्वये पारीत केलेला आहे. ही जागा सदर संस्थेस स.नं.१५० सावेडी या जागे ऐवजी बदलून देण्यात आलेली आहे. पुर्वी या संस्थेस स.नं.१५० सावेडी पैकी जागा देण्याचा ठराव तत्कालीन नगरपरिषदेने ठराव क्र.१४ दिनांक ०६/०९/१९९४ अन्वये केला होता. तथापि या जागेवर अतिक्रमण झाल्याने या जागेऐवजी विषयांकित जागा देण्याचा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

मध्यंतरीच्या काळात ही जागा देण्यासंबंधी शासनाची मंजुरी घेण्याकरीता प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. शासनाने वेळोवेळी उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती वेळोवेळी शासनास सादर केली आहे. मात्र शासनाने संदर्भीय पत्रान्वये खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

१) पर्यायी जागे संदर्भात महानगरपालिकेने ठराव पारित केलेला आहे किंवा कसे ?

उत्तर - पर्यायी जागा देणे संदर्भात वर नमुद केल्या प्रमाणे ठराव क्रमांक ९ दिनांक २०/०४/२००४ अन्वये पारित केलेला आहे.

२) पुर्वी संस्थेने दिलेल्या किमतीत पर्यायी जागा देणे संदर्भात ठराव पारित केला आहे किंवा कसे ?

उत्तर - याबाबत नमुद करण्यात येते की, पर्यायी जागा देणे संबंधी झालेला ठराव क्र.९ दिनांक २०/०४/२००४ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, या ठरावात स.नं.२२०,२२१ या जागेचे मुल्यांकन नगररचना विभागाकडून घेवुन पैसे भरलेली रक्कम व आलेले मूल्यांकन या मधील फरकाची रक्कम संस्थेला भरावी लागेल असे स्पष्ट नमुद केले आहे.

याबाबत मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर नगरसेवक यांनी यादी देवुन या विषयाचा मानवतेच्या दृष्टीकोनातुन व सद्भावना पुर्वक विचार करावा अशी विनंती मा.आयुक्त यांचेकडेस केली आहे. त्यानुसार प्रस्तावाची छाननी केली असता खालील प्रमाणे वस्तुस्थिती आढळते.

अ) विषयांकित जागेचे चालू बाजार भावाप्रमाणे मुल्य रुपये २८ लाख ३० हजार इतके येते. जागेची अदला बदली करतांना ठराव क्र.९ दिनांक २०/०४/२००४ मधील तरतुदीचा विचार करता त्यांनी पुर्वी भरलेली रक्कम रुपये ८,०९,६६४/- इतकी रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम रुपये २०,२०,३३६/- महानगरपालिका फंडात भरणे आवश्यक आहे असे दिसते. तथापि अर्जदार संस्थेने रुपये ८,०९,६६४/- इतकी रक्कम दिनांक १२/१/१९९५ रोजी भरलेली आहे. तसेच इतर उदा : मालमत्ताकर, विकासभार इत्यादी रक्कमही भरलेली आहे. अशी एकुण अर्जदार संस्थेने आत्तापर्यंत रुपये ९,६२,०४१/- इतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा केली आहे. या रक्कमेपैकी अर्जदार संस्थेने विषयांकित जागेपोटी दिनांक २०/१/१९९५ रोजी रक्कम रुपये ८,०९,६६४/- भरलेली आहे. ही रक्कम अर्जदार संस्थेने महानगरपालिकेत जमा करण्याऐवजी बँकेमध्ये मुदत ठेव ठेवली असतीतर त्यांना आज अखेर सुमारे ३३ लाख इतकी रक्कम मिळाली असती. ही रक्कम स.नं.२२०, २२१ च्या चालू बाजार भावाप्रमाणे येणा-या रक्कमेपेक्षा जास्त आहे. ही वस्तुस्थिती

विचारात घेता आता द्यावयाची पर्यायी जागा अर्जदार संस्थेकडून कोणत्याही मोबदला न घेता देणे योग्य होईल. या करता पुर्वीच्या मंजुर ठराव क्र.९ दिनांक २०/४/२००४ मधून शेवटची फरकाची रक्कम भरणे संबंधिची तरतुद रद्द करावी लागेल. यासाठी हा प्रस्ताव पुन्हा महासभेस मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित वस्तुस्थिती विचारात घेता सदर प्रकरण अंतीम निर्णयासाठी मा.महासभेकडे पाठविणेसाठी मंजूरीस्तव सादर.

यावर आयुक्त यांचा अभिप्राय की, गाव नमुना नं.६ (ड ) नुसार जमीन कोणाच्या नांवे आहे सादर करा.

यावर नगर रचनाकार यांचा अभिप्राय की, सोबत ७/१२ उतारे व फेर नं.३१२३ चा उतारा ६ ड सादर करीत आहे. फेर नं.२९९ व ३०० उपलब्ध नाही असे संबंधित महसुल विभागाने कळविलेले आहे. नमुना क्र.८ (अ) सादर करीत आहे.नमुना क्रमांक ८ अ व ७/१२ उता-यावर महानगरपालिकेची मालकी स्पष्ट दिसते त्याप्रमाणे पुढील आदेशार्थ सादर.

यावर आयुक्त यांचा अभिप्राय की, महासभेवर सादर करा, तत्पुर्वी जागेची पाहणी माझ्या सोबत करण्यात यावी.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " महासभा "

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट नगर रचनाकार ,मा.उपायुक्त (सा) , मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

चर्चा :

मा.श्री.कृ.द.जाधव :- विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्थेने मागणी केलेल्या पुर्वीच्या जागेसाठी ८ ते ९ लाख रुपये ९५ सालीच भरलेले आहेत. त्यांचे कडुन आता कोणत्याही प्रकारे वाढीव रक्कम न घेता त्यांनी आता त्यानंतर मागणी केलेली जागा त्याच रक्कमेत त्यांना देण्यात यावी. त्यांना जागा देणेबाबतचा प्रस्ताव व ठराव यापुर्वीच झालेला आहे. हे खरोखर विडी कामगार आहेत. तेंव्हा त्यांना जास्त पैसे न घेता जागेचा प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री.कैलास गिरवले :- मा.जाधव यांनी मांडलेल्या प्रस्तावाप्रमाणे ठराव मंजूर करावा.

मा.श्री.लोंढे :- विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्थेला यापुर्वी जी जागा दिलेली होती. ती का दिली नाही. याबाबतचा खुलासा करावा. ती जागा कोणत्या समाजाची आहे. गवळी समाजाची आहे काय? त्या जागे बाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा. महानगरपालिकेची जागा असेल किंवा त्यावर आरक्षण असेल, त्यावर अतिक्रमणे झालेली असतील त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करावा.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, मागील सन २००४ मध्ये सदर संस्थेला जागेची आदलाबदल करुन देणेसाठी ठराव मंजूर झालेला आहे. सदर संस्थेने फार पुर्वी पैसे भरलेले आहेत. व सहकारी विडी कामगार संस्था असल्याने व त्यांनी भरलेली रक्कम महानगरपालिकेत भरण्या ऐवजी बँकेत भरली असती तर त्यांची ३३ लाख पेक्षा जास्त रक्कम झाली असती. त्यामुळे आता महासभेपुढे हा विषय केवळ मंजूरी देणेपुरताच आलेला आहे. पुर्वीच्या जागेवर झोपडपट्टी वासियांची अतिक्रमणे असतील तर ती जागा बदलून देणे एवढया पुरताच हा विषय महासभेपुढे आलेला आहे.

मा.श्री.शंकरराव ह. घुले :- मी नगराध्यक्ष असतांना विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्थेला जागा देण्यात यावी व पुर्वीची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून त्यास कंम्पौंड घालावे असे सांगितलेले होते. पुर्वीची जागा देणे बाबत ठराव झालेला असतांना त्या जागेवर लोखंडे बाई यांचे नांव कसे काय लागले याचा खुलासा करावा.

मा.श्री.कैलास गिरवले :- विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्थेला द्यावयाच्या पुर्वीच्या जागेवर पाटोळे यांचे नांव लागलेले आहे. याबाबत महानगरपालिकेने काहीच कार्यवाही केलेली नाही. व मुदतीत अपील केलेले नाही. याबाबत महानगरपालिका अधिकारी यांचेवर कारवाई करणार आहात का? याचा खुलासा करावा. व निकालाविरुध्द अपील का केले गेले नाही याची चौकशी आयुक्त यांनी करावी.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, पुर्वी ज्या जागेचा ताबा दिलेला होता आता फक्त सदर जागा बदलून नविन जागा देणे बाबतचा प्रस्ताव आलेला आहे. त्यांनी भरलेली रक्कम बाजारभावाच्या रक्कमेपेक्षा जास्त आहे मात्र सदर जागेवर निकाल लागल्यानंतर अपील का करण्यांत आलेले नव्हते. या बाबत वस्तुस्थिती काय आहे याचा नगररचना विभागाने खुलासा करावा.

यावर नगररचनाकार धोंगडे यांनी सांगितले की, सदर बाबतीत आपण अजुनही अपील करु शकतो.

मा.श्री.मिलींद गंधे :- महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेकरीता लिगल ॲडव्हायझर का उपस्थित रहात नाहीत या बाबत खुलासा करावा.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- महानगरपालिकेच्या सभेमध्ये वेळोवेळी आदेश दिले जातात परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही.

मा.श्री.कैलास गिरवले :- महानगरपालिकेच्या विरोधी निकाल लागल्यानंतर त्याबाबत वेळीच कार्यवाही का होत नाही.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, मी सभेमध्ये वेळोवेळी सूचना देत असतो महानगरपालिकेच्या विकास कामाबाबत मीही प्रशासनास तीन पत्रे दिलेली आहेत. तसेच शिक्षण मंडळ व इतर यांनी महानगरपालिकेचे केलेले ठराव याची माहिती मिळणे बाबत मी कळविले असतांनाही मलाही वैयक्तीक माहिती मिळालेली नाही.

मा.श्री.त्रिपाठी :- महानगरपालिका सभेमध्ये चर्चा झाल्यानंतर तात्काळ माहिती दिली पाहिजे तसेच माहितीच्या अधिकारा बाबत पुढील महासभेमध्ये विषय घ्यावा असे सांगितले. ज्याबाबत अंमलबजावणी करीत नाह. त्याबाबत माहिती अधिका-यांनी माहिती दिली पाहिजे.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, तातडीचे आदेश देवुनही अधिका-यांकडून माहिती दिली जात नाही.

मा.श्री.शं.ह.घुले :- अपीलामध्ये एकतर्फी निकाल दिला जातो. प्रशासन अधिका-याकडून माहिती दिली नाही. त्यामुळे सभागृहामध्ये गोंधळ निर्माण होवून प्रशासनाचा मी धिक्कार करतो असे सूचविले. व या करीता मी ५ मिनिटे सभात्याग करीत आहे. असे म्हणुन सर्व श्री.लोंढे , शं.ह.घुले, नजीर पहेलवान, अरिफ भाई, नामदेव पवार, दशरथ शिंदे यांनी ५ मिनीटे सभा त्याग केला. व माहिती येईपर्यंत व वकील येईपर्यंत सभा सुरु करु दिली जाणार नाही असे सांगितले. पुर्वीची जागा जी द्यावयाची होती ती जवळ जवळ सव्हा दोन कोटींची जागा आहे. याबाबत वकीलांना बोलुन माहिती घ्यावी.

यावर आयुक्त यांनी सांगितले की, नगररचना विभागाकडुन पुढील कार्यवाही केलेली नाही. त्यात जे कोणी कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

मा.श्री.शं.ह.घुले :- यांनी सांगितले की, विडी कामगार संस्थेला नविन जागा देण्या बाबत आमचा विरोध नाही.

यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की, सभागृहात योग्य ती माहिती द्यावी व दखल घ्यावी. जे अधिकारी उपस्थित असतील त्यांनी याची नोंद घ्यावी व सात दिवसांत निर्णय घ्यावा असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- याचप्रमाणे माळीवाड्यातील शिशुसंगोपन शाळेलाही जागा दिलेली आहे. त्यावर शाळेचे नांव लागलेले आहे. याबाबतही नोंद घेवून कार्यवाही करावी. त्यांनीही अतिक्रमण केलेले आहे. शाळेत डोनेशन घेवून प्रवेश दिला जातो.

मा.उपमहापौर :- अहमदनगर महानगरपालिकेच्या ज्या ज्या निरनिराळया जागा असतील त्याबाबत अद्यावत नोंदी घेणे बाबत इस्टेट प्रॉपर्टी अधिकारी नेमणे बाबत मी यादी दिली होती तो अधिकारी नेमण्यांत यावा.

मा.श्री.सोमनाथ लोंढे :- यापुर्वी मी सर्व मंजूर झालेल्या ले-आउट ची यादी मागितली होती. त्याबाबत धोंगडे यांना यादी दिलेली होती.

यावर नगररचनाकार धोंगडे यांनी यादी तयार आहे ती लगेच दिली जाईल असे सांगितले.

मा.महापौर यांनी अतिक्रमणाचा विषय महासभेत घेणे बाबत सूचना केली.

मा.श्री.सोमनाथ लोंढे :- अतिक्रमणाची मोहिम चालू केलेली आहे. ती कां थांबविण्यांत आली याबाबतही खुलासा करावा.

मा.श्री.शं.ह.घुले :- जागेबाबतचा निकाल विरोधात गेला होता. संबंधिताचे नांव कसेकाय लागले याची माहिती महानगरपालिकेच्या टिप्पणी मध्ये का देण्यांत आली नाही.

याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, विडी कामगारांच्या बाबत अपील केलेले नाही.

मा.श्री.शं.ह.घुले :- मला अपीलातील कागदपत्रे देण्यात यावी व इतर सर्व माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यांत यावी.

यावर मा.महापौर यांनी आपणांस या बाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन दिली जातील असे सांगितले.

-- * --

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व सभागृहामध्ये झालेली साधक बाधक चर्चा यानुसार ठरविण्यात येते की, विडी कामगारांची जागेबाबतची अनेक वर्षांची मागणी लक्षात घेता मागासवर्गीय विडी कामगारांच्या सहकारी गृह निर्माण संस्थेस सि.स.नं. ७३६६ / १ अ १ पैकी या जागेऐवजी (जागेची अदलाबदल ) नालेगांव स.नं. २२०, २२१ ही ०.८१ हे.क्षेत्राची ( नकाशात दक्षिण पश्‍चिम कोप-यात दर्शविलेली जागा) जागा देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच कार्यालयीन प्रस्तावात नमुद केल्यानुसार अर्जदार संस्थेकडून कोणताही मोबदला घेण्यात येवु नये तसेच मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ दि. २०-०४-२००४ मध्ये नमुद केलेली शेवटच्या फरकाची रक्कम भरणे संबंधीची तरतुद रद्द करणेत यावी. प्रकरण अंतिम निर्णयासाठी मा.शासनाकडे पाठविणेत यावे. तद्नुषंगीक खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर

अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :६ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : २ री सुधारित मंजुर विकास योजना , अहमदनगर जी.एल.आर.नं.११७ व ११८ वरील आरक्षण क्र.१६९ ( माध्यमिक शाळा व क्रिडांगण ) वगळुन जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव ऑफिस रिपोर्टसह अंतिम मंजुरीसाठी.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहराची २ री सुधारीत विकास योजना शासनाने निर्णय क्र. टीपीएस/१६९९/१६१२/ सी.आर.२७ (ब)/०३/यु.डी- ९ दि. ४ जुलै २००५ अन्वये मंजूर केली असून ती दि. २३/८/०५ पासून अंमलात आलेली आहे.

सदर मंजूर विकास योजना आराखड्यात जी.ए.आर.नं.११७ व ११८ ही जागा आरक्षण क्र. १६९ अन्वये माध्यमिक शाळा व क्रिडांगणासाठी आरक्षित (क्षेत्र १.१३ हेक्टर ) ठेवण्यात आलेली आहे. त्यापैकी जी.एल.आर नं.११७ ही जागा रयत शिक्षण संस्थेच्या मालकीची असून त्यानी स्वतःच्या शैक्षणिक नियोजनाच्या दृष्टीने त्यांच्या मालकीच्या जी.एल.आर.नं.११७ वरील आरक्षण क्र. १६९ उठविणे बाबत शासनास केलेल्या विनंतीनूसार शासनाने २ री सुधारीत विकास योजना. अहमदनगर भागशः मंजूर करताना आरक्षण क्र. १६९ च्या क्षेत्रामधून जी.एल.आर.नं.११७ चे क्षेत्र वगळून ते रहिवास विभागात समाविष्ट केलेला आहे. (E.P-१४)

तथापि मंजूर विकास योजना आराखडा तयार करताना झालेल्या तांत्रीक चुकीमुळे प्रतयाक्षातील जी.एल.आर.नं.११७ चा काही भाग (रयत शिक्षण संस्थेच्या मालकीचा) जी.एल.आर.नं.११८ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे. त्यामुळे शासनाने जी.एल.आर.नं.११७ वरील आरक्षण वगळले (E.P-१४) असले तरी जी.एल.आर.नं ११८ मध्ये दर्शविण्यात आलेल्या (रयत शिक्षण संस्थेच्या) जागेवरील आरक्षण कायम राहिले आहे.

संस्थेचे शैक्षणिक कार्य विचारात घेउन शासनाने संस्थेच्या जागेवरील आरक्षण उठविण्याच्या दृष्टीकोनातून E.P-१४ द्वारे सदर भाग रहिवास विभागास समाविष्ट केलयाचे दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेनेही तांत्रीक चुकीमुळे राहिलेले संस्थेच्या जागेवरील आरक्षण उठविण्यासाठी मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १६९ वगळून सदर भाग रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरफाराची कार्यवाही करण्यास करण्यास महासभा ठराव क्र. ५ दि.२४/८/२००७ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

सदर कलम ३७ अन्वये करावयाचरूा कार्यवाहीच्या अनुषंगाने नियोजित फेरबदला बाबतची जाहिर नोटीस दि. १० एप्रिल २००८ च्या राजपत्रात तसेच दि. ३०/६/२००८ च्या दैनिक लोकयुग व दैनिक समाचार या वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्याबाबत हरकती / सूचना मागविण्यात आल्या होत्या. हरकती / सूचना दाखल करण्याची विहित मुदत दि. ९/५/२००८ रोजी संपलेली आहे. सदर मुदतीत एकूण ११ हरकत अर्ज दाखल झालेले आहेत. या सर्व हरकतदारांना दि. २३/६/२००८ रोजी महानगरपालिका कार्यालयात पाचारण करण्यात येउन मा. आयुक्त साहेब यांनी त्यांचे म्हणणे समक्ष ऐकून घेतलेले आहे.

या सुनावणी दरम्यान संबंधितांनी आरक्षण उठविणे किंवा कायम करणे याबाबत कोणतीही विशिष्ट सूचना केलेली नाही. हरकतदार हे मालक किंवा भाडेकरी नसून अतिक्रमणधारक आहेत. आरक्षण उठविण्याने अगर कायम केल्याने त्यांच्या सद्यस्थितीत कोणताही बदल होणार नाही. अतिक्रमणा बाबतची कार्यवाही संबंधित संस्थेने परस्पर करणे रास्त होईल.

हरकतदारांपैकी काहीजणांनी विषयांकीत जागा वाणिज्य विभागात समाविष्ट करण्याची मागणी केलेली आहे. कारण काहीजणांची या जागेवर अनधिकृत गॅरेजस इ. व्यवसाय आहेत. तथापि ही जागा राज्य महामार्गालगत असल्याने ही जागा रहिवास विभागात समविष्ट झाल्या नंतर देखील या जागेवर वाणिज्य वापर अनुज्ञेय होउ शकतो. त्यामुळे हरकतदारांच्या या विनंतीत तथ्य आढळून येत नाही. सबब सुनावणी नंतर हरकती अर्जात फारसे तथ्य आढळून येत नाही.

तरी जी.एल.आर.नं. ११७ व ११८ वरील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १६९ (माध्यमिक शाळा व क्रिडांगण ) वगळून सदर भाग रहिवास विभागात समाविष्ट करण्यास मंजूरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेच्या अंतिम मंजूरीसाठी व त्यानंतर मा.शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

सबब सदर विषय अंतिम मंजूरीसाठी मा.महासभेस सादर करण्यासाठी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित अंतिम मंजुरीसाठी महासभेकडे पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " महासभा "

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा) , मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.श्री.कैलास गिरवले :- सदरचा विषय अंतिम मंजूरी करीता सभागृहापुढे आलेला आहे.

मा.श्री.अनंत जोशी, मा.श्री. मिलींद गंधे, मा.श्री.त्रिपाठी इत्यादी सदस्य यांनी याबाबत पुर्वी काय ठराव केलेला आहे याचा खुलासा करावा. रिपोर्टात उल्लेख झालेला नाही. पुर्वीचे इतिवृत्तही मंजूर झालेले नाही.

त्यानंतर ऑफिस रिपोर्ट संपूर्ण वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- ठरावात उल्लेख आलेला नाही. मंजूर विकास योजना आराखडा तयार करतांना तांत्रिक अडचण काय आलेली आहे याचा उल्लेख आलेला नाही.

त्यावर नगररचनाकार श्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, एम.आर.टी.पी.ॲक्ट चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करणे बाबत खुलासा केला त्यामध्ये जाहीर प्रसिध्दी द्यावी लागते. तसेच अर्जदारांचे म्हणणे ऐकुण घेतले जाते. त्याची सुनावणी घेतली जाते.

मा.श्री.त्रिपाठी :- सदरच्या जागेचे बाजार मूल्य जवळजवळ ८ कोटी इतके आहे. जागेचा भाव १,७०० प्रति स्क्वेअर फुट चालू आहे तेंव्हा सदर आरक्षणाची जागेचे आरक्षण उठवुन महानगरपालिकेने खरेदी करावी व त्याचा विकास करावा. त्यामुळे या प्रस्तावास माझा विरोध राहील.

मा.श्री.अनंत जोशी :- सदरच्या प्रस्तावास कायदेशिर मत दिलेले नाही व आयुक्तांचे मत नोंदवलेले नाही. त्यामुळे अंतिम ठरावास आमचा विरोध राहील.

मा.श्री.कृ.द.जाधव :- सदरचा प्रस्ताव हा या सभागृहापुढे अंतिम मंजूरीला फक्त आलेला आहे. तेंव्हा त्यास मंजूरी द्यावी असे सांगितले.

मा.श्री.अनंत जोशी :- नगरसचिव यांना सूचविले की, सदरच्या प्रस्तावास आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

--*--

**ठराव :**ऑफिस रिपोर्ट मंजुर. जी.एल.आर.नं.११७ व ११८ वरील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १६९ वगळुन रहिवास विभागात समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात येत असुन अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यात यावा. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. मात्र सदर ठरावास मा.श्री.अनंत जोशी, मा.श्री.सुनिल त्रिपाठी यांचा विरोध.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव
अनुमोदक :मा.श्री. किशोर डागवाले
ठराव बहुमताने मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : नागापुर / बोल्हेगांव या उपनगरांसाठी स्मशानभुमि / दफनभुमि इत्यादी कामासाठी नागापूर स.नं.१३० / १ ही जागा संपादन करणे बाबत मा.श्री.भानुदास कोतकर,नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मौजे नागापूर,बोल्हेगाव इत्यादी अहमदनगर शहराच्या उत्तर बाजूकडील उपनगरात स्मशानभुमी तसेच दफनभुमीसाठी अधिकृत जागा उपलब्ध नसल्याने या भागासाठी स्मशानभुमी / दफनभुमीची व्यवस्था करण्यासाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबतची यादी संदर्भीय पत्रान्वये मा.लोंढे सुभाष सोपानराव यांनी दिलेली आहे.तसेच संत जॉन बॉस्को चर्च सावेडी यांनी देखील या भागात ख्रिश्चन समाजासाठी दफनभूमीची व्यवस्था करण्यासाठी मागणी केलेली आहे.

सध्या स.नं १३०/१ नागापूर या जागेमध्ये अहमदनगर महानगरपालिकेमार्फत हिंदू स्मशानभूमि विकसित करण्यात आलेली आहे.तसेच याच स.नं मध्ये मातंग,ख्रिश्चन,मुस्लीम समाजाची दफनभुमी अस्तित्वात आहे.हिंदु स्मशानभुमी व्यतिरिक्त इतर कोणत्याही समाजाच्या दफनभूमीस महानगरपालिकेमार्फत कोणत्याही सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत.हिंदू स्मशानभूमिस मात्र महानगरपालिकेने संरक्षक भिंत बांधलेली असून आतमध्ये देखील शेडचे बांधकाम केलेले आहे. (सन २००६-२००७ ) या बांधकामासाठी रुपये ४,९६,१५६/- इतका खर्च देखील करण्यात आलेला आहे.

मध्यंतरीच्या काळात स.नं १३०/१ मध्ये महानगरपालिकेने केलेले बांधकाम बेकायदेशीर असून ते माझ्या खाजगी जागेत केलेले आहे व ते त्वरीत पाडून टाकावे किंवा त्या जागेचा योग्य तो मोबदला मला दयावा अशा आशयाची तक्रार नागापूर स.नं १३०/१ या जागेचे मालक सौ.वर्षा बाळासाहेब सोनवणे यांनी लोकशाही दिनात मा.जिल्हाधिकारी ,अहमदनगर यांचेकडेस केलेली आहे.

उपरोक्त तक्रार अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने स.नं १३०/१ नागापूर या जागेच्या मालकी हक्काची तपासणी करण्यात आली या तपासणी अंती ही जागा सौ.वर्षा बाळासाहेब सोनवणे यांच्याच मालकीची असल्याचे सिध्द झाले ही वस्तूस्थिती लक्षात आल्यानंतर मा.आयुक्त,मा.महापौर व मा.सभापती स्थायी समिती ,अहमदनगर महानगरपालिका यांचे समवेत वरील परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली.तसेच जमीन मालक सौ.वर्षा सोनवणे यांचेशी सुध्दा जमिन घेण्याबाबत चर्चा झाली.त्यांनी देखील ही जमिन देण्याबाबत सकारात्मक प्रतिसादर दिलेला आहे.ही जमिन संपादित करणेबाबतचा या विभागाचा अहवाल खालीलप्रमाणे मुद्येनिहाय सादर करीत आहे.

१.संपुर्ण बोल्हेगांव / नागापूर परिसरासाठी विकसित केलेली अधिकृत स्माशानभूमि/ दफनभुमी उपलब्ध नाही ही वस्तूस्थिती आहे.नागापूर स.नं १३०/१ मध्ये सध्या वेगवगेळया समाजाच्या स्मशानभुमी / दफनभूमीचा वापर अनधिकृतरित्या होत आहे.

२.या संपुर्ण गट क्र. १३०/१ या जागेचे सर्वेक्षण केले असता ह जागा चिंचोळया पटटीच्या स्वरुपात असून त्या जागेतून उत्तर दक्षिण ६ मी.रुंदचा रस्ता विकसीत झालेला असून या रस्त्यांचाच पोहोच रस्ता म्हणून वापर करुन हिंदू स्मशानभूमी विकसित झालेली आहे.या स्मशानभूमीच्या दक्षिणेस मुस्लीम समाजाची दफनभूमि असून त्याच्या दक्षिणेस ख्रिश्चन समाजाची दफनभूमी आहे.तसेच याच जागेत मातंग समाजाची दफनभूमी देखील आहे.उर्वरीत भाग पडीक असून या जागेच्या पुर्वेस सिना नदी असून या सिना नदीमुळे या जागेपैकी काही भाग वाहून गेलेला आहे.

३.अहमदनगर शहराच्या वाढीव हद्यीचा प्रारुप विकास योजना आराखडा प्रसिध्द करण्यांत आलेला असून यातील प्रस्तावाप्रमाणे विषयांकीत जमिनीपैकी काही जमीन हरीतपटटा (Green Belt ) म्हणून दर्शविण्यात आलेली आहे.तर काही भाग विद्यमान स्मशानभुमी / दफनभूमी म्हणून दर्शविण्यात आला आहे. आता या जागेत स्मशानभूमी / दफनभूमी इत्यादी बाबी आरक्षण स्वरुपात दर्शवावयाच्या ठरल्यास या प्रस्तावास मा.महासभेच्या मंजुरी नंतर प्रारुप विकास योजनेच्या नियोजन समितीस हा प्रस्ताव पाठवावा लागेल म्हणजे ही समिती वरील फेरबदल विकास योजना आराखडयामध्ये दर्शवू शकेल.

४.उपरोक्त गट क्रमांक क्रमांक १३०/१ ही जागा संपादीत करण्याच्या धोरणात्मक निर्णयास मा.महासभेची मंजूरी अनिवार्य आहे.

५.भूसंपादनाची २००-२००८ या वर्षासाठी अंदाजपत्रकात रुपये ५,००,०००/- इतक्या रकमेची तरतूद केलेली आहे तसेच पुढील आर्थिक वर्ष २००८-२००९ मध्ये रक्कम रुपये ४०,७५,०००/- भूसंपादनासाठी प्रस्तावीत आहे.या निधीतून विषयांकीत जागेच्या भूसंपादनाचा खर्च भागविणे शक्य आहे.

६.जागेचे क्षेत्र :- २.७० हेक्टर ७/१२ उता-याप्रमाणे आहे.यापैकी सुमारे ०.६० हेक्टर जागेत हिंदू स्मशानभुमी असून मातंग समाजाच्या वापरात ०.११ हेक्टर जागा आहे.उर्वरीत सुमारे १.२० हेक्टर जागा ख्रिश्चन व मुस्लीम समाजाच्या दफनभुमीसाठी आहे.उर्वरीत जागेपैकी काही जागा रस्त्यात गेली असून काही जागा नदीच्या प्रवाहात वाहून गेली आहेतर उर्वरीत जागा खुली मोकळी आहे.जागेवरील परिस्थिती विचारात घेता ही उर्वरीत जागा वृक्षारोपण किंवा अन्य कारणासाठी महानगरपालिकेस भविष्यात वापरता येईल.त्यामुळे आजमितीस ही संपुर्ण जागा खरेदी करुन घेणे योग्य होईल किंवा आवश्यकतेप्रमाणे या जागेपैकी नेमकी किती जागा घ्यावयाची याचा निर्णय मा.महासभेच्या मंजुरीने मा.स्थायी समितीने घेणे योग्य होईल.

७.जागेचे मुल्यांकन :- प्रथम जागा खरेदी करावयाची किंवा कसे ? याबाबतचा धोरणत्मक निर्णय मा.महासभेने घेतल्यानंतर जागेच्या दरास व खरेदीच्या एकूण रकमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असते.त्यामुळे याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव हा मा.महासभेच्या धोरणात्मक मंजुरी नंतर मा.स्थायी समितीस सादर करण्यात येईल.असे असले तरी या जागेची ढोबळमानाने किंमत खालीलप्रमाणे येवू शकेल.

नागापूर स.नं १३०/१ या जागेचा शिघ्र सिध्द गणकाचा दर (२००८ साठी ) रुपये ३००/- प्रति चौ.मि.शिघ्र सिध्द गणकातील पध्दती प्रमाणे या संपुर्ण जागेचे मुल्यांकन खालीलप्रमाणे येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | रुपये ३००X२०००= | ६,००,०००/- |
| ब | रुपये ३००X२०००X०.८०= | ४,८०,०००/- |
| क | रुपये ३००X६०००X०.६०= | १०,८०,०००/- |
| ड | रुपये ३००X१७०००X०.४०= | २०,४०,०००/- |
| | रुपये | ४२,००,०००/- |

ई ) विषयांकीत जमिन सिना नदीच्या लगत असून विकास योजनेच्या हरीत पटटयात येते.तसेच ही जमिन चिंचोळया आकाराची आहे.या सर्व मुददयांचा मुल्यांकनावर प्रतिकुल परिणाम होणार आहे.या मुददयामुळे अर्थातच जागेचे मुल्यांकन कमी होणार आहे.हा तपशिलवार प्रस्ताव मा.स्थायी समितीस अलहिदा सादर करण्यात येईल.

सबब विषयांकीत जागा खाजगी वाटाघाटीने संपान करण्यासाठी मा.महासभेची धोरणात्मक मंजुरी मिळण्यासाठी सदर प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे योग्य होईल.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की,अ प्रस्तावितनुसार मा.महासभेकडे धोरणात्मक निर्णयासाठी पाठविणेकरीता मंजुरी देणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे प्रस्ताव महासभेपुढे ठेवावा.

अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट ,मा.उपायुक्त (सा ), मा.आयुक्त साहेब ,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मुळ प्रस्ताव आणि पुरक टिप्पणी वाचून दाखविण्यांत आली.

मा.श्री.त्रिपाठी :- सदर भागातील नागरिकांकरीता अंत्यविधी कुठे करणार आहात या बाबत विचारणा केली.

मा.महापौर :- सदर प्रस्तावामध्ये दोन टिप्पण्या देण्यात आलेल्या आहेत हा काय प्रकार आहे. जनरल बोर्डाच्या अजेंडया बरोबरच विषयास आवश्यक असणारी टिपणी आली पाहिजे. सदर नागपूर बोल्हेगांव विभागामध्ये पंचवीस हजार लोक रहात आहेत. सदर भागातील नागरिकांचा विचार करुनच सदर जागा घेण्यात यावी.

मा.श्री.अंबादास गारुडकर :- नागापूर , बोल्हेगांव हा जुना गावठाणचा भाग आहे. जुनी वस्ती आहे व गांव तेथे स्मशानभुमी असते. सदर विषयामध्ये त्यास जोडून दोन टिपण्या पाठविण्यांत आल्या आहेत त्यामुळे गोंधळ व संभ्रम झालेला आहे. प्रशासनाचे याबाबत काय म्हणणे आहे. याबाबत नेमका निर्णय काय घ्यावयाचा त्यामुळे मा.आयुक्त यांनीच निर्णय घ्यावा असे सूचविले.

मा.श्री.त्रिपाठी :- सदर स्मशानभुमीसाठी जागा घेणे अत्यंत आवश्यक आहे. नागापूर साठी दुसरी जागा कोणती आहे. सदर सर्व्हे नंबर १३०/१ मध्ये अतिक्रमणही झालेले आहे. परंतु नागरिकांच्या दृष्टीने स्मशानभुमीसाठी जागा घेणे आवश्यक आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव :- नागापूर बोल्हेगांव येथील सर्व्हे नंबर १३०/१ ही स्मशानभुमीची जागा खरेदी करणे बाबतचा विषय सभागृहापुढे ठेवलेला आहे. तथापि सदरची स्मशानभुमी ही नेमकी कोणत्या सालापासुन तेथे अस्तित्वात आहे. याठिकाणी किती भाग सिना नदीत गेलेला आहे. तसेच हिंदू - मुस्लीम - मातंग- ख्रिश्चन इत्यादी समाजाचे लोकांसाठी स्मशानभुमी आहे. सदर स्मशानभुमीचा किती भाग सिना नदीत वाहून गेला व किती पूररेषेत आहे. सदर स्मशानभुमीची जागा श्रीमती. सोनवणे यांनी कधी खरेदी केलेली आहे. व त्यानंतर सदर ठिकाणी स्मशानभुमी अस्तित्वात असतांनाच सदरची जागा खेरदी करणेबाबतचा प्रस्ताव मनपा सभेपुढे येतोय व महानगरपालिकेला ४२ लाख रुपयांचा गंडा घातला जात असेल तर हे कितपत योग्य आहे. यास पायबंद घातला गेला पाहिजे. याबाबत माझे स्पष्ट मत आहे की, हा विषय मंजूर करु नये.

मा.श्री.शं.ह.घुले :- सदर प्रस्तावामध्ये प्रशासन आणि नंतर आयुक्त यांनी टिपणी दिलेली आहे त्यामुळे दोन मतप्रवाह निर्माण झालेले आहेत. या बाबत त्यांनी सूचविले की, अशा दोन टिपण्या न देता एकदाच प्रशासनाने मत मांडावे. व या बाबत दखल घ्यावी. आयुक्त हे सरकारचे प्रतिनिधी व अधिकारी आहेत त्यांना आपले स्पष्ट मत मांडता येते. त्यामुळे श्री.त्रिपाठी यांची सूचना बरोबर होती. सदर ठिकाणी लोकवस्ती वाढलेली आहे. व लोकांना मुलभुत सुविधा आवश्यक असतात. परंतु सदर जागेत जावुन पाहणी केली असता सदर ठिकाणी ४० वर्षापासुन स्मशानभुमी होती. व सदर इसम मजकूर यांनी सदर ठिकाणची जागा दोन वर्षापुर्वी खरेदी केली त्यामुळे आता महानगरपालिकेने खरेदीसाठी प्रस्ताव दिलेला आहे. ४२ लाख रुपये एवढे पैसे कशासाठी मोजता सदरची जागा घेवू नये व त्यासाठी लागणारा निधी नगरसेवकांच्या निधीमधून वर्ग करु नये. बोल्हेगांव मध्ये स्मशानभुमीसाठी जागा आरक्षण आहे काय याबाबत मा.आयुक्त यांनी अभ्यास करावा व ४२ लाख रुपये खर्च न करता आमचा निधीही कमी करु नये.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- सदर विषयाबाबत दोन टिपण्या का दिलेल्या आहेत. एक ठाम भूमिका घ्यावी. ४२ लाख रुपये देण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे येत आहे व सभागृहाची दिशाभुल होत आहे. याबाबतचा खुलासा झाला पाहिजे.सदर ठिकाणी कंम्पौंड वॉल बांधण्यात आलेली होती. त्याबाबतचाही विषय उपस्थित झालेला आहे. त्याबाबतचा खर्च होईस्तर कर्मचारी काय करीत होते.

मा.श्री.अशोक कानडे :- बोल्हेगांव नागापूर स्मशानभुमीसाठी जागा संपादनाबाबतचा विषय सभागृहासमोर चर्चेला आलेला आहे. या प्रकरणा बाबत मला काही सभागृहाच्या निदर्शनास आणुन द्यावयाचे आहे. सदर ठिकाणी वॉल कंम्पौंड पुर्वीच करण्यांत आलेले आहे. स्मशानभुमीच्या जागेचा विकास झाला पाहिजे. तसेच या जागांचे पावित्र्य राहिले पाहिजे. या जागेचा विकास करणे करीता मा.खासदार यांनीही आपल्या निधीतून काही निधी देवून स्मशानभुमीचा विकास केलेला आहे. त्याला आता ६ वर्ष झालेले आहेत. सदर ठिकाणी नागरिकांना प्रातर्विधीस प्रतिबंध केलेला आहे. एखादया नागरिकाचा दुर्देवाने मृत्यु झाल्यास त्याबाबत अंत्यविधी काय करावयाचे सदर जागेस आज त्या ठिकाणी दुसरा पर्याय नाही. याबाबत स्मशानभुमीचा विकास झाला पाहिजे.

सदर बाबत मा.श्री.कोतकर साहेब यांना मी याबाबत धन्यवाद देतो. वॉल कंम्पौंडचे कामही त्यावेळेस पालिका निधीमधुन खर्च केले आहे. याबाबत उपायुक्त यांनी लेखी दिलेले आहे. सदर भागात पुर्वी हागणदारी होती व वॉल कंम्पौंड करणे गरजेचे होते. शासनानेही या ठिकाणी विकासकामी खर्च केलेला आहे. व वॉलकंम्पौंडचा विषय बाजुला ठेवावा. याबाबत मनपा इंजिनियर श्री.काकडे यांची चूक नाही. व अभियंता यांना जबाबदार धरणे योग्य नाही. प्रचलित स्मशानभुमीसाठी जागा संपादन करुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व्हावे असे आम्हास वाटत नाही. परंतु जागा संपादना बाबत दुसरा पर्याय नाही. याबाबत कोणतेही शडयंत्र किंवा गंडा घालण्याचा प्रस्ताव नाही व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व्हावे हा हेतु नाही. प्रशासनाने असा विषय प्रथमदर्शनी का ठेवला. मा.भाउ जाधव यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत सविस्तर प्रस्ताव आमचे समोर मांडला पाहिजे व सविस्तर खुलासेवार विषय सभागृहात मांडणेसाठी आम्ही त्या भागातील प्रतिनिधीत्व करीत असल्याने हा विषय पुढील सभेत घ्यावा असे सांगितले.

मा.श्री.त्रिपाठी :- पुर्वी विकास कामी कामाच्या प्रस्तावावर नगररचना विभागाकडील अभिप्राय घेतला जात नव्हता त्यामुळे स्मशानभुमीच्या जागेवरील वॉल कंम्पौंड बाबत श्री.काकडे इंजिनियर यांना दोषी धरण्यास काहीच अर्थ नाही.

मा.श्री.घुले :- मा.श्री.त्रिपाठी यांनी या प्रस्तावाबाबत जी सूचना मांडलेली आहे ती योग्य आहे. व सदरचा विषय तहकुब करावा व सुंदर अमरधाम सदर ठिकाणी करण्यात यावे असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- ४० ते ५० वर्षापासुन सदर ठिकाणी स्मशानभुमी आहे याबाबतची यादी आम्ही दिलेली होती. पुर्वी नगररचना विभागाकडुन एन.ओ.सी.घेतली जात नव्हती अशी घटना घडली परंतु सदर भागातील नागरिकांनी मागणी केल्यानंतर नागरिकांच्या मागणी प्रमाणे कामे करणे भाग असतील त्यामुळे त्याबाबतचे एस्टीमेट केले होते. त्यामध्ये श्री.काकडे यांचा दोष नाही. त्यामुळे यामध्ये कारवाई चूकीची होत आहे. तरी पुढील सभेमध्ये याबाबतचा विषय घेण्यात यावा असे सांगितले. मा.वहाडणे खासदार असतांनाही त्यांचा निधी या ठिकाणी खर्च केलेला होता. शासनाने लोकाभिमुख कामे केलेली आहेत त्यामुळे आपणाकडुन फार मोठी चूक झालेली आहे असे नाही. आता या बाबत चर्चा न करता पुढीलवेळी विषय घेवून प्रस्ताव मांडावा. व प्रशासनाचे मत घ्यावे.

मा.श्री.लोंढे :- कल्याण रोडवरील रस्त्याबाबतचा विषय उपस्थित केला.

त्यावरश्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, रस्ता कुणाच्याही खाजगी जागेत नाही. याबाबत कागदपत्रे बघुन माहिती देवू.

मा.श्री.अनिल शिंदे :- नालेगांव अमरधाम येथील विकास कामांबाबत त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी यावर सदरची कामे महापौर निधीतून चालू असल्याचा खुलासा मा.महापौर यांनी केला व तातडीने ही कामे पूर्ण करणे बाबत संबंधित इंजिनियर श्री.काकडे यांना सूचना केली.

मा.श्री.भानुदास कोतकर :- स्मशानभुमीच्या जागेबाबत सविस्तर चर्चा केलेली आहे. सभागृहापुढे आलेल्या विषयाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. स्मशानभुमीचा विकास करण्यामागे सदरचा भाग चांगला व्हावा व शेवटच्या क्षणीही नागरिकांना आपले दुःख विसरण्यास मदत व्हावी हे पहाणे आवश्यक असते. नागापूर बोल्हेगांव येथील स्मशानभुमी मध्ये खासदार निधीमधुन सुधारणा यापुर्वी केलेल्या आहेत. याठिकाणी ५ स्मशानभुम्या आहेत तेथे २ ते अडीच वर्षा पुर्वी मी स्वतः गेलो असता सदर भागात शौचालया करीता जागा वापरात होती. त्यामुळे आम्ही सदरची जागा तत्कालीन आयुक्त श्री.पवार साहेब यांना दाखविली. व ग्रामपंचायत असतांना सदर भागात जे काम झालेले आहे ते दाखविले. व ५० हजार लोकवस्तीचा निर्माण झाल्यामुळे या भागात आपण चांगला विकास करु शकतो. असे सांगितले असता सदर भागामध्ये वॉल कंम्पौंड करा गार्डन व झाडे लावा. इत्यादी बाबत मागणी केली. व तसा प्रस्ताव केलेला आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकी हक्काची जागा नाही. त्यामुळे सदर जागा संबंधित मालकांकडुन खरेदी करणे हाच उपाय आहे. त्यामुळे हा प्रस्ताव केलेला होता. व त्यावर त्यांनी पुढील कामे करता येतील व या जागेचे व्हॅल्युएशन काढण्यास सांगितले ते ४२ लाख इतके झालेले आहे.

आता या प्रश्ना बाबत स्थानिक वर्तमान पत्रामध्ये बातमी आल्यानंतर आयुक्त यांनी दुसरी टिप्पणी पाठविलेली आहे. याबाबत विषय समजला नसेल तर पुन्हा पहावा. सर्व समाजाच्या लोकांनी अंतविधीसाठी कोठे जावयाचे जागेकरीता पैशाचा विषय या ठिकाणी महत्वाचा नाही. या विषयात मार्ग कसा काढावयाचा हे पहावे याठिकाणी अद्यावत स्मशानभुमी झाली नाही तर आम्हांस नाईलाजास्तव रस्त्यावर उतरावे लागेल याची आपण नोंद घ्यावी.

सदर प्रस्तावामध्ये व जागेत झालेल्या कंम्पौंड वॉल बाबत इंजिनियर यांना निलंबनाचा विषय होवू शकत नाही. तेंव्हा या विषयावरचा संपूर्ण अभ्यास करुन मार्ग काढावा व अशा पध्दतीने विषय पुढील सभेपुढे न्यावा असे सांगितले.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये झालेली व्यापक चर्चा नुसार सदरचा विषय पुढील महासभेपुढे पुनश्च सादर करावा. सदर प्रस्तावास प्राधान्य देण्यांत यावे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.भानुदास कोतकर

अनुमोदक : मा.श्री. सुनिल त्रिपाठी.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक : २८-०७-२००८.

---

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर शहर बससेवा परिवहन उपक्रमाबाबत बँक गॅरंटी, रॉयल्टी , बालकुपोषण कर, प्रवासी कर, अनुदान इ.बाबींबाबत विचार विनिमय करणे व निर्णय घेणेस्तव ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहर बस वाहतूकीच्या बसेस थकीत कर्जहप्त्यापोटी दि.महानगर को-ऑप बँक यांनी दि. १/७/२००८रोजी सिलबंद केल्यानंतर बस सेवा पूर्ववत चालू करणेबाबत अभिकर्ता संस्था यांचे चेअरमन व सेक्रेटरी यांच्या समवेत मा.पदाधिकारी / अधिकारी यांनी दि.१/७/२००८ व २/७/२००८ रोजी चर्चा करून अभिकर्ता संस्थेस लेखी खुलासा करणेकामी दि.३/७/२००८ रोजी दुपारी ११.०० वाजेपर्यंत मुदत दिली असता संबंधित संस्थेने कोणताही खुलासा केला नसल्याने इकडील संदर्भिय ३ नुसार अभिकर्ता संस्थेस नोटीस बजावण्यात आली असता व खुलाशाबाबत २४ तासाचा अवधी दिला होता. मध्यंतरीच्या काळात बस सेवा पूर्ववत चालू करणे बाबत पदाधिकारी / काही संघटना , नागरिक यांनी निवेदने देवून तसेच मा.आयुक्त यांना समक्ष भेटून बस सेवा तातडीने पूर्ववत करणेबाबत विनंती केली होती. यातच दि.४/७/२००८ रोजी शासकीय विश्रामगृह येथे काही नगरसेवक व नागरिक यांनी मा.आयुक्त यांना घेराव घालून बस सेवा पूर्ववत करणे बाबत आग्रह धरला असता येथे अभिकर्ता संस्थेच्या चेअरमनला पाचारन करून त्यांचेशी चर्चा करण्यात आली. चर्चेत चेअरमन अभिकर्ता संस्था यांनी संदर्भिय पत्र ५ नुसार बस सेवा पूर्ववत करणेकामी मागणी केलेली आहे.या अनुषंगाने पूढील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने अकोला, औरंगाबाद महानगरपालिकेच्या धर्तीवर नागरीकांच्या सोयीकरीता मा.शासनाचे पूर्व मंजूरीनुसार शहर बस सेवा परिवहन उपक्रम अभिकर्ता संस्था अहमदनगर प्रवासी व मालवाहतूक सहकारी संस्था मर्यादित नेमून दि. १ जानेवारी २००७ पासून सुरू केलेली आहे

सदरची बससेवा सध्या शहरातील वेगवेगळया मंजूर मार्गावर चालू आहे. शहर बससेवा सुरू करतेवेळेस अभिकर्ता संस्था व अहमदनगर महानगरपालिका यामध्ये करार झालेला आहे.या उपक्रमापोटी अभिकर्ता संस्थेने रू. २५ लाखाची बॅक गॅरंटी महानगरपालिकेकडे जमा केली आहे. करारनाम्यानुसार बसेस महानगरपालिकेच्या नावे असून बस सेवेबाबतचे सर्व कर, हप्ते भरण्याचे जबाबदारी अभिकर्ता संस्थेची आहे अभिकर्ता संस्था यांनी बस सेवा आर्थिक तोटयात असल्याचे कारण दाखवून दि. २४/११/२००७ पासून तिकीट विक्रीचे उत्पन्न एकत्रित बॅक खात्यात भरलेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेची रॅायल्टी शासकीय कर, बॅक हप्ते, थकीत राहीलेले आहे. कर्ज हप्ता थकविल्याने व महानगर बॅकेने तगादा लावल्याने मा.महापौर साहेब, यांचे दालनामध्ये दि. २९/१/२००८ रोजी अधिकारी व पदाधिकारी यांची मिटींग होवून अभिकर्ता संस्थेचे बॅक गॅरंटीमधून रू. १० लाख कर्ज हप्त्यापोटी भरणेबाबत ठरले होते. त्यानुसार रू. २५ लाखाच्या बॅक गॅरंटीमधून महानगर बॅकेस कर्ज हप्ता करीता रू. १० लाख रूपयाचा डि.डि. क्र. ०९२६८० दि. ५/२/२००८ कॅनरा बॅकेचा देण्यात आला होता. त्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.१४, दि. १६/२/२००८ अन्वये मंजूरी घेण्यात येवून बॅक गॅरंटी पूर्ववत करण्याविषयी अभिकर्ता संस्थेस पत्र दिले होते.

तसेच अभिकर्ता संस्थेस मोव्हे जा.क्र.५०७, दि. २९/१/२००८ अन्वये नोटिस दिली होती. तथापि अभिकर्ता संस्थेने एकत्रित बॅक खाते तिकीट विक्रीची रक्कम भरलेली नसल्याने महानगरपालिका रॅायल्टी शासकीय कर बॅक हप्ते थकीतच राहीलेली आहेत. या संदर्भात महानगर बॅकेने परत पत्र देवून थकीत कर्ज हप्त्यापोटी रू. ५,९१,२००/- भरणेविषयी दि. ९/४/२००८ व १७/४/२००८ नुसार कळविल्याप्रमाणे अभिकर्ता संस्थेची चर्चा करून समक्ष भेटून तसेच पत्रव्यवहार करूनही एकत्रित बॅक खात्यात पैसे भरलेले नाहीत. यास्तव बॅकेचा थकीत कर्ज हप्ता भरणेविषयी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविला असता मा. स्थायी समिती ठराव क्र.७, दि. १३/५/२००८ अन्वये सदरचा विषय पुढील सभेत घेणेबाबत ठरले होते. दरम्यानच्या काळात बॅक हप्ता थकीत रक्कम वाढली असून रू. १०,३६,५२०/- इतकी रक्कम भरणेविषयी बॅकेने कळविले होते. याबाबतचा प्रस्ताव देखील मा.स्थायी समितीकडे दिला असता मा. स्थायी समिती ठराव क्र.१२, दि. १६/६/२००८ अन्वये मंजूरी घेवून रू. १०,३६,५२०/- कर्ज हप्त्यापोटी उर्वरीत रूपये १५ लाखाच्या बॅक गॅरंटीमधून भरणेबाबत सदर ठराव पारित झाला होता. सदर ठरावा अन्वये अभिकर्ता संस्थेने दि.१६/६/२००८ पासून एकत्रित बॅंक खात्यात पैसे भरणे आवश्यक होते. तथापी अभिकत्याने ठरावाप्रमाणे कार्यवाही केली नसल्याने बॅंक गॅंरटी मधून कर्ज हप्ता रक्कम अदा करता आली नाही . दरम्यानच्या काळात दि.१/७/२००८ रोजी संदर्भिय पत्र क्र.१ नुसार महानगर बॅकेने शहर बस वाहतूकीच्या बसेस जप्त केल्या होत्या याबाबत मा.आयुक्त कार्यालयात महानगरपालिकेचे मा. पदाधिकारी,अधिकारी अभिकर्ता सेंस्थेचे चेअरमन बॅक मॅनेजर, यांची सलग दोन दिवस दि. १/७/२००८ व २/७/२००८ रोजी बैठक झाली. परंतू यातून योग्य मार्ग न निघाल्याने अभिकर्त्यास त्याचे म्हणणे लेखी स्वरूपात देणेबाबत सांगितले. तसेच महानगरपालिकेने अभिकर्ता संस्थेस मो.व्हे.जा.क्र. ११९, दि. ३/७/२००८ अन्वये नोटिस देखील बजावली. शासकीय विश्रामगृहावर मा. पदाधिकारी, अधिकारी, अभिकर्ता संस्थेचे चेअरमन श्री. दारकुंडे, व महानगर बॅक मॅनेजर यांची संयुक्त चर्चा होवून शहर बस वाहतूक दिनांक ४/७/२००८ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर बैठकीत चेअरमन अभिकर्ता संस्था यांची वरील संदर्भिय पत्र क्र.५ नुसार मागण्या केलेल्या असून त्यांनी रॉयल्टीची रक्कम कायमस्वरूपी माफ करावी दि.१/११/२००७ पासून प्रवासी कर महानगरपालिकेने भरावा दि.१/४/२००८ पासून महानगरपालिकेने जनसेवेचा उपक्रम समजून संस्थेला होणा-या तोटयाच्या प्रमाणात अनुदान देण्यात यावे अशा मागण्या केलेल्या आहेत.

अभिकर्ता संस्थेची महानगरपालिकेकडे दि.२४/११/२००७ पासून ३०/६/२००८ पर्यंत रॉयल्टीची रककम रू. ६,५२,५६४/- इतकी थकीत असून प्रवासी करापोटी रक्कम ३,३५,९७३/- तसेच बाल कुपोषण करापोटीची रक्कम ३,३७,७८७/- इतकी थकीत आहे .

अभिकर्ता संस्थेने दि.१/१/२००७ पासून बस सेवा चालू केल्यानंतर दि.२३/११/२००७ पर्यंत महानगरपालिकेस आतापर्यंत रू.१०,८३,६६० /- इतकी रक्कम रॅायल्टी पोटी नियमानुसार जमा केली आहे.

अभिकर्त्याच्या वरील मागणीनुसार महानगरपालिका निधीवर पुढील प्रमाणे वार्षिक आर्थिक अधिभार पडणार आहे.

| अ.नं. | मागणीचा तपशील | मागणी मान्य केल्यास पडणारा वार्षिक अधिभार |
|---|---|---|
| १ | रॅायल्टी माफ करणे. | रू.११.०० लाख (अंदाजे) |
| २ | प्रवासी कर व बाल कुपोषण कर म.न.पा.ने भरणे. | रू.१०.०० लाख (अंदाजे) |
| ३ | अनुदान ( सरासरी महिना १.०० लाख गृहीत धरून) | रू.१२.०० लाख |

अभिकर्ता संस्थेच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे दि.२४-११-२००७ पासून रॉयल्टीची रक्कम कायमची माफ करणे, व तसेच अभिकर्ता संस्थेच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणेचा निर्णय घेण्याचा अधिकार महासभेला आहे. अशी आमची धारणा आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेसमोर निर्णयास्तव ठेवणे योग्य वाटते. तथापि आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत बाब धोरणात्मक स्वरूपाची असलेमुळे म.न.पा.सभेने निर्णय घेणे संयुक्तिक.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, म.न.पा.सभेने निर्णय घेणे संयुक्तिक.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसार सदरचा विषय मा.महासभेसमोर निर्णयार्थ ठेवणे योग्य. सबब मा.महासभेसमोर ठेवण्याच्या मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, बँकेच्या कर्जापोटी यापुर्वी भरणा केलेले रू.१० लाख व आता रू. १०.३६ /- स्थायी समितीच्या मंजुरीने दिले आहे. चर्चेच्यावेळी अहमदनगर प्रवासी व मालवाहतुक संस्थेकडुन तारण घेण्याचे ठरले. गहाणखत स्टॅम्प पेपर वर लिहून नोंदणीकृत केले किंवा नाही माहिती द्यावी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, उपायुक्त (कर) यांचेशी झालेल्या चर्चेनुसार प्रस्ताव मा.महासभेच्या निर्णयार्थ सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.आयुक्त यांचे मताशी सहमत. प्रस्ताव सभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मुख्यलेखापरिक्षक , मुख्यलेखाधिकारी , मा.उपायुक्त (कर) , मा.आयुक्त साहेब , मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- सन २००५ मध्ये महानगरपालिका शहर बससेवा विषय मंजूर झालेला होता. व प्रत्यक्षात १ जानेवारी २००७ पासुन शहर बससेवा कार्यान्वीत झाली. यामध्ये संस्थेशी १० वर्षाचा कायदेशिर करार झालेला आहे. तसेच ७ टक्के रॉयल्टी महानगरपालिकेला मिळालेली असल्याने व संस्थेने चांगली सेवा दिलेली होती. मधील काळात अभिकर्त्यास डिपॉझिट कोणत्या कायद्याने परत दिले व ठरविलेली रॉयल्टी माफ केलेली आहे काय. व दरमहा संस्थेला १ लाख रुपये अनुदान देणार आहात मग महानगरपालिके वर १ कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. त्याऐवजी महानगरपालिकेने परिवहन बससेवा चालू करावी व त्याबाबतची कार्यवाही करावी. सदर संस्थेकडे असलेल्या थकबाकी बाबत फौजदारी करावी. ही बससेवा पुनःश्च चालू करावी ठेकेदारास झुकते माप का देण्यांत येत आहे. त्यांचेवर त्वरीत कार्यवाही करावी व बससेवा चालू करावी. सदर ठेकेदाराने दिलेले डिपॉझिट आपण परत करु शकतो का.

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिका इतिहासामध्ये या गंभीर चूका करीत आहे त्यामध्ये ही एक गंभीर चूक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यांत येणारी सेवा नफ्यात चालू आहे. आपल्या शहरात मात्र ती का तोट्यात चालते हे समजू शकत नाही. याबाबत पुरवणी टिप्पणी स्वागतार्ह आहे. आयुक्त यांचे कायदेशिर मत घेणे आवश्यक होते. अभिकर्त्याने कराराचा वेळोवेळी भंग केलेला आहे. संस्थेकडुन डिपॉझिट कोणत्या स्वरुपात घेतले आहे. व त्यावर अनुदानाची खैरात केली जात आहे. करार रद्द करुन दुस-या ठेकेदारास ही सेवा चालविण्यास द्यावी. ठेकेदारास कुठल्या आधारे पत्र दिले आहे याचा खुलासा करावा.

यावर श्री.निकम यांनी कराराच्या बाब क्रमांक ४ बँक गॅरंटी बाबत खुलासा केला.

मा.उपमहापौर :- कराराप्रमाणे ठेकेदारास नियमानुसार एक महिन्याची नोटीस द्यावी लागत आहे. नागरिकांची गैरसोय होवू नये म्हणुन त्याकडे पहाणे आवश्यक आहे. ठेकेदार कोर्टातही जावू शकतो. त्या करीता वेळोवेळी मिटींगा घेवून तडजोडीचा प्रयत्न केलेला आहे. परंतु ठेकेदार प्रतिसाद न देता पैसे संयुक्त खात्यात भरत नाही. व काय करायचे करा असे ठेकेदार उत्तर देत आहे. ठेकेदार ६ महिन्यापासुन पैसे भरीत नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण एक दिवसात सेवा बंद करु शकतो. परंतु ठेकेदार महानगरपालिकेच्या मानगुटीवर बसण्याचा प्रयत्न करीत आहे.

मा.श्री.अनंत जोशी :- बससेवे बाबतचा कायदेशिर करार रद्द करावा व कारवाई करावी. त्याबाबत आम्ही तुमचे पाठीशी आहोत.

मा.श्री.फुलसौंदर :- महानगरपालिका बससेवा चालू करावी.

मा.श्री.त्रिपाठी :- शहर बससेवेचे श्री.दारकुंडे यांनी प्रशासनास मुर्खात काढले आहे. रॉयल्टी माफ वगैरे करणे व अनुदान देणे हे बेकायदेशिर आहे. आर्थिक अनुदान देवू नये योग्य मार्ग काढावा. याबाबत सेकंड लोएस्ट श्री.हुंडेकरी यांचे ६.२ च्या रॉयल्टीचे देणारे ठेकेदार यांना निविदा देवू शकतो काय ? तो विचार करावा व सदरचा विचार तीन ते चार महिन्यापूर्वीच केला पाहिजे होता. आता सदर संस्थेला कोणतेही मानधन देवू नये.

मा.श्री.मिलींद गंधे :- शहर बससेवा ही फायद्यात आहे. परंतु ठेकेदार यांना होणा-या त्रासाबद्दल प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे. रिक्षांवाल्यांकडूनही शहर बससेवेची अडवणूक होत आहे. शहर बससेवेला लागणारे थांबे आपण दिलेले नाहीत. मुलभुत सुविधाही आपण दिलेल्या नाहीत. मात्र लोकप्रतिनिधींच्या ठेकेदाराला देण्यात येणा-या खैरातीला विरोध आहे. भाजपा शिवसेना यांचा यास विरोध आहे असे सांगितले.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, १० वर्षाचा करार रद्द करावयाचा असल्यास बँक जामिनदार म्हणुन आपणांस नियमानुसार कारवाई करावी लागेल.

मा.श्री.दिप चव्हाण :- शहर बससेवा एक भावनात्मक नागरिकांच्या सोईसाठी चालू करण्यांत आलेली होती. ठेकेदाराशी केलेला करारनामा झाल्यानंतर पुन्हा करारनाम्याचा प्रश्न व करारनामा बदलण्याचा प्रश्न व त्याबाबतचा अधिकार महानगरपालिका सभेस आहे काय ? त्या बाबतीत अटी व शर्ती बदलण्याचा अधिकार प्रशासनास आहे. व त्यानंतर होणारे परिणामासही प्रशासन जबाबदार असणार आहे. आता याबाबत कायद्याचा विपरीत अर्थ लावून बदल करु नका. या बाबत अशा प्रकारे पायंडा पडून चुकीच्या प्रथा निर्माण होतील. ही प्रथा महानगरपालिकेस परवडणार नाही. अशाच प्रकारे इतर रस्ते व इमारती याबाबतच्या निविदाचे करारनामे होत असतात त्यातही हा प्रश्न निर्माण होवू शकतो. तेंव्हा अटी व शर्ती बदलण्याचा अधिकार आयुक्त यांनाच आहेत. एजन्सी करारनामा बदलून देणार आहे काय ? आयुक्तांनी खुलासा केल्यास योग्य होईल.

आयुक्त यांचा करारामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव नाही.

अटी-शर्तीचा भंग केल्यामुळे याबाबतची नोटीस महानगरपालिके मार्फत देण्यात आलेली आहे. कोणत्याही करारनाम्याचा विषय मागणी मान्य करता चूकीच्या पध्दतीचा अवलंब करु नका सदर प्रस्ताव हा पुढील बोर्डात ठेवावा. व अटी शर्ती मान्य करु नये व करणार असल्यास माझा यास विरोध नोंदवावा. सदर महानगरपालिका बससेवेच्या गाड्या या ठेकेदार यांनी अगोदर खरेदी केलेल्या होत्या परंतु नासिक परिवहन कार्यालयामध्ये यामध्ये अडचणी आल्यानंतर सदरच्या गाड्या या महानगरपालिकेच्या नावावर केल्या गेल्या. लायसन्स न दिले गेल्यामुळे महानगरपालिकेच्या नावावर केले आहे व नंतर असे नांव लावले आहे.

तेंव्हा एकही मागणी मान्य करु नये व चूकीचा पायंडा पाडू नये याबाबत औरंगाबाद येथील बससेवेची पहाणी करावी व तेथे कशा प्रकारे चालविली जात आहे याबाबत माहिती घ्यावी.

मा.श्री.अशोक कानडे :- शहर बससेवा चालू केल्या नंतर नागरिकांना मोठ्या प्रमाणावर आनंद झालेला होता. व ठेकेदार सुरुवातीस चांगली सेवा देत होता व यामध्ये त्यावेळेस कुठलेही राजकारण न करता प्रस्ताव मंजूर होवून पाठींबा दिलेला होता. मात्र आता शहर हद्दीतील समाविष्ठ झालेल्या १२ गावातील नागरिकांचे प्रश्न उपस्थित ठेवून त्यांना वेठीस धरीत आहे. नागरिकांना बससेवेचा लाभ होत होता. व बाहेरील नागरिक नगर शहरात आल्यानंतर ५ ते ७ रुपयांमध्ये शहर बससेवेने ते एम.आय.डी.सी.पर्यंत जात होते व त्यावेळेस ते खरोखर धन्यवादास पात्र होते.

मात्र ठेकेदाराला पुरविल्या जाणारे आर्थिक सवलती महानगरपालिकेच्या हिताविरुध्द आहे असे आमचे मत आहे. सामान्य माणसांसाठी याबाबतचा निर्णय झाला पाहिजे. आज आपल्या समोर ज्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत त्यामुळे ठेकेदाराला धड सोडता येत नाही व धरताही येत नाही. अशी अवस्था निर्माण झालेली आहे. व सर्व साधारण सभेसही वेठीस धरत आहे. त्यामुळे संस्थेवर कडक कारवाई केली पाहिजे.

मा.श्री.कृ.द.जाधव :- शहर बससेवेबाबत बरीच चर्चा झालेली आहे. यासाठी इन्स्पेक्शन बंगल्यावर मिटींगा झाल्या. त्याठिकाणी चर्चेच्या ओघामध्ये ठेकेदारास रॉयल्टी माफ करुन १ लाख रुपये देवू टॅक्स माफ करु इत्यादी चर्चेवर ठेकेदार तयार झाले. त्यासाठी सर्व अधिकारी सदर ठिकाणी उपस्थित होते. व त्यांनी बोलाविल्यामुळे चर्चा केली. आयुक्त यांनी करण्यात येईल असे सांगितले. व याबाबत तेथेच स्पष्टपणे सांगितले असते तर ठराव करु शकतो तर अशा रितीने विषय आला नसता. अधिकारी त्यास सहमत होते. विषय घेतल्यानंतर ऑफिसने त्यावर आपले पक्के मत द्यावे प्रशासनाने मोठी चूक केली तर त्यास कोणास प्रायश्चित्त द्यावयाचे ही जबाबदारी प्रशासनाची आहे. सर्व अधिकारी यांचेबरोबर चर्चा केलेली आहे.

मा.श्री.शं.ह.घुले :- अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. अनेकांनी मते मांडलेली आहेत. त्यामध्ये मा.श्री.अशोक कानड, मा.श्री.जाधव यांनीही मत मांडले आहे. मात्र ऑफिस रिपोर्ट वेगळा आलेला आहे. त्यामुळे ठेकेदारास धरल तर चावतं आणि सोडलं तर पळत अशी अवस्था आहे. २५ लाख रुपयांच्या बँक गॅरंटीमधुन २० लाख रुपये स्थायी समिती ठरावान्वये दिलेले आहेत. व ५ लाख रुपये शिल्लक आहेत. याबाबत मला विनंती करावयाची आहे की, केळकर साहेब यांनी या गोष्टीस पाठींबा दिलेला होता असे दिसून आले. व बी.ओ.टी.तत्वावरील विषय होता तर त्यास आपणांस अनुदान देता येते काय. बँक गॅरंटी महानगरपालिका वसूल करणार आहे काय ? शहर बससेवा ही सर्व सामान्यांसाठी चालू राहिली पाहिजे. या बाबत आयुक्त यांनी खुलासा केला पाहिजे असे सांगितले.

आयुक्त :- सर्व प्रकारचा निर्णय महासभेने घेतला जाईल व महासभेचा तो अधिकार आहे. असे सांगितले. मी अहमदनगर येथे आयुक्त पदावर नविनच रुजू झालेलो होतो व या प्रस्तावाबाबत मार्ग काढण्यास व गैरसोय दूर करण्यास मी प्रयत्नशिल होतो. ठेकेदारास रु.१० लाख देण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतला होता व बससेवा सुरु झाली. दुहेरी टिपणी मान्य नाही परंतु अधिकारी बेजबाबदारपणे टिपणी देतात. सभागृहामध्ये घेतलेला निर्णय हा लोकमताचा व लोकभावनेचा निर्णय होईल.

संस्थेचे श्री.दारकुंडे हे आर्थिक दृष्टया सक्षम आहे किंवा नाही हे त्यावेळेस पाहिले गेले नाही. शहर बस वहातुकीच्या ११ सदस्यांनाही याबाबत नोटीसा दिलेल्या आहेत.

अमरावती येथे शहर बससेवा फायद्यात आहे.

मा.श्री.कैलास गिरवले :- आर्थिक मागण्या स्विकारु शकत नाही ते चूकीचे आहे. या बाबत पुरवणी करार केलेला आहे. त्यामध्ये महानगरपालिका जबाबदार रहाणार नाही असे म्हटले आहे. याबाबत संघटनेच्या प्रवासी मालवाहतुक सहकारी संघटनेची सर्व माहिती घेवून त्यावर बोजा चढवावा. श्री.दारकुंडे यांनी २४/११/२००७ पासुन संयुक्त खात्यात कोणतेही पैसे भरलेले नाही. पैसे

भरण्याचे बंद केले आहे. त्यांना नोटीस दिलेली नाही. यामध्ये भिन्याचे कारण नाही. यामध्ये महानगरपालिकेचे ३० लाखाचे नुकसान झालेले आहे. व कराराचा भंग झालेला असल्यामुळे त्याबाबत त्यांची मालमत्ता जप्त करावी.

मा.श्री.घुले :- सदर बाबतीत फौजदारी गुन्हा दाखल करावा.

यावर आयुक्त यांनी सांगितले की, सर्व सदस्यांच्या भावना जाणुन घेणे आवश्यक आहे. यावर सर्व कागदपत्रे जमा करुन पाहुन कार्यवाही केली जाईल.

मा.श्री.अभय आगरकर :- यामध्ये सर्व सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. शहर बससेवा रद्द व्हावी किंवा ती चालवू नये असे वाटत नाही.

बससेवेचे श्री.दारकुंडे अयशस्वी का ठरले याची कारणे काय आहेत याबाबत खुलासा करावा. त्यांना पत्र दिले आहे काय.  सदर बाबतीत बँक गॅरंटी कमी केल्याने लायबलिटीज कमी होत आहे. त्यामध्ये प्रशासन दुटप्पी भुमिका घेत आहे यास आमचा विरोध आहे. सदर बाबतीत त्या संस्थेला काय पत्र देण्यांत आले ते वाचून दाखवावे.

ते वाचून दाखविण्यांत आले.

संस्था पैसे भरत नसेल तर स्थायी समितीने मंजूर करण्याचे कारण काय आहे. त्यामध्ये आमचे समाधान होत नाही. संस्था अटी व शर्तीचा भंग करीत असेल तर त्यांची मानसिकता लक्षात आली पाहिजे. अटी व शर्तीचा भंग एका बाजूने झाला व दोन्ही बाजूने झाला तर काय. याबाबतचा खुलासा करावा. हा विषय गाभिर्याने घेतलेला नाही.

यावर मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम यांनी खुलासा केला संस्थेला पत्र दिले आहे. व शक्य ती सर्व मदत केली आहे.

यावर आगरकर यांनी सांगितले की, महानगरपालिका कोणत्या स्टेप घेणार आहेत याचा निर्णय घ्यावा. शहर बससेवेसाठी महानगरपालिकेच्या वतीने बस थांबे बांधुन दिलेले नाहीत. यास कालावधी का लागलेला आहे याचा खुलासा करावा.

याबाबत निकम यांनी खुलासा केला.

बँक गॅरंटी मधुन पैसे देणे बाबतचा विषय हा सर्व साधारण सभेपुढे यावयास पाहिजे होता. तो तसा स्थायी समितीपुढे का ठेवला. जर स्थायी समितीस अधिकार आहेत असे म्हणता तर मग सदरचा विषय जनरल बोर्डापुढे का ठेवला.  बँक गॅरंटी कमी करीत असतांना लायबलिटी कमी केलेली आहे. प्रशासन याबाबतीत दुटप्पी भुमिका घेत आहे यास आमचा विरोध आहे. बँक गॅरंटी कमी का केली. ११ व्या महिन्यापासुन बेकायदेशिरपणे पैसे भरत नसतांना स्थायी समितीने मंजूरी देवून पैसे भरण्याचे कारण काय ?  याबाबतीत ठेकेदार यांना ॲग्रीमेंट टर्मिनेट का करु नये अशी नोटीस देवून समज दिली पाहिजे होती. प्रशासन कुठलाही विषय गांभिर्याने घेत नाही.

यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, स्थायी समितीकडे स्पष्ट विषय मांडलेला आहे. व एकवेळ सदरचा विषय तहकुब ठेवलेला होता.

यावर मा.श्री.आगरकर यांनी सांगितले की, रिपोर्ट ठेवलेला नाही व त्यामधील त्रुटी रिपोर्टात ठेवलेल्या नाहीत त्याबाबत लिगल रिटेनर यांनी काय लिगल ओपिनियन दिले आहे. त्याबाबत प्रशासनाने ठोस भुमिका घेवून अनुदान देवू नये अभिकर्ता सक्षम नाही. त्याबाबत योग्य ती कायदेशिर कार्यवाही करावी. याबाबत आपण पर्यायी व्यवस्था काय करु शकतो याचा खुलासा करावा.

आयुक्त या विषयावर गांभिर्यपुर्वक चर्चा घडवुन आणली व सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या याबद्दल आभार मानतो. या विषयांमध्ये लोकभावनेशी नाळ जोडलेली असल्यामुळे करार टर्मिनेट करण्यापुर्वी सर्वांचे मत घेणे आवश्यक होते. शहर बस सेवे बाबत अकोला अमरावती इत्यादी ठिकाणची माहिती घेतली असता सदर ठिकाणी ५ वर्षापासुन सेवा सुरळीत चालू

आहे. नगरमध्येच असे का होते हे समजू शकत नाही. मक्तेदार हा असफल व आर्थिक दृष्टया सक्षम नाही. बस गाड्या महानगर बँकेकडून जप्त केल्या गेल्या यामध्ये नागरिकांना त्रास झाला व आंदोलने झ ाली या स्थिती बाबत इन्स्पेक्शन बंगल्यावर निर्णय घेतला गेला. व आर्थिक बाबीशी निगडीत जनरल बोर्ड सभेपुढे विषय ठेवण्यात आला आहे. व त्यानुसारच सदरचा प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे आला. दोन टिपणी याबाबत देण्यात आल्या. दोन टिपण्या बाबत अधिक माहिती घेवून पुरक टिपणी या बाबत दिलेली होती. बँक गॅरंटी २५ लाख रुपयांची घेतलेली होती करारामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, अभिकर्ताचे दायित्व अदा करण्यासाठी बँक गॅरंटीचा वापर केला जाईल व बँक गॅरंटी महानगरपालिकेकडे राहील परंतु ठेकेदाराने बँक गॅरंटीतील रकमा परत तारण देण्यास नकार दिला याबाबत चर्चा केली होती. महानगरपालिकेकडे परिवहन समिती नसल्यामुळे स्थायी समिती सक्षम आहे.

मा.श्री.घुले :- महानगर बँकेने ज्याप्रमाणे गाड्या जप्त केल्या होत्या त्याप्रमाणे आपला काही निर्णय होईल का. महासभा सक्षम आहे.

मा.श्री.महापौर :- नगर शहरामध्ये जानेवारी २००७ मध्ये शहर बससेवा सुरु केलेली होती व शहर बससेवा सुरु असली पाहिजे अशी भुमिका होती. व बससेवा बंद पडु नये याबाबत ठेकेदार यांचेशी वेळोवेळी अधिका-यांनी व पदाधिका-यांनी चर्चा केलेली आहे. याबाबत गरज महानगरपालिकेस जास्त आहे. महानगरपालिकेस ठेकेदार यांनी वेठीस धरले आहे. याबाबतीत मा.सदस्य सर्वश्री.आगरकर, जोशी, गंधे यांनी बससेवा चालू राहिली पाहिजे व नविन ठेकेदार नेमुन बससेवा सुरु ठेवावी व काय मार्ग काढु शकतो याबाबतीत तांत्रिक बाबीतपासुन कायदेशिर कठोर कारवाई करण्याबाबत महासभा मान्यता देत आहे असे सुचविले.

यावर मा.श्री.गिरवले यांनी सेकंड लोएस्ट ठेकेदार कंपनी यांचे टेंडर विचारात घेवू शकतो काय ते पहावे त्याबाबत महासभा सर्व अधिकार देत आहे असे सुचविले.

यावर मा.श्री.आगरकर यांनी सांगितले की, याबाबतीत कायदेशिर अडचणी दूर केल्या पाहिजेत.

--*--

**ठराव :** या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होवुन अहमदनगर शहर बस सेवा लोकहिताच्या दृष्टीकोनातुन सुरू राहाण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी योग्य ती कार्यवाही करावी. तथापि अभिकर्ता अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्या.यांचेकडुन वेळोवेळी बस सेवा बंद केली जाते . महानगरपालिकेस देय असलेली रक्कम व दैनंदिन वसुल झालेली रक्कम संयुक्तीक खात्यात भरणा करीत नाहीत. या विषयी करारातील कायदेशीर अडचणी सोडविण्याच्यादृष्टीने कायदे तज्ञांचा अभिप्राय घेण्यात यावा. अभिकर्ता संस्थेस वेळोवेळी लेखी / तोंडी सुचना देवुन सुधारणा करण्यास संधी दिली असुन सुध्दा अभिकर्ता संस्था उचित सुधारणा करीत नसल्याचे दिसुन येत आहे. यास्तव अभिकर्त्या विरूध्द कठोर कार्यवाही करावी. अभिकर्त्यास रॉयल्टी माफी व अनुदान देवु नये. नविन योग्य ठेकेदार नेमणुकीच्या दृष्टीने देखील कार्यवाही करावी. असा ठराव सर्वानमुते मंजुर करण्यात येत आहे.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव

अनुमोदक : मा.श्री.अशोक कानडे

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ९ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर प्रारूप विकास योजना ( वाढीव हद्द ) - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रारूप विकास योजना (वा.ह.) प्रसिध्द करणे व कलम ३० अन्वये मा.शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे तसेच कलम २१, २८ व ३० अन्वये आवश्यक असलेल्या मुदतवाढी मंजुर करणेबाबत.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्र.एम.यु.बी / ११७३ /२०६६२ / प्र.क्र.५५/८९/ नवि-१६ दि.२९/६/९९ अन्वये अहमदनगर शहराची हद्दवाढ मंजूर करण्यात आली असून दि. १/७/१९९९ पासुन अंमलात आलेली आहे. सदर हद्दवाढीनुसार नव्याने हद्दीत समाविष्ट झालेल्या क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना तयार करण्याचा इरादा नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६ दि.९/१०/१९९९ अन्वये जाहिर करण्यात आला.

सदर वाढीव हद्दीची विकास योजना तयार करणेकामी मा. उपसंचालक नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे दि.२३/३/२००० च्या आदेशान्वये मा.सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांची "नगररचना अधिकारी " म्हणून नेमणूक केलेली असून मा.संचालक नगररचना, म.राज्य पुणे त्यांचे दि.१९/७/२००० चे आदेशान्वये तत्कालीन नगर परिषदेच्या आस्थापनेवर दि. १/८/२००० पासून विशेष घटकाची निर्मिती करुन विकास योजना विशेष घटक (वाढीव हद्द) हे कार्यालय कार्यान्वीत करण्यात आलेले आहे.

सदर कार्यालयाने दि. ५/९/२००२ रोजी विद्यमान जमिन वापर नकाशा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेला आहे. व त्यानंतर अधिनियमातील तरतूदीनुसार वेळोवेळी मा. शासनाकडून मुदतवाढी मंजूर करुन घेउन तयार केलेला प्रारुप विकास योजना आराखडा प्रसिध्द करण्यास महासभा ठराव क्र.७ दि.१७/५/२००६ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून दि. २७ जुलै २००६ च्या राजपत्रात ती प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रारुप विकास योजना (वा.ह) प्रसिध्दीकरणा नंतर हरकत / सुचना दाखल करण्याची ६० दिवसाची विहीत मुदत दि. २५/९//२००६ रोजी संपलेली आहे. सदर मुदतीत एकूण २४२ / हरकत/ सूचना अर्ज महानगरपालिकेकडे दाखल झालेले आहेत. तथापी मा. महासभेने ठराव क्र. ४ दि. ३/११/२००७ अन्वये हरकत/ सूचना दाखल करण्याची मुदत ही दि. ३०/११/२००७ पर्यंत वाढविलेली आहे. सदर वाढीव मुदतीत १७२ असे एकूण ४१४ इतके हरकत / सूचना अर्ज दाखल झालेले आहेत.

प्रारुप विकास योजना (वा.ह) संदर्भात दाखल झालेले हरकत/ सुचना अर्जधारकांना सुनावणी देणेसाठी गठीत करावयाच्या नियोजन समितीवर मा.शासनाने दि. ३/४/२००७ रोजी चार शासकीय सदस्यांची नेमणूक केलेली असून उर्वरित तीन स्थायी सदस्यांची नेमणूक मा. महापौर साहेब यांनी दि. ३/९/२००७ रोजी केलीआहे.

अशारितीने दि. ३/९/२००७ रोजी अस्तित्वात आलेल्या नियोजन समितीने दि.२१/१/२००८ ते २४/१/२००८ या कालावधीत सर्व हरकत/ सूचना धारकांचे म्हणणे समक्ष ऐकून घेउन, प्रत्यक्ष स्थल निरीक्षण करुन दाखल झालेल्या कागदपत्रांची पहाणी करुन व कायदेशिर बाबींचे अवलोकन करुन हरकत/ सूचना अर्जावर निर्णय घेतलेला आहे. व त्यानूसार तयार केलेला योजनेचा आराखडा दि. ४/६/२००८ रोजी महानगरपालिकेकडे सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रारुप विकास योजना (वा.ह) आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम सन १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्द करणे व कलम ३० अन्वये मा.शासनाकडे मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

तसेच या विकास योजने संदर्भात महाराष्ट्र प्रोदशिक व नगररचना अधिनियमा प्रमाणे खालील कलमान्वये मुदतवाढी मंजूर करणे आवश्यकत आहे.

१ कलम २१ अन्वयेची मुदतवाढ :-

म.प्रा.व.न.र. अधिनियमाच्या कलम २१ अन्वये कोणतेही क्षेत्र महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर या क्षेत्राची ३ वर्षाच्या आत विकास योजना तयार करुन ती शासनास सादर करणे अनिवार्य असते तथापी या मुदतीत उपरोक्त विकास योजना शासनास सादर होउ शकली नाही. याकामी वेळोवेळी मुदतवाढी घेण्यात आलेल्या आहेत. कलम २१ अन्वयेची शेवटची मुदतवाढ दि. ३१/१२/२००७ पर्यंत घेण्यात आलेली आहे. तथापी याही मुदतीत सदर विकास योजना शासनास सादर होउ शकलेली नाही.

आता याबाबतची सर्व कायदेशिर कार्यवाही पूर्ण झालेली आहे. व लवकरच ही विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात येईल. त्यामुळे कलम २१ अन्वये दि. ३१/१२/२००७ ते ३०/१२/२००८ पर्यंत मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे.

२. कलम ३० अन्वयेची मुदतवाढ :-

प्रारुप विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर उक्त कायदयाच्या कलम ३० मधील तरतुदीनुसार ही विकास योजना प्रसिदध्दीच्या दिनांकापासून १२ महिन्याच्या आत किंवा वेळोवेळी दिलेल्या वाढीव मुदतीत शासनाकडे सादर करणे आवश्यक असते. मा. महासभेने या कलम ३० अन्वयेची शेवटची मुदतवाढ दि.२६/७/२००८ पर्यंत मंजूर केलेली आहे. तथापी विकास योजनेचे राहिलेले काम विचारात घेता ही विकास योजना दि. २६/७/२००८ पर्यंत शासनास सादर करणे शक्य होणार नाही. सबब या कलमान्वये देखील दि. २७/७/२००८ ते ३१/१२/२००८ या कालावधीसाठी मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

३. कलम २८ अन्वयेची मुदतवाढ :-

दि. ३/९/२००७ रोजी नियोजन समिती पुर्णपणे गठीत झाल्यानंतर उक्त कलमान्वये दोन महिन्यापर्यंत म्हणजेच दि. ३/९/०७ ते २/११/०७ अखेर नियोजन समितीने त्यांचा अहवाल नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक आहे. परंतू नियोजन समितीने सदरचा अहवाल विहीत मुदतीत सादर न केल्यामुळे पुढील मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. नियोजन समितीने दि. ४/६/२००८ च्या पत्रान्वये त्यांचा अहवाल नियोजन प्राधिकरणास सादर केलेला आहे. त्यामुळे दि. ३/११/२००७ ते ५/६/२००८ पर्यंत मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

सोबत :- नियोजन समितीचा अहवाल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित अहमदनगर प्रारूप विकास योजना ( वाढीव हद्य ) मंजुरीसाठी मा.महासभेकडे पाठविणेसाठी मान्यतेस्वव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.श्री.अरिफ शेख :- नियोजन समिती सदस्य यांनी प्रास्तविक भाषणात सांगितले की, यासमितीवर आम्हास काम करण्यास संधी दिली त्याबाबत आभार मानतो. यावर आमचे वरिष्ठ नेते दादाभाउ कळमकर, मा. आ. कर्डिले, मा.भानुदास कोतकर, मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.गिरवले, इत्यादी व समिती सदस्य याबाबतीत आम्ही सर्व शहराचा आढावा घेतला. सोईसुविधांची पाहणी केली. नागरिकांच्या हरकती व सूचना यांचा विचारात घेवून समक्ष पहाणी करुन चौकशी करुन तयार केलेला अहवाल सभागृहासमोर मांडला आहे.

मा.श्री.नामदेव पवार :- महानगरपालिकेच्या सभागृहात सन २००६ मध्ये तात्पुरत्या विकास आराखडयासाठी विशेष घटक योजनेसाठी शासनाकडे मागणी केलेली होती. त्याप्रमाणे आपले शहर व हद्दवाढ इत्यादी नियोजनबध्द विकास करण्यासाठी व महानगरपालिकेने आवश्यक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने या शहरातील नागरिकांच्या हरकती व सूचना मागविल्या होत्या. पुर्वी महानगरपालिकेचे क्षेत्र कमी होते. आता महानगरपालिकेचे क्षेत्र वाढलेले आहे त्यामुळे ज्या सेवासुविधा देण्याकरीता यामध्ये शाळा क्रीडांगणे, भाजी मंडई यात विकासात्मक बदल हवे होते त्यासाठी राखीव जागा बाबत वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन तसेच अल्पसंख्य अल्पउत्पन्न, विशेष आरक्षण, भटक्या व विमुक्त नागरिकांना जागा, त्याचप्रमाणे कत्तलखाने, जागा गोठे इ.आरक्षणासाठी ज्याठिकाणी चुकीची आरक्षणे होती . दारिद्रयरेषेखालील नागरिकांसाठी विशेष आरक्षण नाही ते ठेवण्यात यावे. तथापि ब-याच ठिकाणी गरीब शेतक-यांच्या जागेवर आरक्षणे जास्त टाकलेली आहेत मात्र ब-याचशा बिल्डर्सनी ले-आउटस मंजूर करुन घेतले आहेत त्यावर मात्र आरक्षण नाही. हेतुपुरस्सर शेतक-यांच्या जागेवर आरक्षण टाकले आहे असे वाटते. त्यामुळे त्यांच्या हरकती मान्य करणे. खेळाचे ग्राउंडस कमी आहेत त्याबाबतची आरक्षणे दुरुस्त करण्यांत यावीत.

मा.श्री.त्रिपाठी :- पुढील ३० वर्षांचा विचार केलेला आहे. याबाबत जो अहवाल तयार केलेला आहे. त्याबाबत नियोजन समितीचे सदस्य सर्वश्री.अरीफ शेख, सतिष मैड, पवार यांचे आभार मानतो. ब-याचशा शेतक-यांच्या जागेवर आरक्षण टाकलेले आहे. त्यामध्ये उदा - स्वातंत्र्य सैनिक संघटनेचे डॉ.रविंद्र कवडे यांचे सर्व्हे १०४ आरक्षण क्र.३०१ बाबत जे आरक्षण टाकले आहे ते संबंधित मालक अल्पभुधारक असल्यामुळे त्यांना उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे त्यांच्या ४० गुंठयावर आरक्षण टाकलेले आहे. वास्तविक स्वातंत्र्य सैनिकांना जागा देतो मात्र इथे उलट झाले आहे त्यांच्या जागेवर आरक्षण टाकले आहे. तरी त्यांच्या जागेवरील आरक्षण उठवावे.

मा.श्री.कृ.द.जाधव :- श्री.त्रिपाठी यांनी जी सूचना मांडलेली आहे त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे यांचे सर्व्हे नंबर २६४ वरील भाजी मार्केटचे आरक्षण व तसेच सर्व्हे नंबर २८३ व १८९/२ वरील आरक्षण उठवावे.

मा.श्री.फुलसौंदर :- महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्रातील विकास अहवाल सादर करण्यात आलेला आहे. सन १९९९ पासुन हे काम चालू आहे. वेळोवेळी मुदतवाढी घेतलेल्या आहेत. प्लॅनिंग कमिटीने चांगल्या प्रकारे कामे केलेली आहेत. शॉपिंग सेंटरवर नियमाप्रमाणे आरक्षणे आहेत काय व त्याची गरज आहे काय ? शहराचा विकास करतांना ले-आउट मधील १० टक्के जागा ओपन ठेवतो ॲमिनिटीज टाकाव्या लागतात. जे आरक्षण मर्च केलेले आहे. त्याचा भुखंड धारकाला फायदा होतो.

मा.श्री.अभय आगरकर :- विकास आराखडयामध्ये एकाच ठिकाणी तीन-तीन आरक्षणे टाकलेली आहेत. याठिकाणी जास्तीत जास्त शेतकरी भरडले गेले आहेत. विकास योजना राबवितांना सर्व सर्व्हे नंबरचा विचार केला पाहिजे.

मा.श्री.फुलसौंदर :- यामध्ये सर्व सामान्यांचा बळी जात असेल तर ही खेदाची बाब आहे.

मा.श्री.कृद.जाधव :- ज्यांचेवर अन्याय झालेला असेल त्यांची नांवे सांगितली तर त्याचा विचार जरुर करावा. कोणत्या शेतक-यावर अन्याय झाला ते दाखवावे त्याचा विचार जरुर केला जाईज.

मा.श्री.फुलसौंदर :- जी १२ गांवे समाविष्ट झालेली आहेत त्यामध्ये अमरधाम स्मशानभुमीकरीता आरक्षण ठेवले आहे काय. कचरा डेपोसाठी आरक्षण सोडले आहे काय. सावेडी भुयारी गटारी योजना विविध भागात जागा ठेवण्यांत याव्यात.

मा.श्री.वाकळे :- विविध मुद्दे जे मांडले आहेत ते ऐकुण घेतले पाहिजेत व आम्ही काही त्रुटी लेखी देत आहोत त्याचा प्रस्तावात उल्लेख करावा अ.नं.२११ चे रिझर्वेशन काढले आहे. व नकाशावर मात्र काढलेले दिसुन आले नाही.

मा.श्री.फुलसौंदर :- आरक्षणामध्ये मुदत समाविष्ट करावी. चार दिशेला चार प्लॅन ठेवावेत.

श्री.धोंगडे :- याबाबत मनपा इंजिनिअर यांचेशी चर्चा केलेली आहे.

मा.श्री.फुलसौंदर :- चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.१३२/१/२ जुना कचरा डेपो महानगरपालिकेचे कर्मचारी श्री.भोसले यांचे मुळमालकीच्या जागेवर आरक्षण तसेच ठेवले आहे. वास्तविक त्यांना कुठलीही जागा नाही. श्री.भोसले सदर ठिकाणी टपरी बांधुन रहात आहेत.

मा.श्री.घुले :- मा.फुलसौंदर मा.वाकळे यांनी तळमळीने मांडलेल्या सूचना जरुर विचारात घ्याव्यात. पुर्वी इंग्रजांची नियोजन करण्याची जी पध्दत होती ती वाखाणण्या जोगी आहे. तसे नियोजन करावे. तसेच श्री.कवडे यांच्या जागेवर जे आरक्षण टाकले आहे त्यावर विचार होवून रद्द करण्यांत यावे.

मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी :- रस्त्याच्या रचना चूकीच्या आहेत. सर्व्हे नं.८१ मधील रस्ता बाजूला सरकवावा व रविंद्र कवडे यांच्या प्रस्तावाला पाठींबा देत आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- यामध्ये एकुण हरकती किती आलेल्या होत्या. एकुण किती आरक्षणे आहेत. व आरक्षणा खालील एकुण किती हेक्टर जागा आहे. याची माहिती देण्यात आलेली नाही ती देण्यांत यावी.

यातील किती आरक्षणे उठविलेली आहेत व शासकीय आरक्षणे किती आहेत. समितीने किती आरक्षणे उठविलेली आहेत.

मा.श्री.अनंत जोशी :- भाजपा शिवसेना युतीने याबाबत लेखी पत्र दिलेले होते. प्रत्येक विषयावर व सर्व्हे नंबरवर सदर बाबत विचार व्हावयास पाहिजे असे सांगितले.

मा.श्री.अशोक कानडे :- यामध्ये एकुण ३३० हरकती आलेल्या होत्या प्रत्येक हरकतींवर विचार करावयाचा असल्यास रात्र पुरणार नाही. एकंदर १८५ लोकांची ३१० आरक्षणे उठविणे बाबत त्यामध्ये नागापूर बोल्हेगांव शेतक-यांवर झालेल्या अन्यायाबाबत सविस्तर यादी देतो. नियोजन समितीच्या अधिक चूका झालेल्या आहेत व काही अटी टाकलेल्या आहेत. आरक्षण क्रमांक १६ पार्किंग होते. अटी टाकण्याचे धोरण काय आहे. याबाबत अधिक माहिती मा.आयुक्त आणि मा.महापौर यांना देण्यांत यावी. प्राथमिक शाळा, क्रीडांगणे हे महत्वाच्या जागेवर ठेवावेत. तसेच महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना घरासाठी जागा नाही ते हद्दवाढीमध्ये घरकुल योजने करीता चालू ठेवावी.

मा.श्री.मिलींद गंधे :- अ.नं.५ केडगांव कोणते आरक्षण टाकले आहे ते समजुन येत नाही. भिस्तबाग येथील आरक्षणा बाबत विचार करावा.

मा.श्री.सोमनाथ लोंढे :- विशेष घटक योजने बाबतचे डी.पी.युनिट बंद करण्यांत यावे.

मा.श्री.कैलास गिरवले :- विविध मा.सदस्यांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत व त्यांची नांवे घ्यावीत व मा.अशोक कानडे यांनी मांडलेल्या सूचना विचारात घेवून मंजूर कराव्यात व ठराव संमत झाला म्हणुन मान्यता देण्यांत यावी.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व त्या समावेत प्राप्त झालेल्या नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करण्यात आले. ऑफिस रिपोर्टात नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २१ ,२८ व ३० अन्वये अपेक्षिलेल्या मुदत वाढी मंजूर करण्यात येत आहेत. हा ठराव प्राप्त होताच तात्काळ सदर विकास योजना शासनास आवश्यक ती कार्यवाही करून मंजूरीसाठी सादर करावी.

उक्त विकास योजना अहमदनगर (वाढीव क्षेत्र) बाबत महासभेत साधक बाधक चर्चा झाली. नियोजन समितीच्या अहवालाचे पुर्नविलोकन करण्यात आले. नियोजन समितीने आपला अहवाल अभ्यासपूर्ण रितीने सादर केलेला असला तरीही या अहवालात खालील प्रमाणे काही त्रुटी राहून गेल्याचे सन्माननीय सदस्यांनी नजरेस आणले.

१) शहरापासून दूर असणा-या व फक्त शेती उत्पन्नावर गुजराण करणा-या काही गरीब शेतक-यांवर अन्याय झालेला आहे.

२) अहमदनगर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार न करता आरक्षणांची संख्या विनाकारण वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अनावश्यक आरक्षणे वगळणे आवश्यक आहे.

३) काही ठिकाणी रस्त्याची आखणी अयोग्य आहे. रस्ता / रस्ते प्रस्तावित करताना ते सामायिक बांधावरून प्रस्तावित केल्यास असा रस्ता जास्त न्याय्य ठरेल.

या व अशा इतर सर्व मुद्यांच्या अनुषंगाने सभेत सांगोपांग चर्चा झाली. विकास योजना नकाशा व अहवाल यांचीही सभेत माहिती घेण्यात आली. या सभेत सन्माननीय सदस्यांनी आवश्यक असलेल्या प्रस्तावित फेरबदलाची यादी मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांना सादर करण्यात आली. त्याप्रमाणे ही महासभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१) नियोजन समितीचा अहवाल भागशः मान्य करण्यात येत आहे. ज्या समितीच्या शिफारशी महासभेस मान्य नाही. म्हणजेच ज्या ठिकाणी महासभेचा निर्णय नियोजन समितीच्या शिफारशी पेक्षा वेगळा आहे त्याची स्वतंत्र यादी या सोबत जोडण्यात येत आहे.

२) सन्माननीय सदस्य श्री.अशोक कानडे, सभागृह नेता श्री.किशोर डागवाले, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनिल कोतकर, भगवान फुलसौंदर, सुभाष लोंढे, अनिल शिंदे, मिलींद गंधे, नरेंद्र कुलकर्णी , नामदेव पवार यांनी प्रत्यक्ष चर्चेत केलेल्या फेरबदलाच्या सुचना तसेच त्यापैकी काहींनी सादर केलेल्या फेरबदलाच्या लेखी यादया मान्य करण्यात येत आहे. वर नमुद केल्याप्रमाणे ही यादी सोबत जोडली आहे. साईट ॲण्ड सर्व्हिसेस या प्रस्तावासाठी असलेली सर्वच आरक्षणे वगळण्याचा प्रस्ताव नियोजन समितीने सुचविलेला आहे. तथापी हा प्रस्ताव अनुचित असल्याने अमान्य करण्यात येत आहे.

३) नियोजन समितीने खालील बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याचे सुचविलेले आहे.

अ) प्रसिध्द प्रारूप विकास योजनेतील जो भाग शेती विभागातून रहिवास विभागात समाविष्ठ करण्यास मा.सभेने मंजूरी दिलेली आहे. त्या भागासाठी स्वतंत्र रेखांकन करून ही रेखांकने मंजूरीसाठी शासनास सादर करणे.

ब) ट्रक टर्मिनस अथवा तत्सम आरक्षणे समावेशक आरक्षण धोरणाच्या माध्यमातून किंवा अन्य प्रकारे विकसीत करण्यासाठी नियमावली तयार करणे.

क) प्रारूप विकास योजने समवेत प्रसिध्द करण्यात आलेल्या बांधकाम नियंत्रण नियमावलीत योग्य ते फेर बदल करणे.

उपरोक्त धोरणात्मक बाबीं व इतर मुद्दे तपासून प्रस्ताव मा.शासनास मंजूरीसाठी सादर करण्यासाठी मा.महापौर व मा.आयुक्त यांना संयुक्तपणे अधिकार प्रदान करण्यात येत आहे. त्यांनी नगररचना संचालनालयाशी विचार विनीमय करून प्रस्ताव तयार करावा व तो मा.शासनास यथावकाश स्वतंत्ररित्या सादर करावा.

प्रस्ताव मंजूर अनुषंगीक खर्च मंजूर. वरीलप्रमाणे फेरबदल विकास योजनेत दर्शवून व त्याप्रमाणे अहवाल तयार करून तसेच त्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २८(४) अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्दी देवून ही योजना शक्य तितक्या लवकर वाढवून दिलेल्या मुदतीच्या आंत मा.शासनास सादर करावी.

सदरचे काम कालमर्यादीत स्वरूपाचे असल्याने अधिक कालापव्यय टाळण्यासाठी सदरचा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता मा.शासनाकडे पाठविण्यात यावा.

सुचक - मा.श्री.सुनिल कोतकर

अनुमोदक - मा.श्री.आरिफ शेख रफिउद्दीन

ठराव बहुमताने मंजूर

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिध्द केलेल्या अहमदनगर शहराच्या वाढीव क्षेत्राच्या प्रारूप विकास योजना संदर्भात प्राप्त सुचना / हरकतीवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ ची कलम २८ अन्वये गठीत केलेल्या नियोजन समितीने सुनावणी देवून दिलेल्या अभिप्रायावर महासभेचा निर्णयाचा तक्त**

**मौजे - केडगांव**

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | राजकुमार कांबळे | ४२४ पैकी | १७८ | बगीचा | ०.४५ | आरक्षण कायम करावे | आरक्षणाच्या जागेत ठराव क्र. १४ दि.२५-११-२००० अन्वये पंचशिल प्रतिष्ठान,केडगांव ने ठराव करून स.नं. ४२४/२ ही जागा सांस्कृतिक भवन बांधण्याकरिता दिलेली असल्यामुळे आरक्षण रद्द करावे. |
| २ | टी.आर.देवचक्के | १४४ पैकी | १८० | प्राथ. शाळा व क्रीडांगण | १.१२ | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. आरक्षण कायम करावे. |
| ३ | विनोदकुमार आत्माराम अग्रवाल | १५३ पैकी | १८४ | क्रीडांगण | २.१८ | आरक्षणाखाली निम्मे क्षेत्र वगळुन ते औद्योगिक क्षेत्रात वर्ग करावे उर्वरीत क्षेत्र क्रिडांगण म्हणून आरक्षीत राहिल. | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. पुर्ण आरक्षण रद्द करावे. |
| ४ | जयवंत सावळेराम कोतकर व इतर | २२७ पैकी | १८५ | ओपन थिएटर | ३.११ | आरक्षण कायम करावे | अर्जदार हा शेतकरी असुन त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उद्रर्निवाह शेतीवरच आहे. जमीन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | छबु हनुमंता कोतकर व इतर | २०५ पैकी | १९७ | बगीचा | ०.८१ | आरक्षण कायम करावे | अर्जदार हा शेतकरी असुन त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उद्रनिवाह शेतीवरच आहे. जमीन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |
| ६ | आप्पा हरि सातपुते किसन ठकाजी सातपुते व इतर | ८६ पैकी | २१२ | भाजी मार्केट | ०.४५ | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील जमिन ही बिनशेती झालेली असुन रेखांकन मंजुर आहे. जागा नगर- पुणे हायवे लगत असल्यामुळे आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षण रद्द करावे. तसेच या आरक्षणालगतचा दक्षिणेकडील प्रस्तावातील रस्ता रद्द करावा. |
| ७ | पांडुरंग भा. लोढे व इतर | २८० पैकी | २१४ | हॉस्पीटल | ०.३४ | आरक्षण कायम करावे | अर्जदार हा शेतकरी असुन त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उद्रनिवाह शेतीवरच आहे. जमीन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |
| ८ | पांडुरंग भा. लोंढे व इतर | २८१ पैकी | २१५ | क्रिडांगण | १.०९ | आरक्षण कायम करावे | अर्जदार हा शेतकरी असुन त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उद्रनिवाह शेतीवरच आहे. जमीन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |
| ९ | दगडू शंकर हुलगे | २८३ पैकी | २१६ | हायस्कुल व क्रीडांगण | १.६७ | १ हे. क्षेत्र आरक्षीत ठेवून उर्वरित रद्द | अर्जदार हा शेतकरी असुन त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उद्रनिवाह शेतीवरच आहे. जमीन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | तात्याबा गेणु कोतकर व इतर | ३१९ पैकी | २२३ | स्मशान भुमी | ०.५४ | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील जागा ही स.नं.३१९, २९८, ३०० यामधील असुन सदरची जागा ही डोंगरमाथ्यावरील आहे. त्यामुळे अंतविधी करणेकरीता नागरीकांना डोंगर चढुन वर जाणे प्रत्यक्ष अशक्य आहे. आरक्षण रद्द करावे. तसेच प्रादेशिक योजनेप्रमाणे ही जागा रहीवासी विभागात समाविष्ट करावी. |
| ११ | तात्याबा गेणु कोतकर व इतर | २९८ पैकी | २२४ | दफन भुमी | ०.५९ | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील जागा ही स.नं.३१९, २९८, ३०० यामधील असुन सदरची जागा ही डोंगरमाथ्यावरील आहे. त्यामुळे अंतविधी करणेकरीता नागरीकांना डोंगर चढुन वर जाणे प्रत्यक्ष अशक्य आहे. आरक्षण रद्द करावे. तसेच प्रादेशिक योजनेप्रमाणे ही जागा रहीवासी विभागात समाविष्ट करावी. |
| १२ | शंकर अमृता लोंढे | ४४१ पैकी | २३० | बगीचा | ०.६८ | आरक्षण कायम करावे | अर्जदार हा शेतकरी असुन त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उद्रनिवाह शेतीवरच आहे. जमीन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |
| १३ | रावसाहेब तुळशिराम सातपुते, किसन ठकाजी सातपुते व इतर | ३३५ पैकी | २३३ | बेघरांसाठी घरे | ३.९४ | आरक्षण कायम करावे | अर्जदार हा शेतकरी असुन त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उद्रनिवाह शेतीवरच आहे. जमीन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | रावसाहेब तुळशिराम सातपुते, किसन ठकाजी सातपुते व इतर | ३३७ पैकी | २३४ | शॅापींग सेंटर | | आरक्षण कायम करावे | अर्जदार हा शेतकरी असुन त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उद्रर्निवाह शेतीवरच आहे. जमीन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |
| १५ | प्रदीप हस्तीमल चंगेडे व इतर | ३९० पैकी | २३६ | शैक्षणिक संकुल | ६.५२ | ५ हे. क्षेत्र शैक्षणिक संकूल म्हणून आरक्षीत | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. आरक्षण कायम करावे. |
| १६ | सतिष बुधाजी शिंदे | ४२७ पैकी | २३८ | प्राथमिक शाळा | ०.४८ | आरक्षित कायम करावे | एकाच प्रकारचे आरक्षण शेजारी शेजारी २ ठिकाणी टाकलेले आहेत. आरक्षणाची आवश्यकता नसल्याने आरक्षण रद्द करावे. |
| १७ | सुरेश गजानन कारले | ५११ पैकी | २४४ | शॅापिंग सेंटर | ०.३२ | आरक्षण कायम करणे | आरक्षणाच्या जागेत राहती घरे व जनावरांचे गोठे आहेत. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |
| १८ | किसन मनाजी राहिंज | ८ पैकी | २४६ | प्राथ. शाळा | ०.५६ | चाळ वस्ती वगळून उर्वरित क्षेत्र आरक्षीत | आरक्षणाच्या जागेत राहती घरे व जनावरांचे गोठे आहेत. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |
| १९ | भानुदास एकनाथ कोतकर | ४६ पैकी | २५५ | हॅास्पीटल | ०.७९ | आरक्षण कायम करावे | अर्जदार हा शेतकरी असून त्योच उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल. आरक्षण रद्द करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | आनंदराम कुंदनमल लुणे<br>अनिल माधवराव शिंदे<br>बबन माधवराव शिंदे | १४० पैकी | -- | औद्योगिक वापर | -- | रहिवास विभागात वर्ग | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. औद्योगिक वापर कायम करावा. |
| २१ | स्टर्लिंग मोटर्स | ४५६ पैकी | -- | ग्रीन झोन | -- | औद्योगिक वभागात वर्ग | नियोजन समितीची शिफारस व शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे औद्योगिक वापर कायम करावा. |
| २२ | एस.बोरा | ४४६ पैकी<br>४४९ पैकी | ३.२३<br>७.८६ | ग्रीन झोन | -- | ४४६-ग्रीन झोन<br>४४९ रहिवास विभागात वर्ग | पूर्ण क्षेत्र ग्रीन झोन मध्ये ठेवावे. |
| २३ | सखाराम तुकाराम सातपुते<br>दिलीप नाना सातपुते व इतर २ | ८६ पैकी | २२८ | एम.टी.डी.सी. | १.९८ | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. आरक्षणाचा उद्देश एम.टी.डी.सी. च्या ऐवजी बगीचा म्हणून ठेवावा. |
| २४ | दत्तात्रय भिवसेन सुबे | ५८ पैकी | २११ | फायर स्टेशन | ०.०६ | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील जमिन ही बिनशेती झालेली आहे. जागा नगर पुणे हायवे लगत असल्यामुळे आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षण रद्द करावे. तसेच या आरक्षणालगत चा दक्षिणेकडील प्रस्तावातील रस्ता रद्द करावा. |
| २५ | शासकीय ऑफिसेस व वर्कशॉप | १५ पैकी<br>१६ पैकी | -- | सार्वजनिक निम सार्वजनिक | -- | -- | या भागात बगीचा करिता आरक्षण नाही. त्यामुळे ही जागा बगीचा करिता आरक्षीत करावी. |
| २६ | सखाराम तुकाराम सातपुते<br>दिलीप नाना सातपुते व इतर २ सतिष बुधाजी शिंदे | ४८ पैकी | २५८ | क्रिडांगण | १.०० | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. आरक्षण कायम करावे. |

## मौजे - नालेगांव

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | रविंद्र रभाजी कवडे | १०४ पैकी | २७० | प्राथ. शाळा व क्रिडांगण | १.०० | आरक्षण कायम करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. आरक्षण रद्द करावे. |
| २ | रविंद्र रभाजी कवडे | ९ पैकी ११ पैकी | ३०१ | भापिंग सेंटर | १.१० | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील क्षेत्र स्वातंत्र सैनिकांच्या मालकीचे असल्याने हे आरक्षण त्यांच्या जागेत प्रस्तावित करणे योग्य होणार नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ३ | गोरक्ष आसाराम डागवाले व इतर | ६९ पैकी | २७५ | स्मशान भूमी | २.११ | ०.६२ हे क्षेत्र आरक्षित ठेवून उर्वरित क्षेत्र रद्द | अर्जदारांची जागा आरक्षण क्षेत्रात येत नसून ३० मी.रस्ता व १२ मी सेवा रस्ता याने बाधीत होत आहे. आरक्षण कायम करावे. |
| ४ | दशरथ भाउत्साहेब भांबरे | ७० पैकी | २८० | आर.टी.ओ. ऑफिस | २.५६ | १ हेक्टर क्षेत्र आरक्षीत ठेवून उर्वरित क्षेत्र रद्द | अर्जदारांची जागा आरक्षण क्षेत्रात येत नसून ३० मी. रस्ता व १२ मी सेवा रस्ता याने बाधीत होत आहे. आरक्षण कायम करावे. |
| ५ | शोभा शेषराव भुसारी व इतर ५ | ७२ पैकी | २७९ | ट्रक टर्मिनल्स व सेंट्रल गोडावून | ४.२८ | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. आरक्षण कायम करावे. |
| ६ | राजकुमारी कै. नवलानी | १०८ पैकी | २८४ | बगीचा | १.०० | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील जागा ही रेल्वे लाईनला लागून आल्याने आरक्षणाचे नियोजन रचनात्मक दृष्टया योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | भाउत्साहेब गणपत आगरकर व इतर ३ | १५२ पैकी | २८५ | साईट ॲण्ड सर्व्हीसेस | ४.२७ | क्रीडांगण असा आरक्षणाचा प्रस्ताव कायम करावा | अर्जदारांनी सदरची जमिन आनंदऋषीजी या संस्थेस खरेदी दिली असल्याने तिचा वापर सदर संस्था ही मेडिकल कॉलेज, हॉस्पीटल व इतर भौक्षणिक कारणाकरिता वापरणार आहे. आरक्षणाचा उद्देश बदलून हॉस्पीटल व शैक्षणिक वापराकरिता जागा आरक्षित करावी. |
| ८ | भाउत्साहेब गणपत आगरकर व इतर ३ | १५२ पैकी | २८६ | क्रीडांगण | ०.५९ | आरक्षण कायम करावे | अर्जदारांनी सदरची जमिन आनंदऋषीजी या संस्थेस खरेदी दिली असल्याने तीचा वापर सदर संस्था ही मेडिकल कॉलेज, हॉस्पीटल व इतर शैक्षणिक कारणाकरिता वापरणार आहे. आरक्षणाचा उद्देश बदलून हॉस्पीटल व शैक्षणिक वापराकरिता जागा आरक्षित करावी. |
| ९ | शिवाजी भाउत्राव जाधव | १५५ पैकी | २८८ | प्राथ. शाळा | ०.४० | आरक्षण कायम करावे | अर्जदारांच्या जागेच्या आसपास मनपाची शाळा कार्यरत आहे. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| १० | अशोक सिमरतमल बोरा | २४० पैकी | २९३ | प्राथ. शाळा | ०.४५ | आरक्षण कायम करावे | अर्जदारांच्या जागेच्या आसपास मनपाची शाळा कार्यरत आहे. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही सबब आरक्षण रद्द करावे. |
| ११ | आशा कृष्णराव राजे | २४३ पैकी | २९९ | साईट ॲण्ड सर्व्हीसेस | १.७१ | ५० टक्के क्षेत्र हौसिंग फॉर डिस हाउस्ड यासाठी आरक्षीत ठेवावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपर्णू आरक्षण कायम करावे. |
| १२ | जगन्नाथ मारूती शिंदे | १३ पैकी | ३०४ | क्रीडांगण | ०.४३ | आरक्षण कायम करावे | या जमिनीचे आसपास बरेच रेखांकने मंजूर असून त्यामध्ये मोकळया जागा व ॲमिनीटी स्पेस सोडलेल्या आहेत. त्याचा वापर क्रिडांगणाकरिता होईल. सबब आरक्षण रद्द करावे. |
| १३ | जगन्नाथ मारूती शिंदे | १४ पैकी | ३०५ | प्राथ. शाळा | ०.५८ | आरक्षण कायम करावे | अर्जदारांच्या जागेच्या आसपास मनपाची शाळा कार्यरत आहे. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | विजय सोमनाथ गाडळकर व इतर | ३७ पैकी | ३११ | बगीचा | ४.११ | २.५० हेक्टर क्षेत्र आरक्षणातून वगळावे | आरक्षणाखालील जागा ही सीना नदीला लागूनच आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण रद्द करावे. |
| १५ | रामचंद्र गणपत गाडळकर<br>सोपान बबनराव लोंढे | ४० पैकी<br>३२ पैकी | ३१३ | प्राथ. शाळा व क्रीडांगण | १.०५ | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील क्षेत्र नियमापेक्षा जास्त आहे. स.नं. ३२ वरील आरक्षण रद्द करावे. |
| १६ | सोपान बबनराव लोंढे | ३ पैकी | -- | ग्रीन बेल्ट | -- | झोन कायम करावा | रहिवास झोन करावा. |
| १७ | राजेश भिमराव एकाडे | ३९ पैकी | -- | ग्रीन बेल्ट | -- | झोन कायम करावा | आरक्षीत जागेत राहती घरे, वस्ती आहे. सबब जागा रहिवास विभागात वर्ग करावा. |
| १८ | दत्तात्रय गुणाजी शेरकर व इतर | ८१ पैकी | -- | १८ मी. रस्ता | -- | रस्त्याचा प्रस्ताव कायम | स.नं. ८१ च्या दोन समाईक बांधावरून ९मी., ९मी. करावा. |
| १९ | नामदेव शांतराम पवार | २४१ पैकी | -- | १२ मी. रस्ता | -- | रस्त्याचा प्रस्ताव कायम | स.नं. २४१ मधील रावळ समाज विकास संस्थेच्या पूर्वेकडील हद्दीवरून ६ मी. व पलिकडेच्य जागेतून ६ मी. करावा. |
| २० | सुभाष मिठूलाल ओस्तवाल | १४३ पैकी | -- | ग्रीन झोन | -- | रहिवास विभागात वर्ग | ग्रीन झोन विभागात वर्ग करावी. |
| २१ | यशवंत एकनाथ शिंदे | २३५ पैकी | २६४ | भाजी मार्केट | १.२५ | आरक्षण कायम करावे | जागेच्या आसपास बरीचशी खाजगी दुकाने असल्याने या आरक्षणाची आवश्यकता नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| २२ | -- | १७९ | | ग्रीन झान | -- | झोन कायम करावा | आरक्षी जागेच्या आसपास बरीचशी राहती घरे, लोकवस्ती वाढलेली आहे. सबब जागा रहिवास विभागात वर्ग करावी. |

## मौजे -  बोल्हेगांव

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | हेमेंद्र रमेश कासवा, अशोक बन्सीलाल मुथा व इतर | ६३ पैकी | ७ | शैक्षणिक स्कूल | ४.७५ | भौक्षणिक संकुलासाठीचे आरक्षण रद्द करावे | आरक्षणाखालील क्षेत्राच्या पूर्वेकडील अर्धे क्षेत्र रहिवास समाविष्ट करावे व पश्चिमेकडील अर्धे क्षेत्राचे दोन समान भाग करून त्यामध्ये आ.क्र.त्र. १० सांस्कृतिक केंद्र व आ.क्र. ९ माध्यमिक शाळा व क्रीडांगण प्रस्तावित करावे. |
| २ | शेख अलताफ इब्राहीम | ६४ | ८ | साईट ॲण्ड सर्व्हीसेस | २.२९ | आरक्षण क्र. २३ दुकान केंद्र करिता या आरक्षणा पैकी ४० आर क्षेत्र आरक्षीत करावे. | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण कायम करावे. |
| ३ | दिनेश दिगंबर येवले किसन कोलते व इतर | ६४ पैकी | ९ | माध्यमिक शाळा व क्रीडांगण | १.५० | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणा नियोजन योग्य नाही. आरक्षीत जागेत राहती घरे, वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाहशेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होई ल सबब आरक्षण रद्द करावे. |
| ४ | शिवराम यदू भिंगारदिवे पंकज लालजी पटेल | ६५ पैकी | १० | सांस्कृतिक केंद्र | १.०३ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. हॉस्पीटल शेजारी सांस्कृतिक केंद्राचे नियोजन योग्य नाही. पश्चिमेकडील हिस्सा नं. १ पैकी क्षेत्र ०.४१ हे. आरक्षणातून वगळून उर्वरित क्षेत्र आ.क्र.११ हॉस्पीटल यामध्ये समाविष्ट करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | कस्तुरबेन रामजी कोठारी | ६० पैकी | ६ | सेंट्रल गोडावून | ०.८० | आरक्षण कायम करावे | महाराष्ट्रात जकातीचे प्रयोजन रद्द करणेत आलेने आरक्षणाचे नियोजन योग्य नाही . सबब आरक्षण रद्द करावे. |
| ६ | कस्तुरबेन रामजी कोठारी | ६० पैकी | -- | ३० मी. रस्ता १२ मी. सेवा रस्ता | -- | दोन्ही रस्ते रद्द करून १८ मी. रस्ता ठेवावा. | नियोजन समितीची शिफारस मान्य. |
| ७ | बहिरनाथ गोविंद बारस्कर व इतर | ६६ पैकी | १२ | क्रीडांगण | १.४४ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षित जागेत राहती घरे, वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमीहीन होईल. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ८ | हेमंत भानुदास मोटे व इतर | ८४ पैकी | २९ | प्राथ.शाळा माध्य.शाळा व क्रीडांगण | १.५४ | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण कायम करावे. |
| ९ | विजयसिंग किसनसिंग परदेशी व इतर | ७४ पैकी | ३४ | क्रीडांगण | ०.६३ | आरक्षण कायम करावे | अर्जदारांची जमिन वडीलोपार्जित असून इतरत्र कोठेही इतर जमिन नाही. अर्जदारांनी यापूर्वी गावठाणास १ एकर जमिन शासनास विना मोबदला दिलेली आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल. सबब आरक्षण रद्द करावे. |
| १० | किसन केसू भोर | ८६ पैकी | ३७ | बगीचा | १.०० | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षीत जागेत राहती घरे वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे सा ान शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल. सबब आरक्षण रद्द करावे. |

**मौजे - नागापूर**

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | रामचंद्र बाजीराव कातोरे व इतर २ | ६ पैकी | २ | कामगार कल्याण केंद्र | १.१८ | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण कायम करावे. |
| २ | महेश रामचंद्र कातोरे व इतर | ७ पैकी | ३ | प्राथ.शाळा व क्रीडांगण | ०.४० | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण कायम करावे. |
| ३ | सुजाता शरद धोंडे | २२ पैकी | -- | सार्वजनिक निम सार्वजनिक वापर | -- | रहिवास विभागात वर्ग | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. सार्वजनिक निम सार्वजनिक विभागात वर्ग करावी. |
| ४ | भूषण रावसाहेब अनभुले | २२ पैकी | | | | रहिवास विभागात वर्ग | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. सार्वजनिक निम सार्वजनिक विभागात वर्ग करावी. |
| ५ | आसाराम रामभाऊ कातोरे | १३२ पैकी | २७ | क्रीडांगण | १.१७ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षित जागेत राहती घरे, वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल. सबब आरक्षण रद्द करावे. |

**मौजे - सावेडी**

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | भागुजी लक्ष्मण बारस्कर व इतर १ | २३९ पैकी | ४४ | शॉपिंग कॉम्प्लेक्स | ०.९२ | पेट्रोल पंप इ. या खालील क्षेत्र आरक्षणातून वगळून उर्वरित क्षेत्र शॉपिंग सेंटर म्हणून आरक्षित करावे. | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षीत जागेत राहती घरे. वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमीहीन होईल सबब आरक्षण रद्द करावे |
| २ | भागुजी लक्ष्मण बारस्कर व इतर ५ | २७६ पैकी | ५८ | स्मशानभूमी | ०.५८ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षीत जागेत राहती घरे, वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमीहीन होईल सबब आरक्षण रद्द करावे. |
| ३ | भागुजी लक्ष्मण बारस्कर व इतर ५ | २७७ पैकी | ५९ | दफन भूमी | ०.७२ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षीत जागेत राहती घरे, वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमीहीन होईल सबब आरक्षण रद्द करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | केदारनाथ बद्रीनारायण बंग व इतर | २५८ पैकी | ६१ | शॉपिंग सेंटर व भाजी मार्केट | ०.३५ | आरक्षणाची रूंदी १५ मी. ठेवून भाजी मार्केटसा | सदर जमिनीचे जवळच खाजगी शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मार्केट आहेत. जागेचे स्थान पाहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ५ | प्रकाश मोतीलाल फिरोदिया व इतर ३ | ६७ पैकी | ७८ | जकात नाका | ०.०५ | आरक्षण रद्द करावे व जागा आ.क्र. ९९ मध्ये समाविष्ट करावे. | सदर जमिनीमध्ये मंजूर रेखांकन असून सदर जमिन बिनशेती झालेली आहे. तसेच महाराष्ट्रात जकातीचे प्रयोजन रदृद करणेत आलेने आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ६ | संतोष रामकृष्ण गावडे व इतर | ५३ पैकी | ८२ | दफन भूमी | ०.५१ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षित जागेत राहती घरे, वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भुमिहीन होईल सबब आरक्षण रद्द करावे. |
| ७ | संतोष रामकृष्ण गावठे व इतर | ५३ पैकी | ८३ | एम.ई.सी.बी. सब स्टेशन | ०.८० | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील क्षेत्र नियमापेक्षा जास्त आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्योच उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमिहीन होईल. सबब स.ंन. ५३ मधील क्षेत्र वगळून उर्वरित स.नं. ५४ मधील क्षेत्रात आरक्षण कायम |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | मधुमालती मोहनराज मानधना | ५१ पैकी | ८५ | बगीचा | ०.५८ | आरक्षण कायम करावे | सदर जमिनीच्या शेजारी म्हाडा चे रेखांकन असून त्यामध्ये २० आर. क्षेत्राची ॲमिनीटी स्पेस आहे. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ९ | मोहनलाल रामअवतार मानधना | ५७ पैकी | ९० | हॉस्पीटल आणि मॅटर्निटी होम | ०.६९ | ०.४० हेक्टर क्षेत्र आरक्षीत ठेवून उर्वरित क्षेत्र रद्द | सदरच्या भागामध्ये बरीच हॉस्पीटल व मॅटर्निटी होम झालेली आहेत. त्यामुळे मनपा च्या हॉस्पीटलची गरज नाही. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण रद्द करावे. |
| १० | प्रकाश मोतीलाल फिरोदिया व इतर ३ | ६७ पैकी | ९९ | व्यापारी संकुल व ऑफिसेस | ०.६४ | आरक्षण कायम करावे | सदर जमिनीमध्ये मंजूर रेखांकन असून सदर जमिन बिनशेती झालेली आहे. आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ११ | सारंग सदाशिव बारस्कर व इतर | ३०० पैकी | ६२ | व्यापारी संकुल | ०.४२ | आरक्षण कायम करावे | सदर जमिनीचे जवळच खाजगी शॉपिंग कॉम्प्लेक्स आहेत. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियाजन योग्य नाही. दक्षिण पूर्व कोपरा यामधील क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करावे. उर्वरित क्षेत्र कायम करावे. |
| १२ | अशोक सिमरतमल बोरा | २८४ पैकी<br>२८६ पैकी | -- | ग्रीन झोन | -- | स.नं. २८४ मधील पश्चिमेकडील क्षेत्र रहिवास विभागात अंर्तभूत स.नं. २८६ ग्रीन झोन मध्ये अंर्तभूत | ग्रीन झोन कायम करावा. |
| १३ | -- | २८२ | -- | ग्रीन झोन | -- | झोन कायम करावा | आरक्षीत जागेच्य आसपास बरीचशी राहती घरे, लोकवस्ती वाढलेली आहे. सबब जागा रहिवास विभागात वर्ग करावी. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सय्यद शेर बनो अब्दुल करीम | २४९ पैकी | ४६ | पोलिस स्टेशन | ०.१५ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण रद्द करावे. |
| १५ | सय्यद अब्दुल करीम अब्दुल सत्तार | १४९ पैकी | ४७ | फायर स्टेशन | ०.१० | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योगय नाही. नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण रद्द करावे. |
| १६ | रवि ॲबट व इतर | २५१ पैकी | ५२ | मुलांचे खेळाचे उद्यान | ०.१४ | आरक्षण कायम करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. आरक्षण रद्द करावे. |
| १७ | रवि ॲबट व इतर | २५१ पैकी | ५३ | मुलांचे खेळाचे उद्यान | ०.१४ | आरक्षण कायम करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. आरक्षण रद्द करावे. |

**मौजे - भिस्तबाग**

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | छबुताई त्रिंबक तागड | १५,१३,१४ पैकी | ७६ | क्रीडांगण | ४.३१ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षीत जागेत राहती घरे, वस्ती आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. जमिन बागायत आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमीहीन होईल सबब आरक्षण रद्द करावे. |
| २ | सर्जुदेवी रामअवतार मानधना व इतर | २४ पैकी | ५१ | टाउन हॉल | १.२६ | १ हेक्टर क्षेत्र आरक्षीत करून उर्वरित क्षेत्र आरक्षणातून वगळावे. | सदर जमिनीचे जवळच मल्टीप्लेक्स कॉम्प्लेक्सला मंजूरी दिली असल्यामुळे नविन टाउन्न हॉलची त्या ठिकणी आवश्यकता नाही. जागेच स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ३ | राजकुमारी कन्हैयालाल नवलानी व इतर | २६ पैकी | ४८ | सुपर मार्केट ॲण्ड पार्किंग | १.१५ | आरक्षण रद्द करून सदर जागा वाणिज्य विभागात समाविष्ट करावी. | सदर जमिनीच्या जवळच मनपाचे गाळे असून ते रिकामे पडलेले आहे. अर्जदार यांना इतरत्र व्यवसाय करणेस दुसरी जागा नाही. जागेचे स्थान पहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ४ | मधुमालती मोहनलाल मानधना व इतर | २५ पैकी | ४९ | प्राथ. शाळा व क्रीडांगण | ०.४० | आरक्षण कायम करावे | सदर जमिनीच्या आसपास ब-याच मनपा च्या अनेक शाळा आहेत. सबब या आरक्षणाची गरज नाही. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | किसन दगडू कजबे व इतर | १ पैकी | ६३ | प्राथ. शाळा व क्रीडांगण | ०.७१ | ४० आर क्षेत्र आरक्षणात ठेवून उर्वरित क्षेत्र आरक्षणातून वगळावे | सदर जमिनीच्या आसपास ब-याच मनपा च्या अनेक शाळा आहेत. सबब या आरक्षणाची गरज नाही. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. आरक्षणामुळे सदर शेतकरी भूमीहीन होईल. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ६ | -- | १९ पैकी<br>१८ पैकी | ७७ | बेघरांसाठी घरे | ०.६० | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील क्षेत्र नियोजना पेक्षा जास्त आहे. अर्जदार हा शेतकरी असून त्याचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवरच आहे. सबब सर्व्हे नं. १९ मधील क्षेत्र वगळता उर्वरित आरक्षण कायम करावे. |

**मौजे - भिंगार**

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | सिमा शरद मुथा | ३२६ पैकी | ११४ | मुलांचे खेळाचे मैदान | ३.५४ | आरक्षण कायम करावे | जागेचे स्थान पहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षीत जागेत राहती घरे, वस्ती आहे. गेल्या पंचवीस वर्षा पेक्षा जास्त काळात तेथे लोक राहत आहेत. सदरच्या प्रयोजनाकरिता परिसरात जवळच आरक्षणे आहेत. जमिन बिनशेती झालेली आहे. सबब आरक्षण रद्द करावे. |
| २ | शेख मुस्ताक इब्राहिम | २९७ पैकी | १०६ | बगीचा | ०.५० | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील क्षेत्र लष्कर छावणीला लागून आहे. सदर ठिकाणी ओढा ओलांडून जाणे वास्तविक दृष्टया प्रत्यक्षात असंयुक्तीक ठरेल. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सदरच्या प्रयोजनाकरिता परिसरात जवळच आरक्षणे आहेत. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ३ | शेख मुस्ताक इब्राहिम | २९७ पैकी | १०७ | माध्यमिक शाळा | ०.८५ | आरक्षण कायम करावे | आरक्षणाखालील क्षेत्रास तीन ओढे लागून आहे. सदर ठिकाणी ओढा ओलांडून जाणे वास्तविक दृष्टया प्रत्यक्षात असंयुक्तीक ठरले. जागेचे स्थान पहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सदरच्या प्रयोजनाकरिता परिसरात जवळच आरक्षणे आहेत. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ४ | तिलोत्तमा अजित बोरा व इतर | ३७७ पैकी | १५५ | प्राथ. शाळा | ०.४५ | आरक्षण कायम करावे | सदरची जमिन ही लोकवस्तीपासून फार दूर आहे. त्या ठिकाणी कुठल्याही सुविधा उपलब्ध नाही. जमिनीस पोहच रस्ता नाही. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सदरच्या प्रयोजनाकरिता परिसरात जवळच आरक्षणे आहेत. सबब आरक्षण रद्द करावे. |

**मौजे - चाहुराणा खु. व बु.**

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | अरूण मुकनदास दुग्गड व इतर | ३९ पैकी | १४३ | प्राथ. शाळा | ०.५२ | आरक्षण कायम करावे | सदर जमिनीच्या आसपास ब-याच मनपा च्या अनेक शाळा आहेत. त्या शाळा विद्यार्थी नसल्याने बंद पडलेल्या आहेत. सबब या आरक्षणाची गरज नाही. जागेचे स्थान पहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सदरच्या प्रयोजनाकरिता परिसरात जवळच आरक्षणे आहे. सबब आरक्षण रद्द करावे. |
| २ | अरूण मुकनदास दुग्गड व इतर | ३९ पैकी | १४४ | क्रीडांगण | ०.३१ | आरक्षण कायम करावे | या जमिनीच्या आसपास बरेच रेखांकने मंजूर असून त्यामध्ये मोकळया जागा व ॲमिनीटी स्पेस सोडलेल्या अहोत. त्याचा वापर क्रीडांगणाकरिता होईल. जागेचे स्थान पाहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षीत जागेत राहीत घरे, वस्ती आहे. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ३ | शरद मनसुखलाल मुथा | ५२ पैकी | १५१ | पार्किंग | ०.८० | आरक्षण कायम करावे | सदरचे आरक्षण नगर पुणे महामार्गालगत सिना नदी वरील पुला लगत असून सदर ठिकाणी पार्किंग चे नियोजन करणे रहदारीच्या दृष्टिकोनातून योगय ठरणार नाही. या भागात मोठी बाजार पेठ नसल्याने पार्किंगची आवश्यकता नाही. जागेचे स्थान पहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. जमिन बिनशेती झालेली आहे. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ४ | अनिल मळूजी औसरकर | ३५ पैकी | १६० | बगीचा | ०.३४ | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्र्य करण्यात येते आहे. आरक्षण कायम करावे |
| ५ | राजेंद्र मळूजी औसरकर | ४० पैकी | १६१ | कचरा डेपो | २.६१ | आरक्षण रद्द करावे | नियोजन समितीची शिफारस अमान्र्य करण्यात येते आहे. आरक्षण कायम करावे |
| ६ | सुरेश बाबुराव भोसले व इतर | १३२ पैकी | १५३ | प्राथमिक शाळा व क्रीडांगण | १.५० | आरक्षण कायम करावे | आरक्षणात विनायक नगर रस्त्या लगतच्या भागात बांधकामे झालेली आहे. त्यामुळे राहत्या घराखालील क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करावे व उर्वरित जागेत आरक्षण कायम करावे |

**मौजे - माळीवाडा**

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | स.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | आरक्षणाचे एकूण क्षेत्र हेक्टर | नियोजन समितीचा अभिप्राय | महासभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मंगलाबाई अशोकलाल बोरा व इतर ४ | ६ पैकी | १४५ | माध्य. शाळा व क्रीडांगण | ०.८० | आरक्षणाचे ५० टक्के क्षेत्र कमी करावे व ते माध्य. शाळा म्हणून दर्शवावे | सदर जमिनीच्या आसपास ब-याच मनपा च्या अनेक माध्यमिक शाळा आहेत. त्या शाळा विद्यार्थी नसल्याने बंद पडलेल्या आहेत. सबब या आरक्षणाची गरज नाही. जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सदरच्या प्रयोजनाकरिता परिसरात जवळच आरक्षणे आहेत. जमिन बिनशेती झालेली आहे. नियोजन समितीची शिफारस अमान्य करण्यात येत आहे. संपूर्ण आरक्षण रद्द करावे. |
| २ | छबु एकनाथ गाडळकर व इतर | ५१ पैकी | १३७ | जीम ॲण्ड स्विमींग पुल पार्क | ०.४५ | आरक्षण कायम करावे | या जमिनीचे आसपास बरेच रेखांकने मंजूर असून त्यामध्ये मोकळया जागा व ॲमिनीटी स्पेस सोडलेल्या आहेत. त्याचा वापर जीम ॲण्ड स्विमींग पुल पार्क याकरिता होईल. जागेचे स्थान पहाता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ३ | छबु एकनाथ गाडळकर व इतर | ५१ पैकी | १३९ | उदयान | ०.३० | आरक्षण कायम करावे | या जमिनीचे आसपास बरेच रेखांकने मंजूर असून त्यामध्ये मोकळया जागा व ॲमिनीटी स्पेस सोडलेल्या आहेत. त्याचा वापर उद्यान याकरिता होईल जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. सबब आरक्षण रद्द करावे. |
| ४ | रतन भाउत्साहेब कानडे व इतर | ६५ पैकी | १३३ | क्रीडांगण | १.६५ | आरक्षण कायम करावे | या जमिनीचे आसपास बरेच रेखांकने मंजूर असून त्यामध्ये मोकळया जागा व ॲमिनीटी स्पेस सोडलेल्या आहेत. त्याचा वापर क्रीडांगणा करिता होईल जागेचे स्थान पाहता आरक्षणाचे नियोजन योग्य नाही. आरक्षीत५ जागेत राहती घरे, वस्ती आहे. सबब आरक्षण रद्द करावे. |

**

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर शहर बससेवा परिवहन उपक्रमाबाबत अहमदनगर प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादीत यांचे दि.०४-०७-२००८ रोजीचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर.

--*--

**ठराव :** या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होवुन अहमदनगर शहर बस सेवा लोकहिताच्या दृष्टीकोनातुन सुरू राहाण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी योग्य ती कार्यवाही करावी. तथापि अभिकर्ता अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्या.यांचेकडुन वेळोवेळी बस सेवा बंद केली जाते . महानगरपालिकेस देय असलेली रक्कम व दैनंदिन वसुल झालेली रक्कम संयुक्तीक खात्यात भरणा करीत नाहीत. या विषयी करारातील कायदेशीर अडचणी सोडविण्याच्यादृष्टीने कायदे तज्ञांचा अभिप्राय घेण्यात यावा. अभिकर्ता संस्थेस वेळोवेळी लेखी / तोंडी सुचना देवुन सुधारणा करण्यास संधी दिली असुन सुध्दा अभिकर्ता संस्था उचित सुधारणा करीत नसल्याचे दिसुन येत आहे. यास्तव अभिकर्त्या विरूध्द कठोर कार्यवाही करावी. अभिकर्त्यास रॉयल्टी माफी व अनुदान देवु नये. नविन योग्य ठेकेदार नेमणुकीच्या दृष्टीने देखील कार्यवाही करावी. असा ठराव सर्वानमुते मंजुर करण्यात येत आहे.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव

अनुमोदक : मा.श्री.अशोक कानडे

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : नवरंग व्यायाम शाळा ते सर्जेपुरा रस्त्याचे दरम्यान असलेल्या चौकास " शितळा देवी चौक " असे नामकरण करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

**ठराव :** सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार व सदर भागातील नागरिकांच्या भावनांचा विचार करता नवरंग व्यायाम शाळा ते सर्जेपुरा रस्त्याचे दरम्यान असलेल्या चौकास " शितळा देवी चौक " असे नामकरण करणे बाबतच्या ऑफिस प्रस्तावात बदल करुन त्या ऐवजी रस्त्यास " शितळा देवी रस्ता " असे नामकरण करणे बाबतच्या ठरावास मान्यता देण्यांत येत आहे. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. दिपक वसंतराव सुळ

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :३ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : प्रभाग क्रमांक २१ मधील कापडबाजार भिंगारवाला चौकास " श्री भगवान संभवनाथ चौक " असे नांव देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.बोरा किशोरकुमार हिम्मतलाल

अनुमोदक : मा.श्री. त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :४ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : श्री.शित्रे धनंजय दत्तात्रय, लिपिक यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करणे बाबत मा.श्री.किशोर डागवाले, सभागृह नेता व इतर मा.नगरसेवक यांच्या याद्या व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. ही सभा श्री.शित्रे धनंजय दत्तात्रय,लिपीक यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करीत आहे. तसेच महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी दाखविलेल्या नैपुण्याबद्यल वेळोवेळी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात यावे. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.अविनाश घुले,

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक :६ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : २ री सुधारित मंजुर विकास योजना , अहमदनगर जी.एल.आर.नं.११७ व ११८ वरील आरक्षण क्र.१६९ ( माध्यमिक शाळा व क्रिडांगण ) वगळुन जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव ऑफिस रिपोर्टसह अंतिम मंजुरीसाठी.

-- ** --

**ठराव :**ऑफिस रिपोर्ट मंजुर. जी.एल.आर.नं.११७ व ११८ वरील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक १६९ वगळुन रहिवास विभागात समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात येत असुन अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यात यावा. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. मात्र सदर ठरावास मा.श्री.अनंत जोशी, मा.श्री.सुनिल त्रिपाठी यांचा विरोध.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव

अनुमोदक :मा.श्री.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : नागापुर / बोल्हेगांव या उपनगरांसाठी स्मशानभुमि / दफनभुमि इत्यादी कामासाठी नागापूर स.नं.१३० / १ ही जागा संपादन करणे बाबत मा.श्री.भानुदास कोतकर,नगरसेवक यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये झालेली व्यापक चर्चा नुसार सदरचा विषय पुढील महासभेपुढे पुनश्च सादर करावा. सदर प्रस्तावास प्राधान्य देण्यांत यावे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.भानुदास कोतकर

अनुमोदक : मा.श्री. सुनिल त्रिपाठी.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ९ दिनांक : २८-०७-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर प्रारूप विकास योजना ( वाढीव हद्द ) - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रारूप विकास योजना (वा.ह.) प्रसिध्द करणे व कलम ३० अन्वये मा.शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे तसेच कलम २१, २८ व ३० अन्वये आवश्यक असलेल्या मुदतवाढी मंजुर करणेबाबत.

--*--

**ठराव :**

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

विषय क्रमांक : ५ :- विडी कामगारांना जागा देणे बाबत :-

मा.श्री.कृ.द.जाधव :- विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्थेने मागणी केलेल्या पुर्वीच्या जागेसाठी ८ ते ९ लाख रुपये ९५ सालीच भरलेले आहेत. त्यांचे कडुन आता कोणत्याही प्रकारे वाढीव रक्कम न घेता त्यांनी आता त्यानंतर मागणी केलेली जागा त्याच रक्कमेत त्यांना देण्यात यावी. त्यांना जागा देणेबाबतचा प्रस्ताव व ठराव यापुर्वीच झालेला आहे. हे खरोखर विडी कामगार आहेत. तेंव्हा त्यांना जास्त पैसे न घेता जागेचा प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री.कैलास गिरवले :- मा.जाधव यांनी मांडलेल्या प्रस्तावाप्रमाणे ठराव मंजूर करावा.

मा.श्री.लोंढे :- विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्थेला यापुर्वी जी जागा दिलेली होती. ती का दिली नाही. याबाबतचा खुलासा करावा. ती जागा कोणत्या समाजाची आहे. गवळी समाजाची आहे काय? त्या जागे बाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा. महानगरपालिकेची जागा असेल किंवा त्यावर आरक्षण असेल, त्यावर अतिक्रमणे झालेली असतील त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करावा.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, मागील सन २००४ मध्ये सदर संस्थेला जागेची आदलाबदल करुन देणेसाठी ठराव मंजूर झालेला आहे. सदर संस्थेने फार पुर्वी पैसे भरलेले आहेत. व सहकारी विडी कामगार संस्था असल्याने व त्यांनी भरलेली रक्कम महानगरपालिकेत भरण्या ऐवजी बँकेत भरली असती तर त्यांची ३३ लाख पेक्षा जास्त रक्कम झाली असती. त्यामुळे आता महासभेपुढे हा विषय केवळ मंजूरी देणेपुरताच आलेला आहे. पुर्वीच्या जागेवर झोपडपट्टी वासियांची अतिक्रमणे असतील तर ती जागा बदलून देणे एवढया पुरताच हा विषय महासभेपुढे आलेला आहे.

मा.श्री.शंकरराव ह. घुले :- मी नगराध्यक्ष असतांना विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्थेला जागा देण्यात यावी व पुर्वीची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून त्यास कंम्पौंड घालावे असे सांगितलेले होते. पुर्वीची जागा देणे बाबत ठराव झालेला असतांना त्या जागेवर लोखंडे बाई यांचे नांव कसे काय लागले याचा खुलासा करावा.

मा.श्री.कैलास गिरवले :- विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्थेला द्यावयाच्या पुर्वीच्या जागेवर पाटोळे यांचे नांव लागलेले आहे. याबाबत महानगरपालिकेने काहीच कार्यवाही केलेली नाही. व मुदतीत अपील केलेले नाही. याबाबत महानगरपालिका अधिकारी यांचेवर कारवाई करणार आहात का? याचा खुलासा करावा. व निकालाविरुध्द अपील का केले गेले नाही याची चौकशी आयुक्त यांनी करावी.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, पुर्वी ज्या जागेचा ताबा दिलेला होता आता फक्त सदर जागा बदलून नविन जागा देणे बाबतचा प्रस्ताव आलेला आहे. त्यांनी भरलेली रक्कम बाजारभावाच्या रक्कमेपेक्षा जास्त आहे मात्र सदर जागेवर निकाल लागल्यानंतर अपील का करण्यांत आलेले नव्हते. या बाबत वस्तुस्थिती काय आहे याचा नगररचना विभागाने खुलासा करावा.

यावर नगररचनाकार धोंगडे यांनी सांगितले की, सदर बाबतीत आपण अजुनही अपील करु शकतो.

मा.श्री.मिलींद गंधे :- महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेकरीता लिगल ॲडव्हायझर का उपस्थित रहात नाहीत या बाबत खुलासा करावा.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- महानगरपालिकेच्या सभेमध्ये वेळोवेळी आदेश दिले जातात परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही.

मा.श्री.कैलास गिरवले :- महानगरपालिकेच्या विरोधी निकाल लागल्यानंतर त्याबाबत वेळीच कार्यवाही का होत नाही.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, मी सभेमध्ये वेळोवेळी सूचना देत असतो महानगरपालिकेच्या विकास कामाबाबत मीही प्रशासनास तीन पत्रे दिलेली आहेत. तसेच शिक्षण मंडळ व

इतर यांनी महानगरपालिकेचे केलेले ठराव याची माहिती मिळणे बाबत मी कळविले असतांनाही मलाही वैयक्तीक माहिती मिळालेली नाही.

मा.श्री.त्रिपाठी :- महानगरपालिका सभेमध्ये चर्चा झाल्यानंतर तात्काळ माहिती दिली पाहिजे तसेच माहितीच्या अधिकारा बाबत पुढील महासभेमध्ये विषय घ्यावा असे सांगितले. ज्याबाबत अंमलबजावणी करीत नाह. त्याबाबत माहिती अधिका-यांनी माहिती दिली पाहिजे.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, तातडीचे आदेश देवुनही अधिका-यांकडून माहिती दिली जात नाही.

मा.श्री.शं.ह.घुले :- अपीलामध्ये एकतर्फी निकाल दिला जातो. प्रशासन अधिका-याकडून माहिती दिली नाही. त्यामुळे सभागृहामध्ये गोंधळ निर्माण होवून प्रशासनाचा मी धिक्कार करतो असे सूचविले. व या करीता मी ५ मिनिटे सभात्याग करीत आहे. असे म्हणुन सर्व श्री.लोंढे , शं.ह.घुले, नजीर पहेलवान, अरिफ भाई, नामदेव पवार, दशरथ शिंदे यांनी ५ मिनीटे सभा त्याग केला. व माहिती येईपर्यंत व वकील येईपर्यंत सभा सुरु करु दिली जाणार नाही असे सांगितले. पुर्वीची जागा जी द्यावयाची होती ती जवळ जवळ सव्हा दोन कोटींची जागा आहे. याबाबत वकीलांना बोलुन माहिती घ्यावी.

यावर आयुक्त यांनी सांगितले की, नगररचना विभागाकडुन पुढील कार्यवाही केलेली नाही. त्यात जे कोणी कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

मा.श्री.शं.ह.घुले :- यांनी सांगितले की, विडी कामगार संस्थेला नविन जागा देण्या बाबत आमचा विरोध नाही.

यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की, सभागृहात योग्य ती माहिती द्यावी व दखल घ्यावी. जे अधिकारी उपस्थित असतील त्यांनी याची नोंद घ्यावी व सात दिवसांत निर्णय घ्यावा असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- याचप्रमाणे माळीवाड्यातील शिशुसंगोपन शाळेलाही जागा दिलेली आहे. त्यावर शाळेचे नांव लागलेले आहे. याबाबतही नोंद घेवून कार्यवाही करावी. त्यांनीही अतिक्रमण केलेले आहे. शाळेत डोनेशन घेवून प्रवेश दिला जातो.

मा.उपमहापौर :- अहमदनगर महानगरपालिकेच्या ज्या ज्या निरनिराळया जागा असतील त्याबाबत अद्यावत नोंदी घेणे बाबत इस्टेट प्रॉपर्टी अधिकारी नेमणे बाबत मी यादी दिली होती तो अधिकारी नेमण्यांत यावा.

मा.श्री.सोमनाथ लोंढे :- यापुर्वी मी सर्व मंजूर झालेल्या ले-आउट ची यादी मागितली होती. त्याबाबत धोंगडे यांना यादी दिलेली होती.

यावर नगररचनाकार धोंगडे यांनी यादी तयार आहे ती लगेच दिली जाईल असे सांगितले.

मा.महापौर यांनी अतिक्रमणाचा विषय महासभेत घेणे बाबत सूचना केली.

मा.श्री.सोमनाथ लोंढे :- अतिक्रमणाची मोहिम चालू केलेली आहे. ती कां थांबविण्यांत आली याबाबतही खुलासा करावा.

मा.श्री.शं.ह.घुले :- जागेबाबतचा निकाल विरोधात गेला होता. संबंधिताचे नांव कसेकाय लागले याची माहिती महानगरपालिकेच्या टिप्पणी मध्ये का देण्यांत आली नाही.

याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, विडी कामगारांच्या बाबत अपील केलेले नाही.

मा.श्री.शं.ह.घुले :- मला अपीलातील कागदपत्रे देण्यात यावी व इतर सर्व माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यांत यावी.

यावर मा.महापौर यांनी आपणांस या बाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन दिली जातील असे सांगितले.

विषय क्रमांक : ६ :- आरक्षण क्र.१६९ रहिवास विभागात समावेश करणे बाबत.. -

मा.श्री.कैलास गिरवले :- सदरचा विषय अंतिम मंजूरी करीता सभागृहापुढे आलेला आहे.

मा.श्री.अनंत जोशी, मा.श्री. मिलींद गंधे, मा.श्री.त्रिपाठी इत्यादी सदस्य यांनी याबाबत पुर्वी काय ठराव केलेला आहे याचा खुलासा करावा. रिपोर्टात उल्लेख झालेला नाही. पुर्वीचे इतिवृत्तही मंजूर झालेले नाही.

त्यानंतर ऑफिस रिपोर्ट संपूर्ण वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- ठरावात उल्लेख आलेला नाही. मंजूर विकास योजना आराखडा तयार करतांना तांत्रिक अडचण काय आलेली आहे याचा उल्लेख आलेला नाही.

त्यावर नगररचनाकार श्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, एम.आर.टी.पी.ॲक्ट चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करणे बाबत खुलासा केला त्यामध्ये जाहीर प्रसिध्दी द्यावी लागते. तसेच अर्जदारांचे म्हणणे ऐकुण घेतले जाते. त्याची सुनावणी घेतली जाते.

मा.श्री.त्रिपाठी :- सदरच्या जागेचे बाजार मूल्य जवळजवळ ८ कोटी इतके आहे. जागेचा भाव १,७०० प्रति स्क्वेअर फुट चालू आहे तेंव्हा सदर आरक्षणाची जागेचे आरक्षण उठवुन महानगरपालिकेने खरेदी करावी व त्याचा विकास करावा. त्यामुळे या प्रस्तावास माझा विरोध राहील.

मा.श्री.अनंत जोशी :- सदरच्या प्रस्तावास कायदेशिर मत दिलेले नाही व आयुक्तांचे मत नोंदवलेले नाही. त्यामुळे अंतिम ठरावास आमचा विरोध राहील.

मा.श्री.कृ.द.जाधव :- सदरचा प्रस्ताव हा या सभागृहापुढे अंतिम मंजूरीला फक्त आलेला आहे. तेंव्हा त्यास मंजूरी द्यावी असे सांगितले.

मा.श्री.अनंत जोशी :- नगरसचिव यांना सूचविले की, सदरच्या प्रस्तावास आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

विषय क्रमांक : ७ :- बोल्हेगांव स्मशान भुमी साठी जागा संपादन करणे बाबत.. -

मुळ प्रस्ताव आणि पुरक टिप्पणी वाचून दाखविण्यांत आली.

मा.श्री.त्रिपाठी :- सदर भागातील नागरिकांकरीता अंत्यविधी कुठे करणार आहात या बाबत विचारणा केली.

मा.महापौर :- सदर प्रस्तावामध्ये दोन टिप्पण्या देण्यात आलेल्या आहेत हा काय प्रकार आहे. जनरल बोर्डाच्या अजेंडया बरोबरच विषयास आवश्यक असणारी टिपणी आली पाहिजे. सदर नागपूर बोल्हेगांव विभागामध्ये पंचवीस हजार लोक रहात आहेत. सदर भागातील नागरिकांचा विचार करुनच सदर जागा घेण्यात यावी.

मा.श्री.अंबादास गारुडकर :- नागापूर , बोल्हेगांव हा जुना गावठाणचा भाग आहे. जुनी वस्ती आहे व गांव तेथे स्मशानभुमी असते. सदर विषयामध्ये त्यास जोडून दोन टिपण्या पाठविण्यांत आल्या आहेत त्यामुळे गोंधळ व संभ्रम झालेला आहे. प्रशासनाचे याबाबत काय म्हणणे आहे. याबाबत नेमका निर्णय काय घ्यावयाचा त्यामुळे मा.आयुक्त यांनीच निर्णय घ्यावा असे सूचविले.

मा.श्री.त्रिपाठी :- सदर स्मशानभुमीसाठी जागा घेणे अत्यंत आवश्यक आहे. नागापूर साठी दुसरी जागा कोणती आहे. सदर सर्व्हे नंबर १३०/१ मध्ये अतिक्रमणही झालेले आहे. परंतु नागरिकांच्या दृष्टीने स्मशानभुमीसाठी जागा घेणे आवश्यक आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव :- नागापूर बोल्हेगांव येथील सर्व्हे नंबर १३०/१ ही स्मशानभुमीची जागा खरेदी करणे बाबतचा विषय सभागृहापुढे ठेवलेला आहे. तथापि सदरची स्मशानभुमी ही नेमकी कोणत्या सालापासुन तेथे अस्तित्वात आहे. याठिकाणी किती भाग सिना नदीत गेलेला आहे. तसेच हिंदू - मुस्लीम - मातंग- ख्रिश्चन इत्यादी समाजाचे लोकांसाठी स्मशानभुमी आहे. सदर स्मशानभुमीचा किती भाग सिना नदीत वाहून गेला व किती पूररेषेत आहे. सदर स्मशानभुमीची जागा श्रीमती. सोनवणे यांनी कधी खरेदी केलेली आहे. व त्यानंतर सदर ठिकाणी स्मशानभुमी अस्तित्वात असतांनाच सदरची जागा खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मनपा सभेपुढे येतोय व महानगरपालिकेला ४२ लाख रुपयांचा गंडा घातला जात

असेल तर हे कितपत योग्य आहे. यास पायबंद घातला गेला पाहिजे. याबाबत माझे स्पष्ट मत आहे की, हा विषय मंजूर करु नये.

मा.श्री.शं.ह.घुले :- सदर प्रस्तावामध्ये प्रशासन आणि नंतर आयुक्त यांनी टिपणी दिलेली आहे त्यामुळे दोन मतप्रवाह निर्माण झालेले आहेत. या बाबत त्यांनी सूचविले की, अशा दोन टिपण्या न देता एकदाच प्रशासनाने मत मांडावे. व या बाबत दखल घ्यावी. आयुक्त हे सरकारचे प्रतिनिधी व अधिकारी आहेत त्यांना आपले स्पष्ट मत मांडता येते. त्यामुळे श्री.त्रिपाठी यांची सूचना बरोबर होती. सदर ठिकाणी लोकवस्ती वाढलेली आहे. व लोकांना मुलभुत सुविधा आवश्यक असतात. परंतु सदर जागेत जावुन पाहणी केली असता सदर ठिकाणी ४० वर्षापासुन स्मशानभुमी होती. व सदर इसम मजकूर यांनी सदर ठिकाणची जागा दोन वर्षापुर्वी खरेदी केली त्यामुळे आता महानगरपालिकेने खरेदीसाठी प्रस्ताव दिलेला आहे. ४२ लाख रुपये एवढे पैसे कशासाठी मोजता सदरची जागा घेवू नये व त्यासाठी लागणारा निधी नगरसेवकांच्या निधीमधून वर्ग करु नये. बोल्हेगांव मध्ये स्मशानभुमीसाठी जागा आरक्षण आहे काय याबाबत मा.आयुक्त यांनी अभ्यास करावा व ४२ लाख रुपये खर्च न करता आमचा निधीही कमी करु नये.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- सदर विषयाबाबत दोन टिपण्या का दिलेल्या आहेत. एक ठाम भूमिका घ्यावी. ४२ लाख रुपये देण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे येत आहे व सभागृहाची दिशाभुल होत आहे. याबाबतचा खुलासा झाला पाहिजे.सदर ठिकाणी कंम्पौंड वॉल बांधण्यात आलेली होती. त्याबाबतचाही विषय उपस्थित झालेला आहे. त्याबाबतचा खर्च होईस्तर कर्मचारी काय करीत होते.

मा.श्री.अशोक कानडे :- बोल्हेगांव नागापूर स्मशानभुमीसाठी जागा संपादनाबाबतचा विषय सभागृहासमोर चर्चेला आलेला आहे. या प्रकरणा बाबत मला काही सभागृहाच्या निदर्शनास आणुन द्यावयाचे आहे. सदर ठिकाणी वॉल कंम्पौंड पुर्वीच करण्यांत आलेले आहे. स्मशानभुमीच्या जागेचा विकास झाला पाहिजे. तसेच या जागांचे पावित्र्य राहिले पाहिजे. या जागेचा विकास करणे करीता मा.खासदार यांनीही आपल्या निधीतून काही निधी देवून स्मशानभुमीचा विकास केलेला आहे. त्याला आता ६ वर्ष झालेले आहेत. सदर ठिकाणी नागरिकांना प्रातर्विधीस प्रतिबंध केलेला आहे. एखादया नागरिकाचा दुर्देवाने मृत्यु झाल्यास त्याबाबत अंत्यविधी काय करावयाचे सदर जागेस आज त्या ठिकाणी दुसरा पर्याय नाही. याबाबत स्मशानभुमीचा विकास झाला पाहिजे.

सदर बाबत मा.श्री.कोतकर साहेब यांना मी याबाबत धन्यवाद देतो. वॉल कंम्पौंडचे कामही त्यावेळेस पालिका निधीमधुन खर्च केले आहे. याबाबत उपायुक्त यांनी लेखी दिलेले आहे. सदर भागात पुर्वी हागणदारी होती व वॉल कंम्पौंड करणे गरजेचे होते. शासनानेही या ठिकाणी विकासकामी खर्च केलेला आहे. व वॉलकंम्पौंडचा विषय बाजुला ठेवावा. याबाबत मनपा इंजिनियर श्री.काकडे यांची चूक नाही. व अभियंता यांना जबाबदार धरणे योग्य नाही. प्रचलित स्मशानभुमीसाठी जागा संपादन करुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व्हावे असे आम्हास वाटत नाही. परंतु जागा संपादना बाबत दुसरा पर्याय नाही. याबाबत कोणतेही शडयंत्र किंवा गंडा घालण्याचा प्रस्ताव नाही व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व्हावे हा हेतु नाही. प्रशासनाने असा विषय प्रथमदर्शनी का ठेवला. मा.भाउ जाधव यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत सविस्तर प्रस्ताव आमचे समोर मांडला पाहिजे व सविस्तर खुलासेवार विषय सभागृहात मांडणेसाठी आम्ही त्या भागातील प्रतिनिधीत्व करीत असल्याने हा विषय पुढील सभेत घ्यावा असे सांगितले.

मा.श्री.त्रिपाठी :- पुर्वी विकास कामी कामाच्या प्रस्तावावर नगररचना विभागाकडील अभिप्राय घेतला जात नव्हता त्यामुळे स्मशानभुमीच्या जागेवरील वॉल कंम्पौंड बाबत श्री.काकडे इंजिनियर यांना दोषी धरण्यास काहीच अर्थ नाही.

मा.श्री.घुले :- मा.श्री.त्रिपाठी यांनी या प्रस्तावाबाबत जी सूचना मांडलेली आहे ती योग्य आहे. व सदरचा विषय तहकुब करावा व सुंदर अमरधाम सदर ठिकाणी करण्यात यावे असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- ४० ते ५० वर्षापासुन सदर ठिकाणी स्मशानभुमी आहे याबाबतची यादी आम्ही दिलेली होती. पुर्वी नगररचना विभागाकडुन एन.ओ.सी.घेतली जात नव्हती अशी घटना घडली परंतु सदर भागातील नागरिकांनी मागणी केल्यानंतर नागरिकांच्या मागणी प्रमाणे कामे करणे भाग असतील त्यामुळे त्याबाबतचे एस्टीमेट केले होते. त्यामध्ये श्री.काकडे यांचा दोष नाही. त्यामुळे यामध्ये कारवाई चूकीची होत आहे. तरी पुढील सभेमध्ये याबाबतचा विषय घेण्यात यावा असे सांगितले. मा.वहाडणे खासदार असतांनाही त्यांचा निधी या ठिकाणी खर्च केलेला होता. शासनाने लोकाभिमुख कामे केलेली आहेत त्यामुळे आपणाकडुन फार मोठी चूक झालेली आहे असे नाही. आता या बाबत चर्चा न करता पुढीलवेळी विषय घेवून प्रस्ताव मांडावा. व प्रशासनाचे मत घ्यावे.

मा.श्री.लोंढे :- कल्याण रोडवरील रस्त्याबाबतचा विषय उपस्थित केला.

त्यावरश्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, रस्ता कुणाच्याही खाजगी जागेत नाही. याबाबत कागदपत्रे बघुन माहिती देवू.

मा.श्री.अनिल शिंदे :- नालेगांव अमरधाम येथील विकास कामांबाबत त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी यावर सदरची कामे महापौर निधीतून चालू असल्याचा खुलासा मा.महापौर यांनी केला व तातडीने ही कामे पूर्ण करणे बाबत संबंधित इंजिनियर श्री.काकडे यांना सूचना केली.

मा.श्री.भानुदास कोतकर :- स्मशानभुमीच्या जागेबाबत सविस्तर चर्चा केलेली आहे. सभागृहापुढे आलेल्या विषयाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. स्मशानभुमीचा विकास करण्यामागे सदरचा भाग चांगला व्हावा व शेवटच्या क्षणीही नागरिकांना आपले दुःख विसरण्यास मदत व्हावी हे पहाणे आवश्यक असते. नागापूर बोल्हेगांव येथील स्मशानभुमी मध्ये खासदार निधीमधुन सुधारणा यापुर्वी केलेल्या आहेत. याठिकाणी ५ स्मशानभुम्या आहेत तेथे २ ते अडीच वर्षा पुर्वी मी स्वतः गेलो असता सदर भागात शौचालया करीता जागा वापरात होती. त्यामुळे आम्ही सदरची जागा तत्कालीन आयुक्त श्री.पवार साहेब यांना दाखविली. व ग्रामपंचायत असतांना सदर भागात जे काम झालेले आहे ते दाखविले. व ५० हजार लोकवस्तीचा निर्माण झाल्यामुळे या भागात आपण चांगला विकास करु शकतो. असे सांगितले असता सदर भागामध्ये वॉल कंम्पौंड करा गार्डन व झाडे लावा. इत्यादी बाबत मागणी केली. व तसा प्रस्ताव केलेला आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकी हक्काची जागा नाही. त्यामुळे सदर जागा संबंधित मालकांकडुन खरेदी करणे हाच उपाय आहे. त्यामुळे हा प्रस्ताव केलेला होता. व त्यावर त्यांनी पुढील कामे करता येतील व या जागेचे व्हॅल्युएशन काढण्यास सांगितले ते ४२ लाख इतके झालेले आहे.

आता या प्रश्ना बाबत स्थानिक वर्तमान पत्रामध्ये बातमी आल्यानंतर आयुक्त यांनी दुसरी टिप्पणी पाठविलेली आहे. याबाबत विषय समजला नसेल तर पुन्हा पहावा. सर्व समाजाच्या लोकांनी अंतविधीसाठी कोठे जावयाचे जागेकरीता पैशाचा विषय या ठिकाणी महत्वाचा नाही. या विषयात मार्ग कसा काढावयाचा हे पहावे याठिकाणी अद्यावत स्मशानभुमी झाली नाही तर आम्हांस नाईलाजास्तव रस्त्यावर उतरावे लागेल याची आपण नोंद घ्यावी. सदर प्रस्तावामध्ये व जागेत झालेल्या कंम्पौंड वॉल बाबत इंजिनियर यांना निलंबनाचा विषय होवू शकत नाही. तेंव्हा या विषयावरचा संपूर्ण अभ्यास करुन कशाप्रकारे मार्ग काढावा व अशा पध्दतीने माहिती संकलीत करून सदरचा विषय पुढील सभेपुढे न्यावा असे सांगितले.

विषय क्रमांक : ८ :- ए.एम.टी.बस सेवा बाबत...

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- सन २००५ मध्ये महानगरपालिका शहर बससेवा विषय मंजूर झालेला होता. व प्रत्यक्षात १ जानेवारी २००७ पासुन शहर बससेवा कार्यान्वीत झाली. यामध्ये संस्थेशी १० वर्षाचा कायदेशिर करार झालेला आहे. तसेच ७ टक्के रॉयल्टी महानगरपालिकेला मिळालेली असल्याने व संस्थेने चांगली सेवा दिलेली होती. मधील काळात अभिकर्त्यास डिपॉझिट कोणत्या कायद्याने परत दिले व ठरविलेली रॉयल्टी माफ केलेली आहे काय. व दरमहा संस्थेला १ लाख रुपये अनुदान देणार आहात मग महानगरपालिके वर १ कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. त्याऐवजी महानगरपालिकेने परिवहन बससेवा चालू करावी व त्याबाबतची कार्यवाही करावी. सदर संस्थेकडे असलेल्या थकबाकी बाबत फौजदारी करावी. ही बससेवा पुनःश्च चालू करावी ठेकेदारास झुकते माप का देण्यांत येत आहे. त्यांचेवर त्वरीत कार्यवाही करावी व बससेवा चालू करावी. सदर ठेकेदाराने दिलेले डिपॉझिट आपण परत करु शकतो का.

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिका इतिहासामध्ये या गंभीर चूका करीत आहे त्यामध्ये ही एक गंभीर चूक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यांत येणारी सेवा नफ्यात चालू आहे. आपल्या शहरात मात्र ती का तोट्यात चालते हे समजू शकत नाही. याबाबत पुरवणी टिप्पणी स्वागतार्ह आहे. आयुक्त यांचे कायदेशिर मत घेणे आवश्यक होते. अभिकर्त्याने कराराचा वेळोवेळी भंग केलेला आहे. संस्थेकडुन डिपॉझिट कोणत्या स्वरुपात घेतले आहे. व त्यावर अनुदानाची खैरात केली जात आहे. करार रद्द करुन दुस-या ठेकेदारास ही सेवा चालविण्यास द्यावी. ठेकेदारास कुठल्या आधारे पत्र दिले आहे याचा खुलासा करावा.

यावर श्री.निकम यांनी कराराच्या बाब क्रमांक ४ बँक गॅरंटी बाबत खुलासा केला.

मा.उपमहापौर :- कराराप्रमाणे ठेकेदारास नियमानुसार एक महिन्याची नोटीस द्यावी लागत आहे. नागरिकांची गैरसोय होवू नये म्हणुन त्याकडे पहाणे आवश्यक आहे. ठेकेदार कोर्टातही जावू शकतो. त्या करीता वेळोवेळी मिटींगा घेवून तडजोडीचा प्रयत्न केलेला आहे. परंतु ठेकेदार प्रतिसाद न देता पैसे संयुक्त खात्यात भरत नाही. व काय करायचे करा असे ठेकेदार उत्तर देत आहे. ठेकेदार ६ महिन्यापासुन पैसे भरीत नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण एक दिवसात सेवा बंद करु शकतो. परंतु ठेकेदार महानगरपालिकेच्या मानगुटीवर बसण्याचा प्रयत्न करीत आहे.

मा.श्री.अनंत जोशी :- बससेवे बाबतचा कायदेशिर करार रद्द करावा व कारवाई करावी. त्याबाबत आम्ही तुमचे पाठीशी आहोत.

मा.श्री.फुलसौंदर :- महानगरपालिका बससेवा चालू करावी.

मा.श्री.त्रिपाठी :- शहर बससेवेचे श्री.दारकुंडे यांनी प्रशासनास मुर्खात काढले आहे. रॉयल्टी माफ वगैरे करणे व अनुदान देणे हे बेकायदेशिर आहे. आर्थिक अनुदान देवू नये योग्य मार्ग काढावा. याबाबत सेकंड लोएस्ट श्री.हुंडेकरी यांचे ६.२ च्या रॉयल्टीचे देणारे ठेकेदार यांना निविदा देवू शकतो काय ? तो विचार करावा व सदरचा विचार तीन ते चार महिन्यापूर्वीच केला पाहिजे होता. आता सदर संस्थेला कोणतेही मानधन देवू नये.

मा.श्री.मिलींद गंधे :- शहर बससेवा ही फायद्यात आहे. परंतु ठेकेदार यांना होणा-या त्रासाबद्दल प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे. रिक्षांवाल्यांकडूनही शहर बससेवेची अडवणूक होत आहे. शहर बससेवेला लागणारे थांबे आपण दिलेले नाहीत. मुलभुत सुविधाही आपण दिलेल्या नाहीत. मात्र लोकप्रतिनिधींच्या ठेकेदाराला देण्यात येणा-या खैरातीला विरोध आहे. भाजपा शिवसेना यांचा यास विरोध आहे असे सांगितले.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, १० वर्षाचा करार रद्द करावयाचा असल्यास बँक जामिनदार म्हणुन आपणांस नियमानुसार कारवाई करावी लागेल.

मा.श्री.दिप चव्हाण :- शहर बससेवा एक भावनात्मक नागरिकांच्या सोईसाठी चालू करण्यांत आलेली होती. ठेकेदाराशी केलेला करारनामा झाल्यानंतर पुन्हा करारनाम्याचा प्रश्न व करारनामा

बदलण्याचा प्रश्न व त्याबाबतचा अधिकार महानगरपालिका सभेस आहे काय ? त्या बाबतीत अटी व शर्ती बदलण्याचा अधिकार प्रशासनास आहे. व त्यानंतर होणारे परिणामासही प्रशासन जबाबदार असणार आहे. आता याबाबत कायद्याचा विपरीत अर्थ लावून बदल करु नका. या बाबत अशा प्रकारे पायंडा पडून चुकीच्या प्रथा निर्माण होतील. ही प्रथा महानगरपालिकेस परवडणार नाही. अशाच प्रकारे इतर रस्ते व इमारती याबाबतच्या निविदाचे करारनामे होत असतात त्यातही हा प्रश्न निर्माण होवू शकतो. तेंव्हा अटी व शर्ती बदलण्याचा अधिकार आयुक्त यांनाच आहेत. एजन्सी करारनामा बदलून देणार आहे काय ? आयुक्तांनी खुलासा केल्यास योग्य होईल. आयुक्त यांचा करारामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव नाही.

अटी-शर्तीचा भंग केल्यामुळे याबाबतची नोटीस महानगरपालिके मार्फत देण्यात आलेली आहे. कोणत्याही करारनाम्याचा विषय मागणी मान्य करता चूकीच्या पध्दतीचा अवलंब करु नका सदर प्रस्ताव हा पुढील बोर्डात ठेवावा. व अटी शर्ती मान्य करु नये व करणार असल्यास माझा यास विरोध नोंदवावा. सदर महानगरपालिका बससेवेच्या गाड्या या ठेकेदार यांनी अगोदर खरेदी केलेल्या होत्या परंतु नासिक परिवहन कार्यालयामध्ये यामध्ये अडचणी आल्यानंतर सदरच्या गाड्या या महानगरपालिकेच्या नावावर केल्या गेल्या. लायसन्स न दिले गेल्यामुळे महानगरपालिकेच्या नावावर केले आहे व नंतर असे नांव लावले आहे.

तेंव्हा एकही मागणी मान्य करु नये व चूकीचा पायंडा पाडू नये याबाबत औरंगाबाद येथील बससेवेची पहाणी करावी व तेथे कशा प्रकारे चालविली जात आहे याबाबत माहिती घ्यावी.

मा.श्री.अशोक कानडे :- शहर बससेवा चालू केल्या नंतर नागरिकांना मोठ्या प्रमाणावर आनंद झालेला होता. व ठेकेदार सुरुवातीस चांगली सेवा देत होता व यामध्ये त्यावेळेस कुठलेही राजकारण न करता प्रस्ताव मंजूर होवून पाठींबा दिलेला होता. मात्र आता शहर हद्दीतील समाविष्ठ झालेल्या १२ गावातील नागरिकांचे प्रश्न उपस्थित ठेवून त्यांना वेठीस धरीत आहे. नागरिकांना बससेवेचा लाभ होत होता. व बाहेरील नागरिक नगर शहरात आल्यानंतर ५ ते ७ रुपयांमध्ये शहर बससेवेने ते एम.आय.डी.सी.पर्यंत जात होते व त्यावेळेस ते खरोखर धन्यवादास पात्र होते.

मात्र ठेकेदाराला पुरविल्या जाणारे आर्थिक सवलती महानगरपालिकेच्या हिताविरुध्द आहे असे आमचे मत आहे. सामान्य माणसांसाठी याबाबतचा निर्णय झाला पाहिजे. आज आपल्या समोर ज्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत त्यामुळे ठेकेदाराला धड सोडता येत नाही व धरताही येत नाही. अशी अवस्था निर्माण झालेली आहे. व सर्व साधारण सभेसही वेठीस धरत आहे. त्यामुळे संस्थेवर कडक कारवाई केली पाहिजे.

मा.श्री.कृ.द.जाधव :- शहर बससेवेबाबत बरीच चर्चा झालेली आहे. यासाठी इन्स्पेक्शन बंगल्यावर मिटींगा झाल्या. त्याठिकाणी चर्चेच्या ओघामध्ये ठेकेदारास रॉयल्टी माफ करुन १ लाख रुपये देवू टॅक्स माफ करु इत्यादी चर्चेवर ठेकेदार तयार झाले. त्यासाठी सर्व अधिकारी सदर ठिकाणी उपस्थित होते. व त्यांनी बोलाविल्यामुळे चर्चा केली. आयुक्त यांनी करण्यात येईल असे सांगितले. व याबाबत तेथेच स्पष्टपणे सांगितले असते तर ठराव करु शकतो तर अशा रितीने विषय आला नसता. अधिकारी त्यास सहमत होते. विषय घेतल्यानंतर ऑफिसने त्यावर आपले पक्के मत द्यावे प्रशासनाने मोठी चूक केली तर त्यास कोणास प्रायश्चित्त द्यावयाचे ही जबाबदारी प्रशासनाची आहे. सर्व अधिकारी यांचेबरोबर चर्चा केलेली आहे.

मा.श्री.शं.ह.घुले :- अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. अनेकांनी मते मांडलेली आहेत. त्यामध्ये मा.श्री.अशोक कानड, मा.श्री.जाधव यांनीही मत मांडले आहे. मात्र ऑफिस रिपोर्ट वेगळा आलेला आहे. त्यामुळे ठेकेदारास धरल तर चावतं आणि सोडलं तर पळत अशी अवस्था आहे. २५ लाख रुपयांच्या बँक गॅरंटीमधुन २० लाख रुपये स्थायी समिती ठरावान्वये दिलेले आहेत. व ५ लाख रुपये शिल्लक आहेत. याबाबत मला विनंती करावयाची आहे की, केळकर साहेब यांनी या गोष्टीस पाठींबा दिलेला होता असे दिसून आले. व बी.ओ.टी.तत्वावरील विषय होता तर त्यास आपणांस अनुदान देता येते काय. बँक गॅरंटी महानगरपालिका वसूल करणार आहे काय ? शहर बससेवा ही सर्व सामान्यांसाठी चालू राहिली पाहिजे. या बाबत आयुक्त यांनी खुलासा केला पाहिजे असे सांगितले.

आयुक्त :- सर्व प्रकारचा निर्णय महासभेने घेतला जाईल व महासभेचा तो अधिकार आहे. असे सांगितले. मी अहमदनगर येथे आयुक्त पदावर नविनच रुजू झालेलो होतो व या प्रस्तावाबाबत मार्ग काढण्यास व गैरसोय दूर करण्यास मी प्रयत्नशिल होतो. ठेकेदारास रु.१० लाख देण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतला होता व बससेवा सुरु झाली. दुहेरी टिपणी मान्य नाही परंतु अधिकारी बेजबाबदारपणे टिपणी देतात. सभागृहामध्ये घेतलेला निर्णय हा लोकमताचा व लोकभावनेचा निर्णय होईल.

संस्थेचे श्री.दारकुंडे हे आर्थिक दृष्टया सक्षम आहे किंवा नाही हे त्यावेळेस पाहिले गेले नाही. शहर बस वहातुकीच्या ११ सदस्यांनाही याबाबत नोटीसा दिलेल्या आहेत.

अमरावती येथे शहर बससेवा फायद्यात आहे.

मा.श्री.कैलास गिरवले :- आर्थिक मागण्या स्विकारु शकत नाही ते चूकीचे आहे. या बाबत पुरवणी करार केलेला आहे. त्यामध्ये महानगरपालिका जबाबदार रहाणार नाही असे म्हटले आहे. याबाबत संघटनेच्या प्रवासी मालवाहतुक सहकारी संघटनेची सर्व माहिती घेवून त्यावर बोजा चढवावा. श्री.दारकुंडे यांनी २४/११/२००७ पासुन संयुक्त खात्यात कोणतेही पैसे भरलेले नाही. पैसे भरण्याचे बंद केले आहे. त्यांना नोटीस दिलेली नाही. यामध्ये भिन्याचे कारण नाही. यामध्ये महानगरपालिकेचे ३० लाखाचे नुकसान झालेले आहे. व कराराचा भंग झालेला असल्यामुळे त्याबाबत त्यांची मालमत्ता जप्त करावी.

मा.श्री.घुले :- सदर बाबतीत फौजदारी गुन्हा दाखल करावा.

यावर आयुक्त यांनी सांगितले की, सर्व सदस्यांच्या भावना जाणुन घेणे आवश्यक आहे. यावर सर्व कागदपत्रे जमा करुन पाहुन कार्यवाही केली जाईल.

मा.श्री.अभय आगरकर :- यामध्ये सर्व सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. शहर बससेवा रद्द व्हावी किंवा ती चालवू नये असे वाटत नाही.

बससेवेचे श्री.दारकुंडे अयशस्वी का ठरले याची कारणे काय आहेत याबाबत खुलासा करावा. त्यांना पत्र दिले आहे काय. सदर बाबतीत बँक गॅरंटी कमी केल्याने लायबलिटीज कमी होत आहे. त्यामध्ये प्रशासन दुटप्पी भुमिका घेत आहे यास आमचा विरोध आहे. सदर बाबतीत त्या संस्थेला काय पत्र देण्यांत आले ते वाचून दाखवावे.

ते वाचून दाखविण्यांत आले.

संस्था पैसे भरत नसेल तर स्थायी समितीने मंजूर करण्याचे कारण काय आहे. त्यामध्ये आमचे समाधान होत नाही. संस्था अटी व शर्तीचा भंग करीत असेल तर त्यांची मानसिकता लक्षात आली पाहिजे. अटी व शर्तीचा भंग एका बाजूने झाला व दोन्ही बाजूने झाला तर काय. याबाबतचा खुलासा करावा. हा विषय गाभिर्याने घेतलेला नाही.

यावर मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम यांनी खुलासा केला संस्थेला पत्र दिले आहे. व शक्य ती सर्व मदत केली आहे.

यावर आगरकर यांनी सांगितले की, महानगरपालिका कोणत्या स्टेप घेणार आहेत याचा निर्णय घ्यावा. शहर बससेवेसाठी महानगरपालिकेच्या वतीने बस थांबे बांधुन दिलेले नाहीत. यास कालावधी का लागलेला आहे याचा खुलासा करावा.

याबाबत निकम यांनी खुलासा केला.

बँक गॅरंटी मधुन पैसे देणे बाबतचा विषय हा सर्व साधारण सभेपुढे यावयास पाहिजे होता. तो तसा स्थायी समितीपुढे का ठेवला. जर स्थायी समितीस अधिकार आहेत असे म्हणता तर मग सदरचा विषय जनरल बोर्डापुढे का ठेवला. बँक गॅरंटी कमी करीत असतांना लायबलिटी कमी केलेली आहे. प्रशासन याबाबतीत दुटप्पी भुमिका घेत आहे यास आमचा विरोध आहे. बँक गॅरंटी कमी का केली. ११ व्या महिन्यापासुन बेकायदेशिरपणे पैसे भरत नसतांना स्थायी समितीने मंजूरी देवून पैसे भरण्याचे कारण काय ? याबाबतीत ठेकेदार यांना अॅग्रीमेंट टर्मिनेट का करु नये अशी नोटीस देवून समज दिली पाहिजे होती. प्रशासन कुठलाही विषय गांभिर्याने घेत नाही.

यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, स्थायी समितीकडे स्पष्ट विषय मांडलेला आहे. व एकवेळ सदरचा विषय तहकुब ठेवलेला होता.

यावर मा.श्री.आगरकर यांनी सांगितले की, रिपोर्ट ठेवलेला नाही व त्यामधील त्रुटी रिपोर्टात ठेवलेल्या नाहीत त्याबाबत लिगल रिटेनर यांनी काय लिगल ओपिनियन दिले आहे. त्याबाबत प्रशासनाने ठोस भुमिका घेवून अनुदान देवू नये अभिकर्ता सक्षम नाही. त्याबाबत योग्य ती कायदेशिर कार्यवाही करावी. याबाबत आपण पर्यायी व्यवस्था काय करु शकतो याचा खुलासा करावा.

आयुक्त या विषयावर गांभिर्यपुर्वक चर्चा घडवुन आणली व सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या याबद्दल आभार मानतो. या विषयांमध्ये लोकभावनेशी नाळ जोडलेली असल्यामुळे करार टर्मिनेट करण्यापुर्वी सर्वांचे मत घेणे आवश्यक होते. शहर बस सेवे बाबत अकोला अमरावती इत्यादी ठिकाणची माहिती घेतली असता सदर ठिकाणी ५ वर्षापासुन सेवा सुरळीत चालू आहे. नगरमध्येच असे का होते हे समजू शकत नाही. मक्तेदार हा असफल व आर्थिक दृष्टया सक्षम नाही. बस गाड्या महानगर बँकेकडून जप्त केल्या गेल्या यामध्ये नागरिकांना त्रास झाला व आंदोलने झाली या स्थिती बाबत इन्स्पेक्शन बंगल्यावर निर्णय घेतला गेला. व आर्थिक बाबीशी निगडीत जनरल बोर्ड सभेपुढे विषय ठेवण्यात आला आहे. व त्यानुसारच सदरचा प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे आला. दोन टिपणी याबाबत देण्यात आल्या. दोन टिपण्या बाबत अधिक माहिती घेवून पुरक टिपणी या बाबत दिलेली होती. बँक गॅरंटी २५ लाख रुपयांची घेतलेली होती करारामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, अभिकर्ताचे दायित्व अदा करण्यासाठी बँक गॅरंटीचा वापर केला जाईल व बँक गॅरंटी महानगरपालिकेकडे राहील परंतु ठेकेदाराने बँक गॅरंटीतील रकमा परत तारण देण्यास नकार दिला याबाबत चर्चा केली होती. महानगरपालिकेकडे परिवहन समिती नसल्यामुळे स्थायी समिती सक्षम आहे.

मा.श्री.घुले :- महानगर बँकेने ज्याप्रमाणे गाड्या जप्त केल्या होत्या त्याप्रमाणे आपला काही निर्णय होईल का. महासभा सक्षम आहे.

मा.श्री.महापौर :- नगर शहरामध्ये जानेवारी २००७ मध्ये शहर बससेवा सुरु केलेली होती व शहर बससेवा सुरु असली पाहिजे अशी भुमिका होती. व बससेवा बंद पडु नये याबाबत ठेकेदार यांचेशी वेळोवेळी अधिका-यांनी व पदाधिका-यांनी चर्चा केलेली आहे. याबाबत गरज महानगरपालिकेस जास्त आहे. महानगरपालिकेस ठेकेदार यांनी वेठीस धरले आहे. याबाबतीत मा.सदस्य सर्वश्री.आगरकर, जोशी, गंधे यांनी बससेवा चालू राहिली पाहिजे व नविन ठेकेदार नेमुन बससेवा सुरु ठेवावी व काय मार्ग काढु शकतो याबाबतीत तांत्रिक बाबीतपासुन कायदेशिर कठोर कारवाई करण्याबाबत महासभा मान्यता देत आहे असे सुचविले.

यावर मा.श्री.गिरवले यांनी सेकंड लोएस्ट ठेकेदार कंपनी यांचे टेंडर विचारात घेवू शकतो काय ते पहावे त्याबाबत महासभा सर्व अधिकार देत आहे असे सुचविले.

यावर मा.श्री.आगरकर यांनी सांगितले की, याबाबतीत कायदेशिर अडचणी दूर केल्या पाहिजेत.

विषय क्रमांक :- ९ -: प्रारुप विकास योजना बाबत मुदत वाढ मंजूर करणे -

मा.श्री.अरिफ शेख :- नियोजन समिती सदस्य यांनी प्रास्तविक भाषणात सांगितले की, यासमितीवर आम्हास काम करण्यास संधी दिली त्याबाबत आभार मानतो. यावर आमचे वरिष्ठ नेते दादाभाउ कळमकर, मा. आ. कर्डिले, मा.भानुदास कोतकर, मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.गिरवले, इत्यादी व समिती सदस्य याबाबतीत आम्ही सर्व शहराचा आढावा घेतला. सोईसुविधांची पाहणी केली. नागरिकांच्या हरकती व सूचना यांचा विचारात घेवून समक्ष पहाणी करुन चौकशी करुन तयार केलेला अहवाल सभागृहासमोर मांडला आहे.

मा.श्री.नामदेव पवार :- महानगरपालिकेच्या सभागृहात सन २००६ मध्ये तात्पुरत्या विकास आराखडयासाठी विशेष घटक योजनेसाठी शासनाकडे मागणी केलेली होती. त्याप्रमाणे आपले शहर व हद्दवाढ इत्यादी नियोजनबध्द विकास करण्यासाठी व महानगरपालिकेने आवश्यक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने या शहरातील नागरिकांच्या हरकती व सूचना मागविल्या होत्या. पुर्वी महानगरपालिकेचे क्षेत्र कमी होते. आता महानगरपालिकेचे क्षेत्र वाढलेले आहे त्यामुळे ज्या सेवासुविधा देण्याकरीता यामध्ये शाळा क्रीडांगणे, भाजी मंडई यात विकासात्मक बदल हवे होते त्यासाठी राखीव जागा बाबत वाढत्या

लोकसंख्येचा विचार करुन तसेच अल्पसंख्य अल्पउत्पन्न, विशेष आरक्षण, भटक्या व विमुक्त नागरिकांना जागा, त्याचप्रमाणे कत्तलखाने, जागा गोठे इ.आरक्षणासाठी ज्याठिकाणी चुकीची आरक्षणे होती . दारिद्रयरेषेखालील नागरिकांसाठी विशेष आरक्षण नाही ते ठेवण्यात यावे. तथापि ब-याच ठिकाणी गरीब शेतक-यांच्या जागेवर आरक्षणे जास्त टाकलेली आहेत मात्र ब-याचशा बिल्डर्सनी ले-आउटस मंजूर करुन घेतले आहेत त्यावर मात्र आरक्षण नाही. हेतुपुरस्सर शेतक-यांच्या जागेवर आरक्षण टाकले आहे असे वाटते. त्यामुळे त्यांच्या हरकती मान्य करणे. खेळाचे ग्राउंडस कमी आहेत त्याबाबतची आरक्षणे दुरुस्त करण्यांत यावीत.

मा.श्री.त्रिपाठी :- पुढील ३० वर्षांचा विचार केलेला आहे. याबाबत जो अहवाल तयार केलेला आहे. त्याबाबत नियोजन समितीचे सदस्य सर्वश्री.अरीफ शेख, सतिष मैड, पवार यांचे आभार मानतो. ब-याचशा शेतक-यांच्या जागेवर आरक्षण टाकलेले आहे. त्यामध्ये उदा - स्वातंत्र्य सैनिक संघटनेचे डॉ.रविंद्र कवडे यांचे सर्व्हे १०४ आरक्षण क्र.३०१ बाबत जे आरक्षण टाकले आहे ते संबंधित मालक अल्पभुधारक असल्यामुळे त्यांना उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे त्यांच्या ४० गुंठयावर आरक्षण टाकलेले आहे. वास्तविक स्वातंत्र्य सैनिकांना जागा देतो मात्र इथे उलट झाले आहे त्यांच्या जागेवर आरक्षण टाकले आहे.

मा.महोदय, स.नं. ९ आर ३०१ - हे आरक्षण चुकीचे पडलेले असुन त्याठिकाणी श्री.कवडे कुटूंबियांना स्वातंत्र्यासाठी ज्यांनी जीवन अर्पित केले अशा कै.जानकीबाई रभाजी कवडे यांचे सदर ठिकाणी स्मारक बनविणे आहे. एकुण ६५ गुंठे पैकी २५ गुंठे विशाखापट्टण हायवे साठी जागा गेलेली असुन उर्वरित जागे पैकी ४० गुंठयामध्ये स्मारक व कुटूंबातील ३ भाउ , २ बहिणी यांना सदर ठिकाणी निवासी घरे बांधणे आहे. शासन स्वातंत्र्यसैनिकांना जागा देवुन शेतजमिनी देवुन पुनर्वसन करण्यांचा प्रयत्न करतात. परंतु या जागेवर आरक्षण टाकुन आंतरराष्ट्रीय किर्तीचे नगर शहराचे नांव संपुर्ण जगामध्ये किर्ती मिळवुन देणारे अशा डॉ.रविंद्र कवडे व त्यांच्या कुटूंबियांना भुमिहिन करण्यांचा प्रयत्न आहे असे वाटते. ही बाब शहराच्या दृष्टीने व मनपाच्या दृष्टीने अत्यंत खेदजनक आहे. त्याचप्रमाणे स.नं. १०४ आर.२७० या ठिकाणी शाळा व क्रिडांगण असे आरक्षण कवडे कुटूंबियांच्या जागेवर आहे. या जागेमधुन दौंड मनमाड रेल्वेलाईन गेलेली आहे. या जागेपासुन हाकेच्या अंतरावर इंग्लिश मिडियम शाळा व क्रिडांगण आहे. रेल्वे लाईन गेल्यामुळे क्रिडांगण दाखविणे हे शाळेच्या लहान मुलांच्या दृष्टीने / खेळाडुंना संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे.

सदर ठिकाणी आरक्षण कायम झाल्यास कवडे कुटूंब व त्यांच्या भगिनी हे सर्व जण भूमिहिन होतील. सध्या त्या ठिकाणी कवडे कुटूंब व त्यांच्या भगिनी उपजिविकेसाठी बारा महिने पिके घेत आहेत. त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चाललेला आहे. या जागेवर आरक्षण कायम केल्यास स्वातंत्र्य सैनिक कुटूंबावर आपण फार मोठया प्रमाणांत अन्याय केल्यासारखे होईल. यामुळे कवडे कुटूंबिय , सर्व स्वातंत्र्य सैनिक यांच्या मध्ये देशासाठी त्याग केल्याच्या पश्चातापाची जाणीव होईल व स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटूंबासमोर महानगरपालिकेस अत्यंत रोषास सामोरे जाणेची वेळ येवु शकते. स्वातंत्र्य सैनिक विस्थापित होणेची वेळ आपल्यामुळे येवु नये व त्वरीत दोन्ही आरक्षणे रद्य करून कवडे कुटूंबियांचे विनंतीचा विचार या सभागृहातील सर्व नगरसेवक / नगरसेविका यांनी करावा हि विनंती. तरी त्यांच्या जागेवरील आरक्षण उठवावे.

मा.श्री.कृ.द.जाधव :- श्री.त्रिपाठी यांनी जी सूचना मांडलेली आहे त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे यांचे सर्व्हे नंबर २६४ वरील भाजी मार्केटचे आरक्षण व तसेच सर्व्हे नंबर २८३ व १८९/२ वरील आरक्षण उठवावे.

मा.श्री.फुलसौंदर :- महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्रातील विकास अहवाल सादर करण्यात आलेला आहे. सन १९९९ पासुन हे काम चालू आहे. वेळोवेळी मुदतवाढी घेतलेल्या आहेत. प्लॅनिंग कमिटीने चांगल्या प्रकारे कामे केलेली आहेत. शॉपिंग सेंटरवर नियमाप्रमाणे आरक्षणे आहेत काय व

त्याची गरज आहे काय ? शहराचा विकास करतांना ले-आउट मधील १० टक्के जागा ओपन ठेवतो ॲमिनिटीज टाकाव्या लागतात. जे आरक्षण मर्च केलेले आहे. त्याचा भुखंड धारकाला फायदा होतो.

मा.श्री.अभय आगरकर :- विकास आराखडयामध्ये एकाच ठिकाणी तीन-तीन आरक्षणे टाकलेली आहेत. याठिकाणी जास्तीत जास्त शेतकरी भरडले गेले आहेत. विकास योजना राबवितांना सर्व सर्व्हे नंबरचा विचार केला पाहिजे.

मा.श्री.फुलसौंदर :- यामध्ये सर्व सामान्यांचा बळी जात असेल तर ही खेदाची बाब आहे.

मा.श्री.कृद.जाधव :- ज्यांचेवर अन्याय झालेला असेल त्यांची नांवे सांगितली तर त्याचा विचार जरुर करावा. कोणत्या शेतक-यावर अन्याय झाला ते दाखवावे त्याचा विचार जरुर केला जाईज.

मा.श्री.फुलसौंदर :- जी १२ गांवे समाविष्ट झालेली आहेत त्यामध्ये अमरधाम स्मशानभुमीकरीता आरक्षण ठेवले आहे काय. कचरा डेपोसाठी आरक्षण सोडले आहे काय. सावेडी भुयारी गटारी योजना विविध भागात जागा ठेवण्यांत याव्यात.

मा.श्री.वाकळे :- विविध मुद्दे जे मांडले आहेत ते ऐकुण घेतले पाहिजेत व आम्ही काही त्रुटी लेखी देत आहोत त्याचा प्रस्तावात उल्लेख करावा अ.नं.२११ चे रिझर्वेशन काढले आहे. व नकाशावर मात्र काढलेले दिसुन आले नाही.

मा.श्री.फुलसौंदर :- आरक्षणामध्ये मुदत समाविष्ट करावी. चार दिशेला चार प्लॅन ठेवावेत.

श्री.धोंगडे :- याबाबत मनपा इंजिनिअर यांचेशी चर्चा केलेली आहे.

मा.श्री.फुलसौंदर :- चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.१३२/१/२ जुना कचरा डेपो महानगरपालिकेचे कर्मचारी श्री.भोसले यांचे मुळमालकीच्या जागेवर आरक्षण तसेच ठेवले आहे. वास्तविक त्यांना कुठलीही जागा नाही. श्री.भोसले सदर ठिकाणी टपरी बांधुन रहात आहेत.

मा.श्री.घुले :- मा.फुलसौंदर मा.वाकळे यांनी तळमळीने मांडलेल्या सूचना जरुर विचारात घ्याव्यात. पुर्वी इंग्रजांची नियोजन करण्याची जी पध्दत होती ती वाखाणण्या जोगी आहे. तसे नियोजन करावे. तसेच श्री.कवडे यांच्या जागेवर जे आरक्षण टाकले आहे त्यावर विचार होवून रद्द करण्यांत यावे.

मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी :- रस्त्याच्या रचना चूकीच्या आहेत. सर्व्हे नं.८१ मधील रस्ता बाजूला सरकवावा व रविंद्र कवडे यांच्या प्रस्तावाला पाठींबा देत आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- यामध्ये एकुण हरकती किती आलेल्या होत्या. एकुण किती आरक्षणे आहेत. व आरक्षणा खालील एकुण किती हेक्टर जागा आहे. याची माहिती देण्यात आलेली नाही ती देण्यांत यावी.

यातील किती आरक्षणे उठविलेली आहेत व शासकीय आरक्षणे किती आहेत. समितीने किती आरक्षणे उठविलेली आहेत.

मा.श्री.अनंत जोशी :- भाजपा शिवसेना युतीने याबाबत लेखी पत्र दिलेले होते. प्रत्येक विषयावर व सर्व्हे नंबरवर सदर बाबत विचार व्हावयास पाहिजे असे सांगितले.

मा.श्री.अशोक कानडे :- यामध्ये एकुण ३३० हरकती आलेल्या होत्या प्रत्येक हरकतींवर विचार करावयाचा असल्यास रात्र पुरणार नाही. एकंदर १८५ लोकांची ३१० आरक्षणे उठविणे बाबत त्यामध्ये नागापूर बोल्हेगांव शेतक-यांवर झालेल्या अन्यायाबाबत सविस्तर यादी देतो. नियोजन समितीच्या अधिक चूका झालेल्या आहेत व काही अटी टाकलेल्या आहेत. आरक्षण क्रमांक १६ पार्किंग होते. अटी टाकण्याचे धोरण काय आहे. याबाबत अधिक माहिती मा.आयुक्त आणि मा.महापौर यांना देण्यांत यावी. प्राथमिक शाळा, क्रीडांगणे हे महत्वाच्या जागेवर ठेवावेत. तसेच महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना घरासाठी जागा नाही ते हद्दवाढीमध्ये घरकुल योजने करीता चालू ठेवावी.

मा.श्री.मिलींद गंधे :- अ.नं.५ केडगांव कोणते आरक्षण टाकले आहे ते समजुन येत नाही. भिस्तबाग येथील आरक्षणा बाबत विचार करावा.

मा.श्री.सोमनाथ लोंढे :- विशेष घटक योजने बाबतचे डी.पी.युनिट बंद करण्यांत यावे.

मा.श्री.कैलास गिरवले :- विविध मा.सदस्यांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत व त्यांची नांवे घ्यावीत व मा.अशोक कानडे यांनी मांडलेल्या सूचना विचारात घेवून मंजूर कराव्यात व ठराव संमत झाला म्हणुन मान्यता देण्यांत यावी.